# वऱ्हाडसमाचार

मिती भाद्रपद वद्य १३ शके ८१८


सर्व हिंदुस्थानांत सूत काढण्याच्या व कापड विणण्याच्या मिळून १४९ गिरण्या सध्यां चालू आहेत आणि १० गिरण्या नवीन बांधण्याचीं कामें चालू आहेत. त्या शिवाय १९ गिरण्या उभाराव्या अशाविषयीं व्यवस्था जारीनें चालू आहे सूत काढण्याचीं चातीं एकंदर ३९, ३२, ९४६ असून ३७२७० माग चालू आहेत. गिरण्यांतून काम करणोरे मजूरदार सरासरीनें १,४९,४३२ आहेत सुतासाठीं व कापडासाठीं मिळून एकंदर १४,०९,३१८ कापसाचे गठ्ठे लागतात. प्रत्येक गठ्यांत अदमासें ३९२ रत्तल कापूस असतो. मुंबई इलाख्यांतच गिरण्याचीं कामें मोठ्या झपाट्यानें व भरभराटीनें चाललीं आहेत. मुंबई इलाख्यांत एकंदर १०९ गिरण्या आहेत. इतर प्रांतीं गिरण्याची संख्या अगदीं तुरळक आहे ह्मणजे मद्रास इलाख्यांत ११ गिरण्या व बंगाल्यांत ९ गिरण्या आहेत. बाकी कोणत्या प्रांतीं पांच, कोठें दोन, व कोठें एक अशा गिरण्या आहेत समाधानाची गोष्ट कीं वऱ्हाड प्रांतात देखील १ गिरणी बडनेऱ्यास आहे आणि ती चांगली चालली आहे.

पूर्वीं या देशांत वीणकाम हात-मागानें सर्व होत असे. यांत्रिक शक्तीचा हुती जों पर्यंत या देशांत फिरला नव्हता तों पर्यंत या देशांत हस्त कौशल्याचे कारखाने पुष्कळ होते. गिरण्या निघाल्या आणि विलायतेचा कपडा फार स्वस्त मिळूं लागला तेव्हां पासून या देशाच्या कोष्ट्यांचा व्यापार सफै बुडाला. हात-मागाचें काम बंद पडलें आणि चोहोंकडे विलायती गिरण्यांचा कपडा चमकूं लागला. गेल्या वीस वर्षांपासून विलायतच्या धर्तीवर देशी गिरण्या निघाल्या. देशाचा मध्य विस्तार, प्रचंड लोकसंख्या, व त्यांच्या बहुविध कापडा विषयीं गरजा यांच्या मानानें या देशी गिरणींतून सुताचा किंवा कापडाचा पुरवठा काहींच होत नाहीं असें ह्मटलें तरी चालेल. अलिकडे देशी गिरण्यांस थोडा जोर आला आहे आणि उत्तरोत्तर विलायतच्या कपडा वापरण्यांतून नाहींसा होऊन त्याच्या एवजीं देशी कपडा उपयोगांत येत जाईल असा रंग दिसतो. इंग्लंडचें संपत्तिवैभव इंग्लंडच्या कापडाच्या विक्रीवर अवलंबून आहे आणि हें वैभव कायम राहण्या साठीं देशी गिरण्यांचा प्रसार व अभिवृद्धी हीं विलायतच्या गिरणवाल्यांस इष्ट नाहीं.

हल्लीं देशी सूत किंवा कपडा फार हलक्या प्रतीचा असतो. वीस नंबरा वरील बारीक सूत देशी गिरण्यांतून अगदीं थोडें निघतें. आणि कापड ही ओबड धोबडच असतें बारीक तलम मिती कापड देशी गिरण्यांतून अजून निघूं लागलें नाही ह्मणून विलायतच्या गिरणवाल्यांस सोठीशी भिती नाहीं. इंडियाचें सूत चीन देशाकडे फार फार जातें आणि देशी कपडा आफ्रिकेच्या कांहीं भागांत, एडन, सिलोन वगैरे ठिकाणीं विशेष खपतो, या देशांत विलायती मालाचें महात्म अतिशय आहे आणि त्यामुळें ३२ कोट रुपयांचा कपडा विलायतेहून या देशांत येतो व त्याचा सर्व येथेंच खप होतो. देशी कपडा वापरावयाचा व विलायती कपडा वापरावयाचा नाही असा निश्चय करून त्या प्रमाणें वागणारी मंडळी निर्धाराची असली ह्मणजे देशी मालास उत्तेजन येईल हें उघड आहे सध्यां खरोखर देशाभिमानी लोक पाहिजेत!

---

इंडियन राज्यकारभाराच्या खर्चा पैकी कोणता खर्च वाजवी आहे व कोणता गैरवाजवी आहे हें ठरविण्यासाठीं एक रायल-कमिशन बसलेलें आहे. या कमिशनानें पक्का तपास करावा ह्मणून साक्षी घेण्याचा त्यास अधिकार दिला आहे. राज्यकारभाराची ज्यास माहिती आहे अशा लोकांच्या साक्षी झाल्या आहेत. या रायल कमिशनापुढें आपल्या प्रतिनिधीची साक्ष घेण्यांत यावी ह्मणून मुंबईच्या प्रेसिडेन्सी आसोसिएशननें इंडिया सरकारच्या मार्फत रायल कमिशनचे प्रेसिडेंटास विनंती केली होती. या विनंतीला रायल कमिशननें अनुकूळ जबाब दिला आणि एक साक्षीदार पाठविण्याची परवानगी दिली. मुंबईच्या प्रेसिडेन्सी आसोसिएशनाला हा बहुमान दिला व त्या योगानें नेटिवांचा सरकारांनें गौरव केला या बद्दल सर्वजणांस परमानंद वाटत आहे. आता कोणा लोकमान्य विद्वन्मणीची योजना या कामीं केली जाते हें पाहण्याकडे सर्वांचे डोळे लागले आहेत. नामदार फेरोजशहा मेथा सारखा श्रेष्ठ पुरुष अशा प्रसंगीं या विशिष्ट कामगिरीवर नेमला जावा अशी सर्व राष्ट्राची इच्छा आहे. रायल कमिशनची बेठक सध्यां तहकूब आहे पण दुसरी बैठक पुढील सालच्या जानेवारींत भरणार आहे ह्मणून लवकरच काय ती व्यवस्था लागली पाहिजे.

---

काळा मनुष्य व गोरा मनुष्य या उभयता मध्यें आमच्या राज्यकर्त्यांनीं मोठाच फरक करून ठेविला आहे. काळा मनुष्य ह्मणजे तिरस्करणीय व त्याज्य होय गोरा मनुष्य ह्मणजे अभिनंदनीय व पूज्य होय. काळ्या मनुष्यावर गोऱ्या मनुष्यानें कितीहि आपदा आणिल्या तरी त्या कृत्यास गर्हणीयपणा नाहीं नेटल इत्यादि दक्षिण आफ्रिकेतील भागांत इंडियन काळा मनुष्य विषवत् मानला जातो. त्याला सामान्य देखील हक्क दिले जात नाहींत. भिन्न भिन्न कायदेकानूंनीं त्याची स्वतंत्रता नष्ट करून त्याचा व्यापार बंद केल्या प्रमाणेंच सर्व गोष्टींचें संधान बांधलेलें आहे. आफ्रिकन कालनीं मध्यें ब्रिटिश इंडियन प्रजेचा असा छळ व्हावा हें ब्रिटिश राज्यास शोभत नाहीं. न्यायाच्या कामांत देखील 'काळा गोरा' असा फरक केला जातो अशा विषयीं उदाहरणें वारंवार दृष्टी समोर येत असतात. अप्रतिबंध व्यापार, ब्रिटिश प्रजेचे समसमान हक्क इत्यादि गोष्टी सर्व लोपतात आणि शेवटी गोरा मनुष्य व काळा मनुष्य हा फरक नानाविध प्रकारांनीं कायमच राहतो. गोऱ्या अंमलदाराचा हक्क ह्मणून वाटेल ती विषमता काळ्या गोऱ्या लोकामध्यें सरकार ठेवीत असते. एका ईश्वराची सर्व लेकरें असा बुद्धिवाद सांगताना पुष्कळ पाद्री दृष्टीस पडतात पण राज्यव्यवस्थेंत काळा मनुष्य जन्मण्या सारखें पाप नाहीं व गोरा मनुष्य जन्मण्या सारखें पुण्य नाहीं गोऱ्या लोकांत अहंपणा, मत्सरभाव, व पशुवत दुर्गुण जितके आढळतात तितके काळ्या मनुष्यामध्यें आढळत नाहींत. इंग्लिश लोक अफ्रिकेंत इंडियनांचा अती छळ व हेलना करितात तर आर्मेनियन लोकांची टर्कीनें कत्तल उडविली यांत आश्चर्य तें कसलें! माणसकी इंग्रेजश लोकांत कमी आढळते. काळ्या मनुष्यांची जर पृथ्वीवर एखादी कालनी असती आणि तेथें इंग्लिश लोकांस त्यांच्या नेटल येथील वर्तना प्रमाणें क्रूरतेनें वागविलें तर दाही दिशा दणाणून देतील. झालवारच्या प्रजेनें आपल्या महाराजा विरुद्ध गाऱ्हाणें नव्हतें तरी देखील त्यांस पदच्युत करून प्रजेस दुःखविमुक्त करण्याचा घाट सरकारानें घातला पण नेटलच्या आफ्रिकन कालनींतील गोऱ्या लोका विरुद्ध ओरड होत असतांना देखील सरकार दुर्लक्ष्य करितें ही गोष्ट काळ्या माणसाची भाग्यहीनता दर्शविते.

---

## दुष्काळाचीं चिन्हें

आग्रा येथें बाजारांत लूट झाली, नागपुरास बाजार लुटला इत्यादि बातम्या अत्यंत शोचनीय स्थिती दर्शवितात. आमच्या वऱ्हाड प्रांतीं देखील गरीब लोक विथरल्या सारखे दिसतात. प्रसंग मोठा कठीण येत चालला आहे. आणखी दहा पंधरा दिवस पाऊन पडणार नाहीं तर खरीप व रब्बी हीं दोन्ही पिकें बुडालींच असें ह्मणावें लागेल. लोकांच्या जवळ धान्याचा गल्ला नाहीं; मोलमजूरी करणाऱ्यांस कामधंदा नाहीं, आणि धान्याची महर्गता अती वाढली आहे. उपासमारामळें लोक हवालदील झाले आहेत. माध्यान्हाची वेळ मोठी कठीण आहे. लोकांस अन्न मिळेनासें झालें ह्मणजे त्यांस कशाची काळजी राहात नाहीं. ते जिवावर उदार होतात. निरपराधी राहून अन्नान्न करीत क्षुधेनें मरणासन्न होण्या पेक्षां अपराध करून तुरुंगांत पोटभर जेऊन क्षुधेची व्याकुळता दूर करणें बरें असें पुष्कळ गोरगरिबांस वाटूं लागलें आहे. हल्लीं देशान्तरावर वऱ्हाडांतून धान्य अतोनात जात आहे. बाह्य मुलखातले खरेदीदार व्यापाऱ्याच्या ठिकाणीं येऊन बसले आहेत आणि त्यांनीं धान्याचे भाव फार जबर केले आहेत. दिवसभर कबाडकष्ट करून तीन चार आणे रोजमुरा मिळविला तर तेवढ्यांत धान्याच्या महागाईमुळें पोटभर खायास देखील मिळत नाहीं ह्मणून मोलमजूरदारांनीं मोठा ओरड केली आहे आणि ती यथार्थ आहे.

गोर गरीब लोकांस कांहीं मदत करावी ह्मणून मे. भिडो साहेब डेपुटी कमिशनर यांच्या अध्यक्षते खालीं येथील टाऊनहालांत जाहिर सभा भरली होती. सध्यां भिक्यासारखी अजून स्थिती झाली नाहीं. वर्गणी गोळा करून गरीब लोकांस ६० रुपये खंडी या भावानें जवारी पुरविण्याचा बेत ठरला आणि वेळ तशीच येऊन बेतली तर वर्गणी गोळा करण्यासाठीं एक कमिटी नेमण्यांत आली. सारांश, सभा भरण्यापूर्वी व सभा भरल्या नंतर गरीबांची व्यवस्था सारखीच निराश्रितपणाची राहिली.

---

मुख्य अडचण कामधंद्याची आहे. गोर गरीबास काम धंदा असावा तितका विपूल नाहीं. आणि दुष्काळा सारखा प्रसंग येत चालल्यास सरकारास मोल मजूरीचीं निराळीं कामें उपस्थित करावीं लागतील. या गोष्टी कडे सरकारनें लक्ष्य पुरविलें पाहिजे तितकें पुरविलें जात नाहीं अशी आमची समजूत आहे. धान्याचा पुरवठा एक वर्षभर पुरण्या सारखा नसला तरी धान्य बाहेरून वाटेल तितकें येईल पण तें तें धान्य विकत घेण्याची ताकद गरीब मजूरदारास सरकारनें दिली पाहिजे. काम द्यावें आणि त्याच्या मोबदल्यांत गरिबांस पोटापुरती मजूरी द्यावी. हाच नियम सरकारानें ध्यानांत धरला पाहिजे.

दहावीस वर्षांपूर्वी लोकांच्या जवळ धान्याचा सांठा मोठा होता. पण हल्लीं लोक नादान स्थितीला फार पोचले आहेत. सामान्य लोकांची स्थिती अतिशय कष्टमय आहे व ती उत्तरोत्तर त्याच अनिष्ट दिशेनें वाढत आहे याचें प्रत्यंतर हल्लींची सामान्य जनसमूहांतील चलबिचल व अस्वस्थता हीं होत. दुष्काळ अद्याप लांबच आहे ईश्वर करो आणि तसा दुर्योग न घडो— तथापि पावसानें थोडी ओढ धरल्या बरोबर सर्वत्र हाहाकार होऊं लागला. लोकांच्या अंगीं दम नाहीं. जो दिवस निभतो तो लाखाचा असा प्रकार झाला आहे. अशा दिवस मोजण्याच्या स्थितींत पीक पाण्यानें उग्र स्वरूप दाखविलें तर मागील२० वर्षांखालील दुष्काळाचा दुःखसागर किती सहस्रावधि पटीनें मोठा होईल याचें चित्र कल्पनेनें चांगलें काढतां येईल. अलिकडे लोकांची साम्पत्तिक स्थिती खालावत चालली आहे आणि इंग्रेजी राज्यांत लोकांची दुर्दशा अधिक होत आहे याचें मुख्य द्योतक सध्याची भावी दुष्काळाच्या भितीनें उद्भवलेली क्रांती होय.

---

इंडियाची सांपत्तिक स्थिती अगदीं असमाधानकारक आहे. हल्लीं जी कारणमाला तिच्या बुडाशी आहे तिचा परिणाम सांपत्तिक स्थितीला बाधक असाच आहे. संपत्तीचें खरें महत्व कळविण्यासाठीं कित्येक शास्त्रज्ञ असें ह्मणतात कीं जो देश सधन आहे त्या देशांत सर्व सुधारणा आपोआप घडून यतात. भावार्थ असा कीं धन मिळविण्याचे जे राजमार्ग आहेत त्या मार्गांनीं जाणाऱ्याच्या अवान्तर सुधारणा त्याच मार्गांनीं होत असतात. इंडियांतील संपत्तीचे प्रवाह विलायतेंत वहात असतात आणि एखादा अपरंपार भरलेल्या हौदाला जर पाणी बाहेर सोडणाऱ्या नळ्या लाविल्या तर कांहीं वर्षांनीं जी स्थिती त्या हौदाची होईल ती स्थिती आमच्या देशाची इंग्रजी राज्याच्या चिरायुष-

णामुळें झाली आहे. धनोत्पादक धंदा, हुन्नर किंवा व्यापार आमच्या देशांत एकही नाहीं. विलायतेंत असे व्यापारधंदे चालतात आणि आमच्या देशांतील संपत्ति हरयत्नांनें लांबवितात. धनोत्पादक धंदा नसल्यामुळें आमच्या देशाचे लोक उपासमाराच्या वाईट स्थितीला पोंचले आहेत. उदाहरणार्थ, सध्यांचें अकोले शहर घ्या. वकील, डाक्टर, सट्टा व्यापारी व्याजबट्टवाले व्यापारी यांचा चळचळाट आहे पण या धंद्यामध्यें देशाची उन्नती करणारा एकही धनोत्पादक धंदा नाहीं. बाळापूरचे कोष्टी जें थोडेबहुत वीणकाम करितात किंवा कांहीं लोक दौलताबादी कागद तयार ते देशाचे हितकर्ते आहेत. त्यांच्या हातून स्थानिक गरजा कांहीं तरी भागविल्या जातात. फ्याक्टरी आहेत पण त्या कच्चा माल देशान्तरीं पाठविण्याच्या पूर्वीचे दरवाजे आहेत. देशाच्या गरजा देशानेंच भागविल्या पाहिजेत आणि तशी गोष्ट जुळून आल्यास बाह्य देशीं देखील आपल्या देशाच्या जिन्नसानें कायमचा पगडा बसविला पाहिजे.

सांप्रत जपान व जर्मनी या दोन राष्ट्रांनीं इंग्लंडास धनोत्पादक व्यापार धंद्यांत मागें सारलें आहे. इंग्लंडाला मोठी दहशत पडली आहे आणि अप्रतिबंध व्यापाराचें तत्व चुकलें आहे असेही उद्गार ऐकूं येऊं लागले आहेत. इंग्लिश राज्यांत इंग्लंडाचाच माल खपला पाहिजे आणि त्यासाठीं कांहीं अनुकूळ प्रतिबंध घालण्याच्या वाटा घाटी चालूं आहेत. सारांश, स्पर्धा चांगली पण जेथें आपल्या देशाच्या साम्पत्तिक स्थितीला धक्का पोचतो तेथें स्पर्धा कमी केली पाहिजे असें इंग्लडास जर्मनी व जपान या राष्ट्रासंबंधानें वाटूं लागलें आहे. पण इंडिया संबंधानें हे विचार अगदीं बाजूस पडतात. इंडियाची सांपत्तिक स्थिती सुधारण्याला देशी चिजवस्तूंनीं सर्व देश व्यापून गेला पाहिजे, आणि असा सोन्याचा दिवस उगवण्यास देशात औद्योगिक शालागृहें पुष्कळ निघालीं पाहिजेत. हल्लींच्या शिक्षणक्रमांत औद्योगिक शिक्षणाचा सर्वैव अभाव आहे हीच गोष्ट आमच्या देशाला दुःखसमूलक होय.

The Berar Samachar
MONDAY OCTOBER
5 1896

The application of the theories of the Modern Science of economics has long been deplored by all sensible and reasonable men in this country. The rent theory though in itself lses objectionable as viewed from Ricardos standpoint has been carried to its utmost and hence rueful practicability. The general productiveness of a land is determined by an arbitary and often unsympathetic Settlement Department at much higher the normal and existing fertility. The evidence of the people to show the actual fertility is traduced and acknowledged nay conclusively presumed to be deliberately false and misleading. On one side the Government admits the ignorance and indebtedness of the agricultural population of the country. Yet when its interests come into a collision with those of this population the fact is lost sight of and the assessment is levied as high as it can be levied. The unpopularity of the Settlement itself and a motive for evading assessment are too powerfully acknowledged by the Government to allow any interference on their part with Settlement operations.

Rent therefore materially affects the profits and wages of the agricultural population. Particularly in times of an impending scarcity it withdraws a large portion of it from its usual avocation.

There is a sort of implied assurance on the part of Government that a considerable portion of the rent would be remitted if the condition on whose presumption it is levied is altered and non-existent. But there is at least an implied certainty that officers whose preferments depends upon pleasing the Government by fair or foul means are always anxious to show as much return to the Exchequer as they can.

Intermediate steps between the subjects and their real rulers have often been proved to be most pernicious to the interests of either. The one suffer from the mental ignorance, the other from their moral ignorance. The one are not well acquainted with their rights and previleges and with the mode of making their voice heard. These defects due to a faulty Government are further made the cause of other utter neglect and also contempt. While the other do not consider it within their province to ascertain the real state of their subjects. They see through the eyes of those of their visitors and subjects who go to them from self motives to have their purpose served. It is true they have too much work. It is also true they starve as it were for want of a congenial society. Their playful employments too have in them a stint. Yet if called upon to govern a vast empire it is their duty to be conversant with the real state, feelings, and short comings of those whom it has pleased God to make them govern. What executive officer has ever devoted at least one hour to hearing the most poor and to witnessing their true condition ? Justice we may have. But justice without Mercy and Sympathy is wickedness itself What avails such justice?

Agriculturists are afraid of cultivating their fields. They are afraid of exactions. The margin of cultivation is rising. This year's threatening calamity threatens a threefold blow. Less production from natural influences is one. Non—cultivation from misapprehensions about the Government is another. And lastly an increase of the public burdens in one shape or another either immediate or remote is the third.

To any ordinary man who would reflect on this situation the future is palpably visible. Better prevent than soften.

---

We have received a copy of the memorial sent to the Resident in connection with the well known riot of Talwel in the middle of the last year. Both the rival parties fought over the possession of a field at Barhaupur in the Ellichpur district. For a time there was bloodshed and madness in the extreme. The prosecution side has got scot—free and the other side was made the scape—goat in the long run of a protracted trial. The memorialists ask for pardon in regard to the portion of imprisonment that is yet to run and we think that the Resident will do well in granting the request. Mad fury and bitter jealousies had effected plenty of ravages on life and property and we wish a sweet end to them all.

---

The draught of rain at the eleventh hour when the first crops run to ear has produced much uneasiness in the minds of the cultivators. If it does not rain for a week more the Kharip Crop will be an utter failure. The standing crops are now withering away for want of rain. The Rabbi will also suffer a great deal. This is the high time for sowing of wheat &c. but people have stopped the sowing operation awaiting with great earnestness the approach of rain but every day they are disappointed. The prices of food grains have run to high figures. The Jawari is sold from 65 to 69 Rs. per Khandi and Wheat from 102 to 105 Rs. per Khandi. The condition of the poor appears to be very precarious. A lot of them are obliged to be half—starved. Many poor people adult and old are wandering throughout the streets and bazars for grain. In short there is much excitement among the Native population. Hindoos are worshipping with all seriousness their deities and invoking God Varun in their temples to favour them with a heavy downpour of rain. The Mahomedans offer prayers in their Musjids .Considerable anxiety is felt by the District officials consequent on the high prices of grain brought about by the determined combination of satta—dealers, Bannias and Marwadis. The District officers are exerting much to induce the Marwadis and other grain—dealers to keep down the high rates. They on their part being influenced by high officers reduce the rates for a time. Such is the state for the present. We heartily hope that these clouds of distress will soon disapper, and the calamity will soon be averted. On Friday and Saturday last there was copious rain at Nasik and Dhulia in the Khandesh Districts and the same currents are soon expected in Berar and the people will go on rejoicing.

---

"6. The total number of wild animals returned as destroyed is 16,271 as compared with 14,009 in 1894; the total amount of rewards paid was Rs 1,03,736 against Rs. 1,04,932. Compared with the previous year the figures do not vary much. In all rewards were paid for 1,331 tigers 4,360 leopards, 1,302 bears and 3,022 wolves destroyed in 1895. Tigers were most largely destroyed in Assam, Bengal and the Central Provinces, where 360, 336 and 225 were killed, respectively, at an expenditure of Rs. 7,137, 5,337 and 10,620, showing that the amount of rewards paid for the destruction of these animals in the Central Provinces is high, but not higher than the increase in mortality from tigers in these Provinces seems to justify.

7. The number of snakes destroyed is returned as 131,726 compared with 106,312 in the preceding year and the amount of reward paid for their destruction was Rs. 16,447 against Rs. 10,151. In the Central Provinces the orders issued for the grant from Provincial funds of a reward of Re. 1 for the killing of a poisonous snake had the effect of stimulating activity in their destruction. The Chief Commissioner has, however, in view of the large expenditure likely to be involved, now directed the discontinuance of the rewards in rural areas as he is of opinion that the mortality from snake-bite is trifling compared with that from the main diseases which ravage the population and that the money available can be more usefully spent in extending medical relief than in the fruitless endeavour to exterminate poisonous snakes. In urban areas discretion has been left to Municipalities to grant rewards or not. In Bengal too the Lieutenant-Governor has issued instructions directing the discontinuance of rewards except in Municipalities. The large increase in Burma is reported to be fictitious. Of the snakes destroyed 6,936 were returned from the Meiktila district against 146 in the previous year. The figures were obtained from village headmen and, as observed by the Chief Commissioner, doubtless include both harmless and poisonous snakes. The statistics under this head are clearly untrust worthy." G. I.

## वऱ्हाड

हवामान—पाऊस नाहीं ह्मणून 'त्राहि भगवान्' असें झालें आहे. उष्मा अती होतो, ढग वारंवार जमतात व इतर प्रांतीं कोलबो, धारवाड धुळे वगैरे कडे पाऊस पडूं लागला आहे ह्मणून पाऊस चार आठ दिवसांत चांगला पडेल असा सुमार आहे. रोगराई विशेष नाहीं.

मि० आर्बर्ड साहेब जुडिशिअल कमिशनर साहेब यांची स्वारी बुलढाण्याहून येऊन वशिम जिल्ह्यांत गेली.

मि० राईट पोलीस सुपरिन्टेंडंट यांनीं पेनशन घेतलें.' त्यांस हैदराबाद दरबारांत मोठी हुद्याची जागा मिळाल्या प्रमाणें ते गेल्या १ ले तारखेस हैदराबादेस रवाना झाले. उमरावतीच्या स्टेशनावर त्यांच्या सन्मानार्थ रा० रा० पांडुरंग गोविंद वकील यांनीं पानसुपारी दिली होती.

आमचे येथील रिक्रिएशन क्लबचे मेंबरांनीं काल रोजीं रात्रौ पूर्व संकेता प्रमाणें संगीत मृच्छकटिक नाटकाचा प्रयोग करून दाखविला. थिएटरांत प्रेक्षकांची बरीच गर्दी होती मे. प्रिडो सा० डे० क० व मे० ग्यालोवे साहेब डि० सु० पोलिस हे ही मुद्दाम आले होते. या मंडळीचा हा प्रथमचाच प्रयत्न असल्यामुळें त्यांच्या गुण दोषा संबंधानें आह्मी कांहीं लिहूं शकत नाहीं. मंडळीनें पुष्कळ सुधारणा करणें इष्ट आहे. मुख्य भूमिकांचीं कामें फारच सुमार झाले, मैत्रेय, शर्विलक, वीट व शकार यांनीं आपलीं कामें बरीं केलीं. मंडळीनें प्रथम उपहासास न भीतां गुणी, विद्वान् व कुशल लोकांकडून शिक्षण घेतल्यास त्यांस हातांत घेतलेले कामांत यश आल्याशिवाय राहणार नाहीं.

### बाजार भाव

| | दर खंडीस |
|---|---|
| आळशी | ९४ रुपये |
| जवारी | ६६-६८ रु० |
| गहूं ( कांठे ) | १०० रु० |
| ,,( बनशी ) | १०५ रु० |
| चणे | ९० रु० |
| तेल | ५॥= रु० मण |
| तूप | ८ मण |
| सोनें | २७ तोळा. |
| चांदी | ९३ भार |

## वर्तमानसार.

लिअडल सिटीटीवाईन अया काबुलच्या अमिराने ता. १९ आगष्ट रोजीं आपणास एक नवा किताब घेतला याचा अर्थ " धर्म व एकी यांचा प्रकाश " असा आहे. अमिरानें ही गोष्ट हिंदुस्थानसरकारास कळविली असून १९ आगष्ट हा रजेचा व सणाचा दिवस ठरविला होता.

मुन्सफीची व वकिलीची परिक्षा मुंबईस २२ फेब्रुवारि १८९७ रोजीं सुरू होण्याचें ठरलें.

सरकारी नोकरीतला माणूस संस्थानांत गेला तरी त्याणें मिळणाऱ्या सर्व पगारावर इन्कमटाक्स दिला पाहिजे असें ठरलें आहे.

दिल्लीस एक हिंदुसमाज आहे. या समाजाच्या मार्फत नुकतेंच एक पुस्तक प्रसिद्ध झालें. त्यांत महमदी धर्माची निंदा केलेली असून त्याच्या योगानें सर्व मुसलमानांस वाईट वाटण्यासारखें आहे असें मुसलमान लोकांस वाटून त्यांनीं त्या पुस्तकाबद्दल त्या समाजावर अब्रू नुकसानीची फिर्याद केली आहे व त्याच्या खर्चाकरितां दिल्लीच्या व बाहेरच्या मुसलमानांत वर्गणीनें पैसा जमत आहे. हिंदु व मुसलमान या दोन्ही लोकांचीं मनें चलबिचल झालीं आहेत. माजिस्त्रेटापुढें खटला सुरू झाला तेव्हां लोकांची अति गर्दी झाली होती. बंदोबस्ताकरितां जास्त पोलिस जमा केले आहे. खटल्याचा निकाल व्हावयाचा आहे.

कसबिणीचें नाटक--हुबळी जि० धारवाड येथें हल्लीं कसबिणी नाटकाची तालीम घेत असून नाटक करण्याची त्यांची तयारी चालली आहे असें ह्मणतात.

यंदा इजिप्तमधील कापसाचें पीक पूर्वी कधींही आलें नव्हतें इतकें चांगलें येईलसें वाटतें. ठा. अ.

गुप्तकालवा-- ऱ्याकेशायर परगण्यांत वर्ली आणि सेंट हेलेन्स यामध्यें एक भूम्यंतर्भागांतून वाहणारा कालवा आहे. हा कालवा १६ मैल लांब असून, तो उगमापासून त्याच्या दुसऱ्या टोंकापर्यंत सर्व जमिनीच्या पोटांतून गेलेला आहे! अशा प्रकारचा गुप्त कालवा अवघ्या जगांत इतर कोठेंही नाहीं.

लिहावयाचे टांक-- विशेषें करून पेलादी टांक करणारे कारखानदाराचा असा अनुभव आहे कीं, टांक असा बिघडलासा वाटला ह्मणजे फेंकून न देतां दोन दिवस उपयोगांत आणूं नये. तिसरे दिवशीं तो टांक १५ सेकंद किंवा अर्धपर्यंत दिव्यावर धरावा, ह्मणजे पुनः पहिल्या सारखा चालूं लागतो.

सीलोन आणि हिंदुस्थान यांच्यामध्यें एक पूल बांधण्याचा विचार चालला आहे. या दोन ठिकाणामध्यें अंतर ४१ मैल आहे. क० त०

गेल्या आठवड्याच्या सरकारी ग्याझेटाचा बराच भाग शेतकऱ्यांस रिणमुक्त करण्याच्या कायद्याचें कलम ६१ वर केलेल्या नियमांनीं भरून गेला आहे.

कायदे कौंसिलचें काम कसें चालवावयाचें याबद्दलचे नवे नियम करून ते गेल्या सरकारी ग्याझेटांत प्रसिद्ध झाले आहेत.

लार्ड रोजबरी यांचें दुसरें एक पत्र प्रसिद्ध झालें असून त्यांत ते ह्मणतात कीं या अर्मेनियन प्रकरणाबद्दल इंग्लंड टर्कीच्या सुलतानास पदच्युत करूं शकेल असें मला वाटत नाहीं. कारण कोणा एका राष्ट्रानें उचल केल्यास त्यांत हरकत आणण्याचा राशियाचा झोंक आहे.

आस्त्रिया व रशिया यांच्यामतें शांतता राखण्याचें ठरलें आणि टर्कीचा प्रकार कायम ठेवण्याचें ठरलें असें हंगारीच्या प्रेसिडेन्टानें सांगितलें.

सिवाटोपल येथील रशियन आरमाराची लढाईवर जाण्यासारखी तयारी चालली आहे आणि तीन पलटणी गलबतावर चढविल्या व कान्स्टांटिनोपल येथील रशियन वकिलाची तार येतांच ती फौज बास्फरस येथें जाण्या करितां चालती होईल.

ही अर्मेनियन कत्तल बंद करण्यास फ्रेंचांनीं पुढें यावें असें मि० ग्लाडस्टन ह्मणतात.

इजिप्त प्रकरणांत दरवेशी लोकांवर चाल करून जाणाऱ्या फौजेनें कर्म नावाचें एक ठिकाण ता० १९ रोजीं घेतलें त्यांत दरवेशांचे फार लोक मेले व त्यांचें एक गलबत बुडालें. इजिप्त फौजेतलें चार जखमी मात्र झाले. ता० २० रोजीं पुन्हा लढाई झाली व त्यांत डोंगोला हें प्रसिद्ध ठिकाण हस्तगत झालें. साबीचा कमांडर विशस हा फार घायाळ झाला. दरवेशी लोक आपलें सामानसुमान टाकून पळालें व तें सर्व इजिप्त फौजेस मिळालें.

फिलिपियन बेटांत हत्यारें, काडतुसें, व जपानी निशाणें यांचा फार मोठा साठा केलेला आढळला आहे.

कोरियाच्या संबंधांत रशिया व जपान यांच्यांत एक तह झाला व त्यांत दोघांचें ही सारखें वर्चस्व राहावें असें ठरलें.

बंगाल्यांतल्या एका माणसानें गुळांत कांहीं औषधी पदार्थ घालून दारूच्या भटीप्रमाणें भटी लाऊन त्याचा अर्क काढला. पोलिसानें त्या माणसावर चोरून दारू गाळली असा आरोप आणला. ही दारू नसून हें एक संजीवनी औषध आहे अशी आरोपीनें तकरार केली. माजिस्त्रेटानें १८७८ च्या ७ व्या अपकारी अक्टाच्या ९३ व्या कलमाप्रमाणें आरोपीवर गुन्ह्याची शाबिती करून दंड केला. हाय कोर्टाकडे अपील झालें. या केलेल्या पदार्थाची कृती जरी दारूसारखी आहे तरी त्यांत ज्या दुसऱ्या औषधी घातल्या आहेत त्यावरून ती औषधी तयार करण्यांत त्यानें चोरून दारू गाळण्याचा गुन्हा केला असें होत नाहीं. त्याच्या या कृतीवरून जर या गुन्ह्याची शाबिती करावी तर तशा रीतीनें तयार केलेलें तें औषध विकलें असतां परवान्यावाचून दारू विकल्याच्या गुन्ह्याचीही त्याच्यावर शाबिती करावी लागेल, पण तें औषध विकण्याबद्दल कायद्या प्रमाणें त्याच्यावर गुन्ह्याची शाबिती होण्याचा संभवच नसल्यामुळें चोरून दारू केल्याचा गुन्हाही होत नाहीं असें हायकोर्टानें ठरवून केलेली शिक्षा रद्द करून दंड परत देण्याचा हुकूम केला.

न्यायखात्यांतल्या सनदी नोकरांस ३० वर्षांचा जो पेन्शनाचा नियम आहे तो ३९ वर्षांचा करावा असें कलकत्ता हायकोर्टाचें ह्मणणें आहे ! कारण आशा सुटत नाहीं? ह्मणून? ठा० अ०

निजामसरकाराचे मुख्यप्रधान नवाब विकार उल् उमरा ह्यांस महाराणी सरकारांनीं के. सी. ऐ. ई, ही पदवी दिली आहे, ती त्यांस अर्पण करण्याचा मोठा समारंभ गेल्या पंचविसाव्या तारखेस प्रातःकाळीं दाहा वाजतां निजाम सरकारच्या दरबारांत झाला, ती पदवीची सनद घेऊन रेसिडेंट प्लोडेन साहेब तेथें आले होते, त्यांनीं मोठ्या सन्मानानें दिवाणसाहेबांस तो मानाचा चांद दिला, तो पाहून निजाम सरकारास फार संतोष झाला, अशा पदव्या देण्याची वहिवाट बरीच जुनी आहे. आणि काम चांगलें झालें ह्मणजे त्याच्या प्रदर्शनार्थ असें कांहीं व्हावें, हें आवश्यक आहे. पण, हें प्रधानांच्या पभूच्या हातीं व्हावें. ह्मणजे, विकार उल् उमरा ह्यांनीं जर आपलें काम उत्तम रितीनें चालविलें आहे, तर त्यांचा गौरव, पदवी वगैरे देऊन, निजाम सरकारानें करावा, हें विशेष भूषणावह वाटतें तरीं, मुख्य दिवाणाच्या नेमणूकीच्या कामांत इंग्लिश सरकाराच्या अनुमताचा कांहीं संबंध आहे. त्याच्या योगानें हा समारंभ विशेष संगतवार दिसतो.

मुंबई 'ब्युबोनिक प्लेग' अथवा एका प्रकारच्या विषारी तापाची भयंकर सांथ— गेल्या वीस पंचवीस दिवसापासून या शहरांतील मांडवीकडील भागांत एक प्रकारच्या विषारी तापाची साथ आली असून त्या योगानें शेंकडों माणसें मृत्युमुखीं पडत असल्यामुळें त्या भागांतील रहिवाशांची फार गडबड उडून राहिली आहे या रोगाचें लक्षण असें आहे. कीं प्रथम मनुष्याचा गळा, खाका व कंबरेचे सांधे सूजून गाठीं उठतात. व त्या योगानें ज्वर येतो. तो लागलाच सन्निपात होऊन मनुष्य एक दोन दिवसांत दगावतो. फार झालें तर रोगी पांच सहा दिवस जगतो.

ठाण्याच्या आतकारी लोकांच्या पुन्हा झुंडीच्या झुंडी येत आहेत. व गांवांत गर्दी न करण्याबद्दल जाहिरनामे लागले आहेत तरी ते लोक ऐकत नाहींत. एका तालुक्यांत तर ह्यां लोकांनीं ७० मोळ्या आणल्याबद्दल या ७० लोकांस अटकेंत ठेविलें आहे. ह्या लोकांनीं एका जंगल इन्स्पेक्टराचा हात तोडला असून इतर लोकांस खरपूस मार दिला आहे असें ह्मणतात.

नागपूर व वऱ्हाड प्रांतांतून दुष्काळ पिडित ९० मुलींस अन्न वस्त्र देऊन ख्रिस्ती करण्याच्या इराद्यानें एका करोल नांवाच्या मिशनरी बाईनें त्यांस येथें आणल्याचें समजलें.

योगशास्त्राचा दुरुपयोग—योगशास्त्राच्या सामर्थ्यानें एका गृहस्थानें अदृश्य रीतीनें चोरी करविली, अशा बद्दलचें एक प्रकरण न्यूयार्क ( अमेरिका ) येथील कोर्टापुढें आलें आहे.

योग्य न्याय—थोडे दिवसापूर्वी न्यूमनपूर येथील एक १२ वर्षाचा मुलगा हातांत कुऱ्हाड घेऊन झाडाच्या फांद्या तोडीत होता. त्या झाडाजवळच एक बाई आपल्या लहान मुलास मांडीवर घेऊन पार्जीत होती. दैववशांत कुऱ्हाड दांड्यापासून निसटून मुलाच्या डोक्यांत पडली, त्याच्या योगानें तें मुल मेलें. पोलिसानें त्या मुलावर किशोर च्या हे. म्याजिस्ट्रेट पुढें खटला केला व माजिस्ट्रेट साहेबांनीं त्या मुलास ६ महिन्याच्या सक्त मजुरीची शिक्षा दिली परंतु अपील कोर्टानें ती शिक्षा रद्द करून फक्त त्यास ९ रुपये दंड केला.

फिलिपाईन बेटांतील बंड मोडण्याकरितां ६००० स्पानिश सैन्य म्यानिल्ला येथें जाऊन पोचलें असून कार्थाजेना [ स्पेन ] येथून आणखी कांहीं सैन्य कुमकेकरिता ता० २९ रोजीं तिकडे रवाना झालें आहे. इ. प.

उमरेड येथें एका हिंदु मुलानें पैशाच्या लालचीनें मुसलमानी धर्म स्वीकारला.

नामदार प्रिन्स ऑफ वेल्स यांना जेव्हां राग येतो तेव्हां ते आपला डावा डोळा एकसारखा चोळीत असतात, आस्ट्रेलियाच्या बादशाहास जेव्हां राग येतो तेव्हां तो आपला गाल फुगवितो. रशियाचे झार साहेब रागाचे आवेशांत आपले दोन्ही हात छातीवर ठेवतात. ग्लेडस्टन साहेब पायाच्या गुडघ्यावर एकसारखा हात फिरवितात, व टर्कीचे सुलतान साहेब रागाच्या आवेशांत जोरानें आपला गळा दाबतात.

बार्बेडोस येथें शिटीप्रमाणें आवाज करणारें एक झाड आहे.

कराची पासून ६ मैलावर मालाचे गाडी खालीं एक उंटवाला व त्याचा उंट असे दोघे चेंगरून मरण पावले.

हत्तीस रोज ४ तास झोंप पुरे होते.

अमृतसर रेल्वे स्टेशनवर एक विलक्षण रीत आहे. जवळजवळच्या स्टेशनावर ज्या लोकास तिसऱ्या वर्गानें जाणें आहे त्यांची टिकिटें तपासून स्टेशनांत गाडी आल्यावर बर टिकिट कलेक्टर गार्डाच्या स्वाधीन करितो. गाडे सर्वांस स्टेशनच्या बाहेर उभें राहण्यास सांगतो, व गाडी निघण्याची घंटा होते तोंच त्या सर्वांस हांकून आणून एका डब्यांत चेपून टाकतो; मग स्त्रिया असल्या तरी कांहीं हरकत नाहीं! तिसऱ्या वर्गाच्या उतारूंवर होणार पुष्कळ जुलुम ऐकले, परंतु अशी स्थिति आजपर्यंत ऐकण्यांत आली नव्हती. याबद्दल रेल्वे अधिकाऱ्यांचें डोळे उघडणारा कोणीच नाहीं काय? प्र०

प्रसिद्ध पखवाज वाजविणारे रा० बाळासाहेब पानसे हे इंदुर येथें गिवर्तले.

खोट्या साक्षी देण्याचा कारखाना दिवसेंदिवस वाढत चालला आहे, तो कमी होण्यासाठीं समन्साचे पाठीवर मनुस्मृतिंतील उपदेशपर १०९ श्लोक छापले ह्मणजे ते वाचून साक्षीस सत्य भाषणाचा बोध होईल, अशी एक अपूर्व सूचना निहिलचंद नामक गृहस्थानें केली आहे! खोटें बोलणें हें ज्यांचें ब्रीदच ते काय मनूच्या आज्ञेला भिणार? स० शो०

---

☞ हें पत्र आकोला येथें कै० वा० खंडेराव बाळाजी फडके यांचे " वऱ्हाडसमाचार " छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

साल अखेर „ ७ „ १ ८
किरकोळ अंकास.......................८४

नोटिशी बद्दल
१० ओळीचे आंत रु० १
दर ओळीस .........८। ४६
दुसरे खेपेस .........४

Annual in arrears 7 „ 1 Rs. 8 as
Six monthly......... 3 ............ 8 as
Single copy .................. 4 as

Advertisement.
Below 10 lines ... 2 Rs
Per line over 10 ... 4 as.
Repetition Per line ...3 as

# वऱ्हाडसमाचार.

## THE BERAR SAMACHAR

VOLXXX AKOLA MONDAY 12 OCTOBER 1896 NO 40
वर्ष ३० आकोला सोमवार तारीख १२ माहे आक्टोबर सन १८९६ इ० अंक ४०

### मुंबई बँकची ठेव ठेवण्याचा बँक.

या सेव्हिंग बँक मध्यें खालील अटीवर ठेव ठेविली जाईल.

कोणत्याही एका वर्षांत ह्मणजे जानेवारीच्या १ ले तारखे पासून तो दिसेंबरच्या ३१ तारखे पर्यंत फक्त एक हजारा पर्यंत रुपये ठेविले जातील.

दोन अथवा अधिक मनुष्यांच्या नांवानें देखील एक ठेव ठेविता येईल. व त्यांच्या हयातीत, तसेंच त्यांचे पैकीं कोणी वारले तर त्यांचे मागें त्यांच्या पैकीं एकास अथवा अधिक जणांस ठेव काढतां येईल.

एका वर्षांत एक हजार रुपया पर्यंत ठेवलेल्या रकमेवर दरसाल दर शेंकडा २ दोरुपये व्याज दिलें जाईल. मात्र ५००० पांच हजारा वरील रकमेस व्याज नाहीं.

मुंबई ब्यांक
आकोला १०।७।९६. } R. Aitken Agent

### जाहिरात

संस्थान सोंडूर जिल्हा बळारा इलाखा मद्रास येथें श्रीकार्तिक स्वामीचें महा स्थान आहे. तेथें चालू सालांत ह्मणजे कार्तिक शुद्ध पौर्णिमेस महा यात्रा भरणार आहे तर या त्रेस येऊं इच्छिणाऱ्या मुमुक्षु लोकांच्या सोयीं करितां खालीं लिहिल्या प्रमाणें टिकिटाचे दर ठेविले आहेत.

| | रुपये |
|---|---|
| पंचामृताभिषेक | २५ |
| सर्वांगाभिषेक | १५ |
| पादाभिषेक | १० |
| पादस्पर्श | ५ |
| दर्शन टिकिट | २ |

बारा वर्षांचे आंतील मुलांस दर्शन टिकिट १ कार्तिक शुद्ध १४ रोजीं अभिषेक वगैरे बाबत टिकिटें देण्यास सुरवात होईल. शुद्ध १५ चे दिवशीं सकाळीं ७ वाजतां दर्शनास सुरवात होईल. सदर टिकिटें श्री कार्तिक स्वामीचें डोंगरावर विकत मिळतील. ब्राह्मणा वांचून इतर लोकांनीं अभिषेक व पादस्पर्श वगैरे ब्राह्मण द्वारे करवावे.

यंदा देशकाल सुभिक्ष आहे. संस्थान सोंडूर येथें येण्यास होसपेठ स्टेशन ६ कोस गादिगनूर स्टेशन ४ कोस, तोरणगल्ल स्टेशन ४ कोस, याप्रमाणें सोंडूरापासून रेल्वे स्टेशनें आहेत. सोंडूराहून कार्तिक स्वामीचा डोंगर २ कोस आहे, स्टेशनाहून सोंडुरास येण्यास गाड्या वगैरे मिळतात. यात्रेकरूं लोकांस कोणत्याही गोष्टीची तसदी नाहीं. श्री स्वामीचें दर्शन घेण्यास योग कार्तिक शुद्ध १५ चें दिवशीं संपूर्ण आहे.

कार्तिक शुद्ध १४ गुरुवार रात्रीं २ घंटे पासून अभिषेक पादस्पर्श वगैरे सुरू होईल. शनवारीं १२ घंटे पर्यंत शिवयोग असल्या कारणानें त्या रोजीं दर्शन घेण्यास दर इसमास एक रुपया प्रमाणें घेतले जाईल. १२ वर्षांचें आंतील मुलांस आठ -॥- आणे घेतले जाईल. तारीख २७ माहे सप्टेंबर सन १८९६ इ.

भिमराव पोळ म्यानेजर.

मुक्काम अकोला.
ता. ४।१०।९६

### मेघराजास प्रार्थना.

॥ श्लोक ॥ ( शा. वि. )
॥ बा मेघा तुज मेघराज वदती
उल्हासुनी सर्व ही ॥
॥ होशी पोषक तूंच सर्वहि जिवा
आनंदवीसी मही ॥
॥ या साठीं तुजही नृपाल पदवी बा
अर्पिली सज्जनीं ॥
॥ वाटे संप्रति क्रोध फार तुजला
आला असे गा मनीं ॥१॥

॥ भुजंग प्रयात ॥
॥ प्रजा--पालनीं दक्ष तूं भूप ऐसा ॥
॥ असोनी अहा रुष्ट झालासि कैसा ॥
॥ भुलेनि गड्या वैभवाच्या सुखाला ॥
॥ मला वाटतें खास भ्रांतिष्ट झाला ॥ २ ॥
॥ नृपाला रसाया तुला आठ मास ॥
॥ सुखानें तई भोग बापा विलास ॥
॥ परी चार मासांत तूं या श्रमावें ॥
॥ न हें योग्य तूंतें अतां तूं रमावें ॥ ३ ॥
॥ स्वकर्यांत वाटे तुला त्रास आला ॥
॥ ह्मणोनीच कां वास एकांत केला ॥
॥ परी सज्जनांचें न हें ब्रीद राया ॥
॥ उडी घालिती दीन दुःखें हराया ॥४॥
॥ तुझ्या वांचुनी शून्य हा लोक सारा ॥
॥ कसा सांग चाले जगाचा पसारा ॥
॥ अहा दीन झालेत बा सर्व जीव ॥
॥ कशी तूज अद्यापि येई न कींव ॥५॥
॥ वरी नेत्र लावूनिया पाहताती ॥
॥ दिना सारखे हे तुला वाहताती ॥
॥ तुझ्या काय हातांत ही होय सत्ता ॥
॥ ह्मणोनी अशी मांडलीसे अनस्ता ॥६॥
॥ कृषांगीं पिकें जाहलीं सर्व पाही ॥
॥ दयेचा तुझ्या अंतरीं लेश नाहीं ॥
॥ कसा जात आहे सुकोनीच पाला ॥
॥ उभी भासतीं तुजसाठीं तपाला ॥७॥
॥ नृपाला कृपाला करी वृष्टिला तूं ॥
॥ जनांचे करी पूर्ण संपूर्ण हेतू ॥
॥ अरे ! बापुडी ही प्रजा दीनवाणी ॥
॥ तुला पाहुनी काय वाटे शिराणी ॥८॥
॥ नृपा घे अशिर्वाद सर्वा जनांचे ॥
॥ तुझ्या वर्णनीं काय जिव्हा न नाचे ॥
॥ असें मात्र होता, न निंदेस पात्र ॥
॥ अरे खास होशील बा दीनरात्र ॥९॥
॥ मला वाटतें ईश नामांमृताचा ॥
॥ कधीं घोंट आह्मी न घेतो फुकाचा ॥
॥ सुखाचा असा सोडितो मार्ग साचा ॥
॥ ह्मणोनी अशा काय देतोस जाचा ॥१०॥
॥ परी तूं पहा येऊनीं एकवार ॥
॥ जगीं चालते नामसप्ते अपार ॥
॥ नृपा रे मुलें माणसें थोर सान ॥
॥ प्रभूचे पदीं आज आहेत लीन ॥११॥
॥ खरी होय मात्रा तुझी रामबाण ॥
॥ क्षणार्धीतची येत उत्कृष्ट गुण ॥
॥ बळें दाविता नाशिकासी करानें ॥
॥ मुखें "आ" करी ओरडे नीकरानें ॥१२॥
॥ अरे सत्व या आर्य भुमींत नाहीं ॥
॥ असे ठाऊकें वृत्त सारें तुलाही ॥
॥ पिळोनी खरा देश नेला परांनीं ॥
॥ तुला कां कथावें आह्मी लेकरांनीं ॥१३॥
॥ तसा वाढला हा जमीनीस सारा ॥
॥ करांचा शिरीं लादलासेच भारा ॥
॥ अहा आर्यजांना न अन्यत्र थारा ॥
॥ अशा संकटीं तूंहि हो पाठमोरा ॥१४॥
॥ तृणाचे खर्जीने नगा ठायिंचे जे ॥
॥ नृपें तेहि केले पहा बंद तेजें ॥
॥ पुरेसा मिळे धेनु वत्सा न चारा ॥
॥ अहा सोशिती बापुडीं पोटमारा ॥१५॥
॥ नसे धान्य-समृद्धि या आर्यदेशीं ॥
॥ तृतीयांश हा लोक राहे उपाशी ॥
॥ पडे अन्य देशीय वस्तू—गराडा ॥
॥ स्वदशी कलांचा उडाला चुराडा ॥१६॥
॥ ह्मणोनी बुडाले स्वदेशीय धंदे ॥
॥ गुलामापरी लोक झालेत बंदे ॥
॥ स्वकर्तव्य सोडी शिके अल्पविद्या ॥
॥ खुदावंत माते ह्मणे नौकरी द्या ॥१७॥
॥ अशानें जगीं जाहलें काय राया ॥
॥ नसे अन्य पोटास युक्ती भराया ॥
॥ तशी भक्ति धर्मावरीची उडाली ॥
॥ अशा पायिं देशास या बुड आली ॥१८॥
॥ भिके लागलं सर्व ही ठाव तूतें ॥
॥ असोनी, अशी कां तुला नीज येते ।
॥ अरे बावरे जाहालो कीं भयानें ॥
॥ करी स्वारि आतां महा वैभवानें ॥१९॥
॥ नृपा ये फडाडीत विद्युत् पताका ॥
॥ स्तनित् दुंदुभीचा उडो दे धडाका ॥
॥ तुझ्या दर्शनें तोष होईल मोप ॥
॥ असें निश्चयें सांगतो हा ल सो. प. ॥
॥ २० ॥

वऱ्हाडसमाचार

मिती अश्विन शुद्ध ६ शके १८१८

जया देशांत शेतीचाच मुख्य धंदा असतो व शेतीवरच लोकांचा चरितार्थ चालतो त्या देशांत शेतकऱ्यांची स्थिति चांगली राखण्या विषयीं सरकारानें खबरदारी घेतली पाहिजे. शेतकरी चांगल्या दशेंत असले ह्मणजे तो देश सुसंपन्न आहे असें ह्मणतां येईल. शेतकरी निकृष्ट अवस्थेला जाऊं लागले ह्मणजे त्या देशावर विपत्ती ओढवली असें समजलें पाहिजे. इंडिया देश या नियमा अन्वयें वाईट स्थितींत येत आहे आणि त्यांतील निव्वळ शेतकीचा असा वऱ्हाड प्रांत अर्थात ती वाईट दशा नाना प्रकारानें सध्यां व्यक्त करीत आहे. सध्या जमिनीचे खरे मालक असे शेतकरी फारच थोडे आहेत. शेतांत मोलमजूरी करणारे शेतकरी बहुतेक सर्व लोक आहेत शेतीचे मालक ह्मणजे सावकार, वकील, व्यापारी किंवा पांढरपेशे लोक या वर्गापैकीं बहुत आहेत. कुणबी शेतकरी आपल्या शेतील पूर्वीच आंचवले आहेत. त्याचा पिढीजादा धंदा शेतीचा असतो आणि त्यांस इतर धंदा कांहींच ठाऊक नसतो यामुळें शेतकामावरच मोलमजूरी मिळवावी लागते. अडनावी शेतकरी ह्मणजे नफ्यानें किंवा बटाईनें शेती वाहणारे असेच बहुत लोक या प्रांतीं उरले आहेत. ही स्थिती चांगली नाहीं. असें आम्ही कित्येक वर्षां पासून सूचवीत आलों पण आमच्या म्हणण्याची सत्यता सांप्रतच्या दुष्काळ प्रसंगीं चांगली कळून येत आहे.

रशिया देशांत जेव्हां शेतकऱ्यांच्या हातच्या जमिनी श्रीमान लोकांच्या हातांत जाऊ लागल्या तेव्हां ती गोष्ट मोठी अरिष्टसूचक व राष्ट्रविघातक आहे असें रशियन सरकारास पक्कें कळून आलें. या विघ्नाच्या निवारणा साठी रशियन सरकारनें सन १८९३ सालीं एक कायदा केला कीं शेतकऱ्याच्या मालकीची जमिन विकली जाऊं नये. या कायद्याच्या योगानें शतकरी जमिनीचे मालक राहिले, आपण जी जमीन नागरतो व पेरतो तिच्यावर आपलें स्वत्व आहे असा त्यांस भरवसा येऊं लागला आणि त्यामुळें शेतकी चांगली सुधरत जाऊन शेतकऱ्यांचा वर्ग असा कायम राहिला. रशियामध्यें आणखी दुसरी एक महत्वाची व्यवस्था अंमलांत येत चालला आहे कीं ज्याच्या मालकीची शेती आहे त्यानें ती घरीं स्वतां वाहिली पाहिजे ह्मणजे निव्वळ स्वामित्वाबद्दल रोकड नफ्याच्या ठरावानें त्याला आपली जमीन वाहितीस देतां येऊं नये. रशियन देशांतील शेतकरी वरील दोन्ही कारणामुळें सुस्थितींत आहेत व शेतीच्या धंद्याला तेथें विशेष आहे. या उदाहरणाचा फायदा आमच्या प्रांताला चांगला होण्या सारखा आहे असें आह्मांस वाटतें.

धान्य फार महाग झालें आहे आणि लोकांस मोलमजुरीचीं कामें मिळत नाहींत. या दोन कारणामुळें लोक मोठ्या कष्टमय दशेला पोचले आहेत. शेतीचीं कामें कांहीं महिने पर्यंत धडाक्यानें चालतात पण यंदा पावसानें दगा दिल्यामुळें रब्बीचे पेरे बंद आहेत व एकंदरीनें शेतीचीं कामेंही अती कमी झालीं आहेत. दुष्काळाचा प्रसंग तर अद्याप लांबच आहे पण लोक अगदीं नादानीला व हलाखीला आले आहेत. धान्य महाग विकलें जातें. त्याला सरकारचा कांहीं उपाय नाहीं. अलिकडे देशान्तरावर धान्यें जाऊं लागल्यामुळें धान्यांचे भाव अती महर्गतीचे असतात व सदा चणचण राहून लोकांच्या जवळ धान्याचा पुरवठाही नसतो. एका प्रांतांतील धान्य बाह्य मुलखावर जाऊं द्यावें किंवा कांहीं मर्यादे पर्यंतच जाऊं द्यावें अशा विषयीं व्यापाराचे नियम ठरलेले आहेत. पूर्वी दुष्काळाच्या ज्या नाना आपदा होत असत तशा आपदा सांप्रतच्या दळणवळणाच्या बाहुल्यामुळें भोगाव्या लागत नाहींत. हिंदुस्थानांतून कोट्यावधि खंडी धान्यें द्विपान्तरावर जातात तसेंच थोड्या दिवसापूर्वीं गव्हाच्या पोत्यांनीं भरलेलीं तीन जहाजें अमेरिकेंतील कालिफोर्निया देशाहून कलकत्यास येण्यासाठीं रवाना झालीं आहेत. कोंठें अमेरिकेंतील कालिफोर्निया व कोंठें इंडिया! कालीफोर्नियांतील शेतकरी इंडियांतील लोकांस धान्य पुरवितो हें अद्भूत नवल होय! धान्याच्या महागाईचीं कारणें विविध गोष्टींवर अवलंबून आहेत आणि ह्या गोष्टी फार पराधीनतेच्य असल्यामुळें त्यांच्या विषयीं सध्यां विचार करण्यांत फायदा नाहीं.

दुसरी गोष्ट कामधंद्याची राहिली. सरकारचा व प्रजेचा संबंध असा कांहीं चमत्कारीक व परस्परास परिपोषक आहे कीं प्रजेच्या पोटापाण्याची तजवीज ठेवणें हें सरकारच्या चिरायुपणाला अवश्यक आहे. हल्लींच्या स्थितींत मोलमजूराची कामें सरकारानें नवीन काढलीं पाहिजेत आणि अशीं कामें निघालीं तरच आतां लोकांचा निभाव लागणार आहे. गेल्या बुधवारीं धुळ्यास जाहिर सभा भरली होती तेव्हां चाळीसगांव व धुळें यांच्या दरम्यान रेलवे करण्याचीं कामें सुरू करावीं अशा विषयीं सरकारास विनंती करण्याचें सर्वानुमतें ठरलें. अशाच तऱ्हेची योजना वऱ्हाड प्रांतांत झाली पाहिजे. हल्लीं अकोला व इंगोली यांच्या दरम्यान रेलवे व्हावयाची आहे आणि ती रेलवे करण्याचें काम सुरू करण्यास ही संधि चांगली आहे. तसेंच आकोल्यास कापशीहून जें पाणी आणिलें आहे ह्या पाण्याचा पुरवठा पुरेसा होत नसल्या मुळें कापशीस तलाव बांधण्याची जरूरी आहे. हीं दोन्हीं कामें अगत्याचीं असून त्यांत पुष्कळ लोकांस रोजगार लागेल. आकोल्यास थोड्या दिवसापूर्वी सभा भरली होती पण त्यावेळीं नवीन कामें काढण्याची सूचना सरकारास करण्या विषयींचा प्रश्न निघाला नाहीं. सरकारानें प्रस्तुतच्या प्रसंगीं लोकांस मोलमजूरी देण्याविषयीं कांहीं तरी तजवीज केली पाहिजे आणि अशी तजवीज झाल्याशिवाय गत्यंतरच नाहीं.

---

हल्लींचा शिक्षणक्रम विद्यार्थ्यांच्या गरजा बरोबर भागवीत नाहीं. विद्यार्थ्यांच्या कला प्रमाणें, ऐपती प्रमाणें व भावी धंद्या प्रमाणें जें शिक्षण त्याला मिळावयाला पाहिजे तें त्याला पुष्कळ प्रसंगीं मिळत नाहीं. श्रीमान व बुद्धिवान विद्यार्थी असला ह्मणजे त्याला बी. ए., एम. ए., किंवा वकील, डाक्टर, अथवा इंजिनिअर होण्याचा राज-मार्ग फार चांगला आहे. पण ज्या विद्यार्थ्यास इतकी विद्या संपादण्याचें धनबल, शरीरबल किंवा बुद्धिबल नाहीं आणि ज्याला उदरनिर्वाहा साठीं कांहीं तरी धंदा लवकर पत्करला पाहिजे त्यास हल्लींच्या शिक्षणक्रमा पासून तादृश फायदा होत नाहीं. अशा विद्यार्थ्यांच्या अर्धवट विद्यार्जनाला शाळेंतील पंतोजीपणा किंवा कचेरींतील कारकुनी हे दोन रोजगार मिळण्यासाठीं सध्यां किती आर्जव, हेलपाटे, व मिन्नतवारी हीं करावीं लागतात हें अनुभवा शिवाय पक्कें लक्ष्यांत यावयाचें नाहीं.

आमच्या शाळांतून इंग्रजी शिकलेले लोक इतर धंद्याला नालायक होतात अशी सार्वत्रिक समजूत आहे. पण ती कांहीं अंशानें यथार्थ आहे. व्यवहारांत चालण्या इतकी विद्यासंपत्ती मिळविल्या नंतर पुष्कळ विद्यार्थ्यांस काय करावें हेंच सुचत नाहीं. ते अनन्यगतिक होतात. त्यास हस्तकौशल्याची गोष्ट अवगतच नसते. सरकारी चाकरीचुकरी शिवाय त्यास कोणताच मार्ग खुला नाहीं अशी त्याच्या मनाची अनवस्था होत आणि अशा विद्यार्थ्यांचे व त्याच्या कुटुंबीय माणसांचे दुनियेदारींत फार फार हाल होतात. कांहीं श्रमानें एखादी विद्या साध्य करून पोट भरण्याची तजवीज होईल तर ती करण्यास असे विद्यार्थी एका पायावर तयार असतात पण अशी तजवीज उपलब्धच नसते ही मोठी दुःखाची गोष्ट होय. ही तजवीज ह्मणजे कांहीं अद्भूत गोष्ट नाहीं. यांत्रिक कला शिकविण्याच्या औद्योगिक शाला जर निघतील तर सध्याच्या कालांत नव्या होतकरी पिढीची चांगली व्यवस्था लागेल. परंतु या शाला निघणार नाहींत तोंपर्यंत विद्यार्थि दशेंतल्या तरूण मंडळीची आशाहानि, बुद्धिवैफल्य व आयुष्यनाश हीं सांप्रत प्रमाणेंच चालूं राहतील ह्मणून खेद मानण्यास मोठेंच स्थल आहे.

---

राव साहेब देवराव विनायक यांच्या लक्ष्यांत वर सांगितलेली विद्यार्थ्यांची दुर्दशा फार बाणली आणि त्यांनीं दयाद्रतेनें आपल्या फ्याक्टरींत औद्योगिक शाळेच्या पद्धतीवर एक वर्ग सुरू केला. या शाळेंत हल्लीं २०।२५ विद्यार्थी आहेत. हे विद्यार्थी थोडे बहुत इंग्रजी ह्मणजे हायस्कुलांतील कांहीं अभ्यास केलेले आहेत. प्रथमतः इंग्रजी देखील शिकविण्याची व्यवस्था ठेविली होती पण पुढें कांहीं अनिवार्य कारणामुळें ती व्यवस्था बंद करण्यांत आली. या विद्यार्थ्यांमध्यें कांहींजण वयाच्या सरक्युलरामुळें विद्यारहित राहणार होते. या तरुण मंडळी पैकीं सात आठ जण आतां फिटरचें वगैरे काम चांगलें शिकले सवरले आहेत. या पत्राच्या लेखकाच्या ओळखीचा एक विद्यार्थी आहे. तो भेटला तेव्हां विचारपूस करितांना तो अवचित ह्मणाला कीं:— "मी या शाळेंत आल्यापासून फार सुखी झालो. दोन वर्षांच्या आंतच मी कोठेंही पंधरा वीस रुपये आनंदानें मिळवूं शकतो. इतकी विद्या मला आतां प्राप्त झाली आहे. १५।२० रुपयाकरितां मला कोणापुढें हांजी हांजी करण्याची जरूरी नाहीं. मी आपल्या बाहुबलावर माझें घर चालवीन" इत्यादि उद्गार त्याच्या मुखांतून निघतांना त्याची ती हास्य मुद्रा व संतोषवृत्ती पाहून मोठा आल्हाद वाटला. या विद्यार्थ्याच्या तोडिचे असे विद्यार्थी पुष्कळ निघतील पण याच्या मुखचर्येवर जी वीरश्री दिसली ती फार थोड्यांच्या मुखावर दृष्टीस पडेल. या फरकाचें कारण औद्योगिक शिक्षण व त्याच्या परिणामीं लाभणारा श्रमसाध्य चरितार्थ हीं होत. या दोन गोष्टी राव साहेब देवराव विनायक यांच्या कृपेनें २०।२५ विद्यार्थ्यांस लाभत आहेत हें त्यांस अत्यंत भूषणावह होय. सध्यां अधिक विद्यार्थी घेण्याकडे राव साहेबांचें लक्ष्य नाहीं पण त्यांच्या मनांत जे विद्यार्थी जवळ आहेत त्यांस मार्गाला लावण्याविषयीं ते फार फिकीर बाळगतात. वरील विद्यार्थ्यांपैकीं कांहीं जणांनीं आकोटास आपल्या अक्कलेनें फ्याक्टरीचीं यंत्रें उभीं करून चालूं केलीं आणि बहुत करून आकोटासच फ्याक्टरीमध्यें त्यांच्या नेमणुका होतील सांप्रतच्या स्थितीला रावसाहेब देवराव विनायक यांनीं आरंभिलेल्या औद्योगिक शाळे सारख्या संस्थांची किती जरूरी आहे हें वरील उदाहरणावरून सहजीं लक्ष्यांत येईल. राव साहेब देवराव विनायक यांच्या या स्तुत्य कृत्यामुळें वीस पंचविस विद्यार्थी सुस्थितीला पोंहचले. हें त्यांनीं एक मोठें महत्कृत्य केलें असें आह्मी समजतों.

---

इंडिया देश ह्मणजे इतर राष्ट्रांत उत्पन्न झालेल्या वस्तूंचें श्रीमान दुकान होय. आमच्या देशांत यांत्रिक कलेचे कारखाने नाहींत आणि आमच्या इंडियन लोकांस ह्मणण्या सारखा रोजगारधंदा नाहीं. आमच्या जवळील पैसा परराष्ट्रीय चीजवस्तु विकत घेण्यामध्यें खर्च होतो. इंग्लंड देश संपत्तीच्या शिखरास त्या देशच्या नाना यांत्रिक कारखान्यामुळें पोचला; आणि त्या बरोबरच आमचा देश रसातळास जात चालला. सध्यां आमच्या देशांत यांत्रिक कारखाने पुष्कळ निघाले पाहिजेत पण ते लवकर निघण्याची आशा मात्र नाहीं ह्मणून वाईट वाटते. इंग्लंडचा माल या देशांत खपतो याचें महत्व तो खपत नाहींसा होऊं लागल्यामुळें चांगलें कळून येत आहे. आगकाड्याच्या पेट्या इंग्लंडच्या फारशा न खपतां जर्मनी, नार्वे, स्वीडन इत्यादि राष्ट्रांच्या पेट्या झपाट्यानें विकल्या जात आहेत. तसेंच छत्र्यांच्या व्यापारामध्यें जर्मनी व जपान या दोन राष्ट्रांनीं इंग्लंडास मागें हटविलें आहे. इंग्लंड देश इतका जेरीला येत चालला आहे कीं पर राष्ट्रांची सरशी इंडियांत न होऊं देण्याविषयीं विलायतेस खटपटी चालू आहेत. इंडियांतील कपडा म्यांचेस्टरच्या गिरण्या बंद पाडतो अशी शंका आल्या बरोबर जकातीच्या कायद्याच्या वेळीं किती तुमुल वाग्युद्ध झालें तें आह्मी विसरलों नाहीं परकीय राष्ट्राविषयीं मत्सर झाला तर त्यांत कांहीं वावगें नाहीं पण इंडियांतल्या कारखान्या विषयीं देखील असा मत्सरभाव दिसतो तेव्हां इंडियन लोकांनीं दोन गोष्टी लक्ष्यांत घेण्यासारख्या आहेत. इंडियांतले परराष्ट्रीय मालाचें दुकान बंद केलें पाहिजे. आणि इंडियन मालाचें दुकान परराष्ट्रांत घातलें पाहिजे. हाच एक इंडियाच्या तरणोपायाचा मार्ग आहे. सांपत्तिक स्थिती सुधरली ह्मणजे देश सुधरतो. संपत्ती मिळविण्याचे राजमार्ग असे कांहीं आहेत कीं ते क्रमूं लागल असतां इतर सुधारणा आपेआप होत जातात.

---

फार वर्षांपासून वऱ्हाड प्रांतासाठीं लांड रेव्हिन्यू कोड तयार करण्याची वाटाघाट चालू होती. प्रथम हें काम रा० रा० गणेश श्रीकृष्ण खाडे यांच्याकडे एक्स्ट्रा असिस्टंट कमिशनर असतांना देण्यांत आलें होतें. पुढें या कोडता संबंधानें पुष्कळ चर्चा चालली होती आणि अखेरीस व्हाइसराय साहेबाकडे शेवटचा दुरुस्त मसुदा धाडण्यांत आला. गेल्या आक्टोबर ३ तारखेच्या ग्याझिट आफ इंडिया मध्यें हें कोड छापून प्रसिद्ध झालें आहे. हा मुलकी कायदा काय आहे किंवा चालूं नियमामध्यें या कायद्यानें काय काय फेरफार केले आहेत हें सवडी प्रमाणें प्रसिद्ध करण्यांत येईल.

---

हल्लीं धान्याचा दुष्काळ येऊन बेतला आहे पण त्या बरोबर येशु ख्रिस्तची दिक्षा देण्याचा सुकाळ झाला आहे. पाद्री लोक आपापल्या धर्म-फंडांतून क्षुधापीडित लोकांस अन्न देतात हा त्यांचा परोपकार खरोखर वर्णनीय आहे पण या परोपकारामध्यें याचक व भिक्षेकरी लोकांस बाटाविण्याचा उद्देश असतो किंवा सहज गत्या लोकांस स्वधर्मभ्रष्ट करून येशूच्या कळपांत ओढण्याचा प्रयत्न सफळ होतो हें मोठें दुश्चिन्ह होय. अन्नान्न करणाऱ्या लोकांस अन्नभिक्षेनें येशूच्या हरिण— वागुरामध्यें फसवावें किंवा मरणप्राय परधर्मगर्तेत तुडवावें या कृत्यांत धर्महेलना, परवंचन व उपकाराची प्रतिक्रिया होते असें आह्मी समजतों. हल्लीं मध्य प्रांतांत व वऱ्हाडांत बायका, पोरें, तरुण मुली इत्यादि माणसें ख्रिस्ताच्या अन्नछत्रांत मोठा घोळका घालीत असतात आणि या वेळीं मिशनरी मंडळीस मोठें जबाबदारीचें काम संप्राप्त आहे आमिषाला मत्स्यंजन भुलला तर नवल तें कोठें! अशा भुलून फसलेल्या व धर्मभ्रष्ट झालेल्या हिंदुजनास पुन्हां स्वधर्मांत घेता येईल अशी आमच्या हिंदुधर्मा मध्यें संग्राहकता नवीन आणण्या विषयीं श्रीशंकराचार्यांची आज्ञा घेतली पाहिजे.

---

मि० इ. एच हानकीन कमिशाखन्न, वायव्य प्रांत, यांनीं असा शास्त्रीय शोध काढला आहे कीं गंगेच्या व यमुनेच्या पाण्यामध्यें असा चमत्कारिक धर्म आहे कीं कालव्याचें मूळ बीज ह्मणून जे कृमी असतात ते त्या पाण्यांत जगत नाहींत आणि नवीन कृमी आले तर ते त्यांत मरतात. आणि नेहमीं आपली समजूत असते कीं पाणी ताप

विलें ह्मणजे त्यांत कालऱ्याचे कृमी राहत नाहींत पण शोधाअंतीं असें दिसलें कीं गंगेच्या व यमुनेच्या पाण्यांत तापविल्या नंतर कालऱ्याचे कृमी कमी न होतां ते पुष्कळ पटीनें वाढत जातात. अस्वच्छतेनें कालऱ्या सारेख रोग वाढतात हें खरें पण त्यांचा उगम कशानें होतो किंवा कोणत्या पाण्यांत होतो हें पक्कें कांहीं सांगवत नाहीं. पाणी स्वच्छ, निर्मळ व शुद्ध करून नंतर पिण्याच्या उपयोगांत आणावें ही गोष्ट ठीक आहे पण तें तापविल्यानें सर्व भिती जाते असा जो समज आहे तो चुकीचा आहे. तसेंच कालरा उभ्दवला ह्मणजे अमूक पाणी त्याज्य किंवा ग्राह्य आहे याचा निवाडा करितांना देखील मोठ्या विचारानेंच काय तो निकाल केला पाहिजे. विहिरीच्या स्वच्छ पाण्यापेक्षां नदीचें गढूळ पाणी अधिक निरोगी व आरोग्यकारक आहे असें कांहीं दिवसापूर्वी मुंबईच्या अनलायझर कडून लिहून आलें होतें. सारांश, हा शास्त्रीय भाग अद्याप पूर्णतेला पोचला नाहीं.

---

दुष्यंत राजाला त्याच्या रथाच्या अतिवेगामुळें कांहींच दूर नाहीं व कांहींच जवळ नाहीं असें झालें होतें; तसा प्रकार खरोखर आगगाडीच्या योगानें हल्लीं झाला आहे, दोन स्थला मधील अंतर म्हणजे कः पदार्थ झाला आहे. आगगाडीच्या अद्भुत शक्तीनें काय काय विचित्र गोष्टी दिसतील याची कल्पना देखील अगाध आहे. चीनच्या राजानें पेकिंग शहरा पासून रेलवे काढून सैबिरिया मधून तिचा सांधा रूस देशाशी व तेथून सर्व युरोप खंडाशी जुळविण्याचा विचार चालूं आहे. चेलियाबिन्स्क पासून व्हायाडिमोस्टाक पर्यंत ४१४७ मैलांचा रेलवे रस्ता होत आहे. सध्यां ७० हजार लोक त्या रेलवेच्या कामावर आहेत आणि एक दोन वर्षांत चीनचे युरोपाशी दळणवळण चांगलें खुषकीच्या मार्गानें सुरूं होईल. क्याले शहरा पासून पेकींग शहर सर्व आठ दिवसांचा रेलवेप्रवास होणार आहे. हा सुलभ प्रवास जगामध्यें एक नवल होणार आहे आणि ह्याच्यामुळें व्यापारांत व इतर दळणवळणांत काय काय फेरफार होतील याचा अंदाजच करवत नाहीं.

---

सन १८९९ सालचा दिवाणी न्याय खात्याचा रिपोर्ट प्रसिद्ध होऊन सरासरी अर्धा पाऊण महिना होत आला. दर सालाप्रमाणें या रिपोर्टांत माहिती समग्र दिली आहे आणि त्याशिवाय जुडिशियल कमिशनर मि० आबर्ड साहेब यांनीं सरळपणाचे शेरेदोरे व अभिप्राय ठिकठिकाणीं नमूद केले आहेत. मि० आबर्ड साहेब वऱ्हाडांत पहिल्या प्रतीचे कायदे-पंडीत आहेत. त्यांस कामाची आवड मोठी असून ते प्रत्येक काम कसोशीनें व चाणाक्षपणानें करितात. या रिपोर्टांत कित्येक स्थळीं ज्या सुधारणांचें दिग्दर्शन केलें आहे त्या सुधारणा यथावकाश व व्यवस्थशीरपणानें मि० आबर्ड साहेब अंमलांत आणितील असा सर्वत्र त्यांच्या कारकिर्दी वरून लोकांस मोठा भरवंसा आहे. या रिपोर्टांत मनाचा मोकळेपणा व व्यक्तिविषयक अभिप्रायाचा सरळपणा विशेष दृष्टीस पडतो.

---

The Berar Samachar

MONDAY OCTOBER 12 1896

On social matters there are divisions in the camp of the National Congress. The bone of contention is the loan of the Congress-mandap for the sessions of the Social Conference. Some Poona people ran mad over the matter in December last and the promoters of the Social Conference dropped the request for the loan of the Mandap. We hoped that the danger ended then and there but to our great disappointment the germ of the quarrel revived again with an exemplary fury in the hearts of Bengali baboos. In the tactics of the opponents of the Social Conference we even foresaw a fatal blow to the National Congress itself. The ultra-reformers in Bengal widened the gulf the more than at Poona. There is no one like the Hon. Mr. Justice M. G. Ranade to abridge the distances between the contending Baboos. It is however a happy sign that the people are again alive to the real magnitude of the Congress-work. The Congress will now be a complete success whether the Social Conference be held in the Congress Mandap or otherwise.

We are of opinion that the loan of the Congress-hall is a trivial matter. It is a pure question of a further waste of money for the erection of a hall for the Conference. No human effort will put asunder our political and social warfares. We are striving after one nationality and we can never achieve the work unless we improve our status both political and social. The political progress and the social progress are two components of our national elevation and we are not in a position to assert which of the two should precede the other. If history be pregnant with lessons for the present or future time we think that both must contribute to the perfection of each other and no one—sided effort will succeed in the manifold and divers phases of human civilization. The separation of the Social Conference from the National Congress will mark the geographical separation of their sessions while they will internally promote one Indian nationality.

---

Poona 9—10—96

Poona is a place of various activities and events worth noticing sometimes occur. Yesterday the 8th current we had the prizes-distribution-ceremony of the Female High School here. The invitation cards called us at 4—45 p. m. to the new school house. It is a fine building of the gothic style built at a cost of about 60,000 Rupees. His Excellency the Governor arrived at 5 p. m. The assemblage was pretty large. After His Excellency's arrival, Rao Bahadoor Narayen Bhai Dandekar read the report giving the details of working, The girls then sang to the Piano forte. Then there was a interesting dialogue and lastly girls were made to sing. The whole thing was a charm. Prizes were distributed then by his Excellency. Certain of the people gave thanks to his Excellency for his attendance. His Excellency made a short speech on which His Excellency expressed his highest pleasure and made some allusion to what was said at the Educational Conference held a couple of days ago. His Excellency meant to say that palatial buildings were not necessary to promote education. A good teacher and intelligent pupil were all that was necessary and in ancient days such buildings never formed the sine qua non of education. The meeting then dissolved.

---

Mr. R. Obbard thus remarks on the work done by Assistant and Extra Assistant Commissioners:—

"The bulk of the original civil work was done by the Extra Assistant Commissioners. This is in accordance with the Resident's wishes. The returns do not indicate that the Assistant Commissioners have been to any great extent relieved of civil judicial work, though the criminal returns show that they have been given and have done an extra share of criminal work, and that the Extra Assistant Commissioners have been to that extent freed from civil judicial and treasury work. Some Assistant Commissioners must of course do civil judicial work; *e. g.*, newly joined Assistants and Assistants under 5 years' service must do such work as training; the Assistant Commissioner at Khamgaon must do the civil judicial work there, and it sometimes happens that there are two Assistant Commissioners at one station, and criminal work sufficient for one alone. As I understand the Resident's orders, it is the senior Assistant Commissioner, where there is one, who is specially to be relieved: other Assistant Commissioners may be employed when their employment seems advisable, provided that the work is as far as possible distributed so as to give Assistant Commissioners the criminal and Extra Assistant Commissioners the civil judicial work. The Resident's wishes have been kept in view and generally given effect to, especially since receipt of the Resident's orders on the Criminal Report for 1894."

---

## वऱ्हाड

हवामान—थंडी पडूं लागली. पाऊस अगदीं गेला असें वाटतें. पीकांची स्थिती वाईट आहे. रब्बीचे पेरे कोठें बंद आहेत व कोठें सुरूही आहेत. दुष्काळाचीं लक्षणें दिसतात. ईश्वराला काळजी!

रा. रा. पी. गोविंद राज अप्पा मुदलीयार एक्ट्रा असि. कमिशनर, वाशिम यांची बदली इलिचपुरास झाली.

मि. एम. पी वाल्श एक्स्ट्रा असि. कमिशनर, आकोला, हे लवकरच १॥ वर्षाच्या फर्लो रजेवर विलायतेस जाणार आहेत. त्या रजेत विलायतेस बारिस्टर बनण्याचा त्यांचा विचार आहे.

खालील पांचजण विद्यार्थी यंदाच्या वकिलीच्या परीक्षेत पास झाल्या विषयीं बातमी कळते:—

हणमंत रावजी खानझोडे.

लक्ष्मण गोविंद ओक.

नारायण रामचंद्र पेंडसे.

शामराव काळोजी देशपांडे.

व्यंकटेश बाळकृष्ण देशपांडे.

मि. डब्ल्यू. एच. लूकस सी. एस यांस हैदराबादेस वऱ्हाडचे असिस्टंट सेक्रेटरी नेमण्यांत आलें.

उमरावतीचे सावकार रा. रा. बाळकृष्ण नाईक पेंडसे यांस देवाज्ञा झाल्याची बातमी कळली.

गोरगरीब लोकांस जवारीचा भाव ६० रुपये खंडी पेक्षां अधीक पडूं नये ह्मणून गरीब लोकांसांठीं येथील मुनसिपालिटीनें एक जवारीचें दुकान घातलें आहे. नागरिक लोकांकडून वर्गणी जमविली आहे. आणि ह्या फंडाच्या जोरावर हें दुकान चालविण्यांत येत आहे. ज्यानीं त्यांनीं आपल्या वार्डांतील मुनसिपल सभासदांचा दाखला आणावा कीं अर्जदार हा गरीब मनुष्य असून त्याच्या घरीं अमूक पायली जवारीचा खर्च आहे. या दाखल्या प्रमाणें मुनसिपालिटीच्या दुकानावर ६० रुपये खंडी या भावानें जवारी विकली जाईल. धनिक लोकांनीं या उदार कृत्यास आपला आश्रय द्यावा ह्मणजे गोरगरीबावर मोठे उपकार होतील.

### बाजार भाव

| | दर खंडीस |
|---|---|
| आळशी | ९१ रुपये |
| जवारी | ७२॥ रु० |
| गहूं ( कांठे ) | ११० रु० |
| ,, ( बनशी ) | ११९ रु० |
| चणे | ९१ रु० |
| तेल | ६। रु० मण |
| तूप | ८ मण |
| सोनें | २७ तोळा. |
| चांदी | ९३ भार |

---

### नोटीस

रा० रा० दत्तु वल्लद लक्ष्मण माळी राऊत रहाणार वाबुटगांव जहागीर तालुके अकोले यांस खालीं सही करणार पऱ्यानीं मर्द दतु हल्लीं रहाणार लासोरे तालुके दर्यापूर– नोटीशीनें असें कळविते कीं तूं माझा लग्नाचा नवरा असून आज सुमारें ४ चार वर्षे मी आपल्यां बापाच्या घरीं तुझे नांवावर कर्ज काढून आहे आतां मजला कर्जही मिळत नाहीं व तूं माझे अन्नवस्त्राची कांहीं एक दाद घेत नाहींस. तुजला आज पावेतो बहुत वेळा सांगितले. परंतु कांहीं एक दाद नाहीं ह्मणून तुजला ह्या नोटिशीनें असें-कळविते कीं नोटीस पावल्या पासून आठ ८ दिवसांत चार वर्षांचे खावटीचे रुपये ( २०० ) दोनशें आणून देऊन पुढें माझें अन्नवस्त्राचा बंदोबस्त करून मजला घेऊन जावे. मी येण्यास तयार आहे. असें झालें नाहीं तर मी दुसरा घरठाव ही तुझी सोडचिठ्ठी समजून करीन. मग माझेवर कोणत्याही प्रकारचा हक्क नवरेपणाचा तुझा नाहीं. नोटीशींत सदरी लिहिले प्रमाणें खावटीचे रुपये २०० दोनशें व पुढें अन्नवस्त्राचा बंदोबस्त केल्याबद्दल चार जात भाईची खात्री करून द्यावी. असें झालें नाहीं तर अगोदर अन्नवस्त्राबद्दल व खावटी बद्दल फिर्याद करून काय तो निकाल होईल. हे अगोदर कळविते आहे. कळावें. तारीख १० माहे आक्टोबर सन १८९६ इसवी.

( सही )

सहीचो निशाणी बांगडी पऱ्यानीं मर्द
दतु माळी राऊत राहणार
लासोरे ता० दर्यापूर
इच्या हातची असे.
तर्फे परभू वल्लद आकोसा माळी रहाणार
उमरी.

---

## वर्तमानसार.

जंगलाबद्दलचें शेटलवर्थतत्व जर पूर्णपणे अमलांत आलें असतें तर १०।२० वर्षांनीं या तापसराईच्या साथीमुळें मुंबईशहर ओसाडही पाडावें लागलें असतें, अगर प्रत्येक घरास एकेक डाक्टर असा प्रकार तरी करावा लागला असतां. पण तें शेटलवर्थतत्व अजून अमलांत आलें नाहीं हें मुंबई शहराचें सुदैव आहे. तरी मुंबई शहरांत असल्या साथींची वृद्धी होऊं नये असें वाटत असेल तर आज नाहीं उद्यां केव्हां तरी मुंबईच्या आसपासच्या जंगलाचीं कुलपें काढावीं लागतील यांत कांहींच शंका नाहीं.

पहा बुवा, मुंबई हवी असली तर जंगलचीं कुलपें काढा आणि जंगल हवें असलें तर केव्हां तरी मुंबईची आशा सोडण्यास तयार व्हा.

पाच चारशें जंगली लोक जंगलांतून मोळ्या आणून वसई गावांत विकण्यास आले त्यांतील प्रत्येक मोळीवाल्याबरोबर हातांत काठी घेतलेला एकेक रिकामा माणूस होता. हा तांड्याचा तांडा अशा रीतीनें गावांत शिरतांच वसई गांवच्या लोकांस मोठा चमत्कार वाटला. त्यांतल्या कित्येक मोळ्या गावांत विकल्या व कांहीं मोळ्यांस गिऱ्हाइक नसल्यामुळें सगळ्या गांवभर फिरून परत गेल्या. जंगलांतून सुकीं लाकडें आणण्याच्या मनाईचा जो जाहिरनामा लागला आहे त्याप्रमाणें त्या मोळ्यावाल्यांस पकडण्याचा वगैरे कांहीं इलाज झाला नाहीं. या मोळ्याविक्यांत कांहीं बायकामुलेंही होतीं व त्यांतल्या अन्नार्थी अशा कांहीं लोकांस वसईच्या कांहीं लोकांनीं कांहीं खाण्यापिण्यासही दिलें असें एक गृहस्थ सांगतो.

बसोऱ्याचा इंग्रज राजकीय वकील सांगतो कीं, तेथील तग्री नदीच्या प्रवाहांतलें पाणी उन्टें भरभरून निपाणी मुलखांतल्या लोकां करितां नेण्यांत येत असल्यामुळें त्या नदीच्या प्रवाहांत आतां पाणी फार कमी झालें व त्यामुळें नदींतून गलबतें चालण्याचें कठीण झालें आहे. नदीचें पाणी वाहून जाण्याचें बंद करण्याची तजवीज लवकर न केली तर नदींतून नावा चालण्याचें बंद होऊन व्यापाराची मोठी अडचण होईल असेंहि त्याचें ह्मणणें आहे.

तिबेटांत बर्फ पडण्याची सुरुवात झाली. गेल्या वर्षीं ९ अक्टोबर रोजीं प्रारंभ झाला होता.

कालर येथें एक फकीर मेला. त्याचें प्रेत स्मशानांत नेलें व खाड्यांत ठेवलें. माती लोटण्याचें काम सुरू झालें इतक्यांत तें खाड्यांतलें प्रेत कोठें नाहींसें झालें. लोकांनीं पुष्कळ शोध केला पण सांपडलें नाहीं असें लाहोरच्या एका पत्रांत लिहिलें आहे.

टर्कीच्या दरबारचा फ्रेंच वकील गेल्या आठवड्यांत सुलतानास भेटला आणि पुन्हा कत्तल वगैरे सुरू होईल तर सर्व युरोपियन राजे हत्यारबंद होऊन ती कत्तल बंद करण्याकरितां पुढें येतील असें सुलतानास बजावलें. यावरून टर्कीचें राज्यच जरी नाहींसें करण्यांत आलें नाहीं तरी राज्याधिकाऱ्यांत बदल करण्यांत येईल.

मर्व्हे टर्कोमन प्रांतांत एक प्रकारची तापसराई सुरू झाली असून १०,००० माणसें मेलीं. यांत मुलेंच फार मेलीं. ठा. अ.

आग्र्यास एका एकी पोलिस आफिसर, चौकीदार वगैरे बरेच लोक हरामखोरांनीं गोळ्या घालून ठार केले.

पारिस प्रदर्शनांत ठेवण्याकरतां एक कागदी भूगोल पंचवीस मजली उंच तयार होत आहे.

निजाम हैद्राबादेंतील नबाब जाफरजंग यांस विषप्रयोग केल्याची बातमी आली आहे.

मदुरा शहरीं विश्वनाथ शिवराज नावचे महायोगी २४ वर्षे सतत योगाभ्यासांत दंग होऊन स्वस्थ बसले आहेत.

सागर जिल्ह्यांत लुगडीं, दोरवे व धोतरें उत्तम प्रतीचीं देशी होत असून अति स्वस्थ माल मिळतो. देशी दुकानदारांनीं एकवार तिंकडील माल आणवून अनुभव घेण्या विशीं खांडव्याकडील पत्रकार सुचवितात. म० मि०

देशी कारागिरी—लाहोर येथील एका लाला बक्षिराम नांवाच्या गृहस्थानें आपोआप हालणारा पंखा तयार केला आहे, तो खुर्चीस अगर पलंगांस बांधून एकदां त्याला गति दिली ह्मणजे तो सारखा वेगानें २ प्रहर फिरत राहून मनास आल्हादकारक असा एकसारखा वायु खेळवितो. या पंख्याची किंमत जवळ जवळ ४० रुपये होईल. ह्या कारागिरीबद्दल पेटंट मिळवण्याकरितां त्यानें अर्ज केला आहे अशांना उत्तेजन मिळालें पाहिजे.

दीनाश्रम–गोरखपूर येथें अनाथ आणि मुकें फिरणाऱ्या लोकांस अन्नदान देण्या करितां दीनाश्रम नांवाची एक संस्था स्थापन झाली आहे.

शिपाई लोकांत दंगा—मागील शुक्रवारीं कटक येथून अशी खबर आली कीं, तेथील सैन्यांतील शिपाई लोकांमध्यें फार मोठा दंगा झाला आहे या दंग्यामध्यें पुष्कळ लोकांस फार मोठ मोठाल्या जखमा झाल्य आहेत.

सध्या जपान येथें दुष्काळ पडल्यामुळें त्या सरकारानें एक खास हुकूम प्रसिद्ध केला आहे कीं, सरकाराजवळून लेखी परवाना घेऊन पाहिजे त्या कुंटुबानें आपल्या मुली विकाव्यात. आ. व.

कान्स्टांटिनोपल येथें दंग्याधोक्याचीं चिन्हें विशेष दिसूं लागल्यामुळें पुष्कळ कुटुंबें तेथून दूर निघून जात आहेत.

माटाबेल येथें झालेल्या दंग्यांत सुमारें २९० ब्रिटिश शिपाई ठार झाले व ९२ इसम जखमी झाले आहेत.

आर्मीनियन लोकांनीं सुलतान साहेबांस नवथर व एक मानपत्र दिलें त्यावेळीं सुलतानानें त्यास प्राटिआर्च नेमण्याची परवानगी दिली.

टोळधाड–हल्लीं अखिल भरतवर्षांत पर्जन्यवृष्टीवांचून सर्व शेतें करपून चाललीं असून लोकांचे डोळे आकाशाकडे लागले आहेत असें असून उत्तरहिंदुस्थानांत कित्येक ठिकाणीं टोळ उत्पन्न झाले असून त्यांनीं कित्येक प्रांतांत मोठा नाश आरंभिला आहे. असें तिकडील पत्रांवरून कळतें.

मुलांची विक्री–हुशंगाबादच्या पलीकडील दुष्काळ–पीडित मुलखांत लोकांचे फारच हाल होत आहेत. पोटाची खळगीं भरण्यास कांहीं साधन नसल्यामुळें कित्येकांनीं मुलें देखील विकलीं पण या प्रसंगीं मिशनऱ्यांची बरीच पोळी पिकली आहे. हीं विकावयास आणलेलीं पोरें ते लोक विकत घेतात असें ह्मणतात.

सोलापूर, बार्शी, पंढरपूर इकडे चांगला पाऊस झाला ह्मणतात. शुक्रवारीं ठाण्यासही बराच पाऊस झाला, नागपुराकडे बुधवार, गुरुवार व शुक्रवार तीन दिवस पावसानें चांगली मौज करून दिली. मिरज, सांगली मालवण इकडेहि पाऊस झाल्याची बातमी आहे. यावरून घाबरण्याचें कारण दिसत नाहीं. नगरकडे व वाईस ता० २९ रोजीं पाऊस झाला.

मेलेली जिवंत झाली.–गेल्या आगष्ट महिन्यांत कानपूर येथील पोस्टमास्तराची २ वर्षांची मुलगी गतप्राण झाली असें समजून तिकडील हिंदुरित्यानुसार त्यांनीं तिला गंगेंत फेकून दिली. ती वाहत जात असतां तिचे पाय हालत आहेत असें लोकांस दिसल्यावरून त्यानें तिला प्रवाहांतून बाहेर काढलें त्यावेळीं ती मुलगी जिवंत आहे असें समजलें. अद्यापि ती मुलगी जिवंत आहे. बिचारी काळाच्या तावडींतूनच परतली ह्मणावयाची!

विलक्षण नदी–स्पेन देशांत टिंटो नांवाची एक नदी आहे. त्या नदीच्या पाण्याचा असा गुण आहे कीं, तीतील वाळू एकमेकांस लागून तिचे दगड बनतात. बाहेरचा दगड जर ह्या नदीमध्यें पडला तर तो तींतील दगडाशीं संलग्न होऊन थोड्याच महिन्यांत ग्रप होतो! ह्या नदींत मासे वाचत नाहींत. पुरानें येणारी वाळू तळाशीं शिलामय होऊन बसते! त्यामुळें तिच्या पात्रांत कोठेंहि मुटभर वाळू सांपडणें कठीण आहे. सृष्टींतील अनेक चमत्कारांपैकीं हा एक चमत्कार आहे असें ह्मटलें पाहिजे. श्री स. वि.

हिंदुस्थानचें धान्य युरोपांत जातें हें प्रसिद्धच आहे. पण हल्लीं युरोपांत जो धान्याचा भाव आहे त्याहून हिंदुस्थानांत १०।१२ टक्यांनीं जास्त भाव आहे, यावरून आज धान्याची महागाई हिंदुस्थानांत किती आहे हें स्पष्ट होतें. हा असा प्रकार असूनही युरोपांतले व्यापारी हिंदुस्थानांतल्या आपल्या एजन्टास हिंदुस्थानांत धान्याची खरेदी करण्याच्या तारा पाठवीतच आहेत. याशिवाय तीन तिर्कटी तारें कालिफोर्नियांतला गहूं भरून हिंदुस्थानांत विकण्या करितां येत आहेत अशी एक तार प्रसिद्ध झाली आहे!! यावरून बिचाऱ्या हिंदुस्थानची पुढें काय वाट होणार कोण जाणे.

अलीकडे मुंबईच्या आसपास जी जंगलाची फाजील वृद्धी झाली आहे तीच या तापाच्या साथीचें कारण आहे असेंहि कित्येकांचें ह्मणणें आहे.

लक्ष्मीपूर येथील मदत–जिल्हा–माजिस्ट्रेट मि० हमिल्टन यांच्या पुढें एक खटला चालला असतां साहेबांची तब्येत बेहोष होऊन त्यांनीं आरोपीस कागदावर दडपण ठेवलेल्या लोखंडी तुकड्यानें मारिलें. तो मनुष्य बेशुद्ध पडल्यामुळें वैद्याचे उपाय सुरू आहेत. चांगले न्यायाधीश.

अजब फसवेगिरी—विजयनगरच्या राजाचें सोंग घेऊन कांहीं भामट्यांनीं शिकंद्राबाद येथें निजाम सरकारचे बंगल्यांत प्रस्थान ठेविलें. त्या पैकीं एकानें डे० कमिशनरांची भेट घेऊन विजयानगरचे राजे आले आहेत अशी त्याला [illegible] दिली, त्यावरून डे० कमि० भेटीस गेले [illegible] तो सर्व थाट राजाचा! पुढें हुजूरास नजराणा देण्याकरितां २।३ हजार रुपये द्या असें मागणें त्यांनीं केल्यावरून सावकाराकडून रुपये देवविले. नंतर सावकाराचे लोक मागण्यास गेले तो तेथें राजा नाहीं व कोणी नाहीं सर्व लबाडी असें कळलें. ह्या तोतयाचा शोध हल्लीं चाललेला आहे असें गुलबर्गा समाचारावरून कळतें. दी० ब०

चमत्कारिक देखावा— बेझवाड्यानजीक गेल्या ४ थ्या तारखेस एका ठिकाणीं जमिनींतून एक आगीचा झोत निघून आकाशांत जात असलेला दिसला. जवळच एक बैल होता तो निचेष्ठ होऊन पडला. [illegible] वेळानें त्याची हालचाल सुरू झाली ह्या आगीच्या झोताची एक ज्वाळा पळून जात असलेल्या एका मनुष्याचे अंगास लागली; व त्याचें अंग सुजलें हा त्याचा परिणाम झाला. नंतर त्या आगीच्या झोताचा धुराचा लोट बनला आणि तो जोरानें चक्राकार फिरत फिरत वर दोन मैल पर्यंत जाऊन मग दिसेनासा झाला. क. त.

बागलकोट तालुक्यांत, तालीकोटास गणपती पोंचविल्यावर एका मुसलमानानें पाण्यांतील एक गणपती आणून तो झाडाला टांगला, आणि त्यामुळें तेथील लोकांना अत्यंत वाईट वाटत आहे असें बागलकोटच्या पत्रावरून कळतें. कोण दोष हा!

दंगा— निगापट्टमाजवळ मेनारडी येथें गेल्या आठवड्यांत मिशनरींचा वार्षिक मेळा भरला होता त्यावेळीं एका ब्राह्मणाच्या मुलाला पाद्री बाटविणार अशी भीती हिंदुलोकांस सुटल्यामुळें त्यांनीं जमाव करून मिशनऱ्यांचा समाचार घेतला! स शो.

जपानांत १०५,०२२ बुद्धधर्मी गुरु आहेत.

रोम येथील मुख्य ख्रिस्ताचार्य पोप स्वतः कधींहि धर्मोपदेश करण्यास उभे राहात नाहींत.

सातारा—पर्जन्य पडूं लागला, उष्मा होतो, वाऱ्याचा उपद्रव कमी झाला.

हिरे वजन करण्याचा कांटा इतका सुक्ष्म व तंतोतंत असतो कीं, त्यांत जर एक पापणीचा केश टाकला तर तो कांटा झुकतो.!

घोडा, गाय, बैल, आणि मेंढरू ही जनावरें अनुक्रमें एका वर्षांत आपल्या शरीराचे वजनाच्या ९, ९ स ६, ६ पटींनीं जास्त वजनांचें खाणें खातात. [illegible]. च.

---

☞ हें पत्र आकोला येथें कै० वा० खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

साल अखेर „ ७ „ १ ०८
किरकोळ अंकास.....................८४

नोटिशी बद्दल
१० ओळीचे आंत रु० १
दर ओळीस ..........८। ८६
दुसरे खेपेस ..........८

Annual in arrears 7 „ 1 Rs. 8 as 5
Six monthly........ 3 ...... ...... „ 8 as
Single copy .................... 4 as

Advertisement.
Below 10 lines ... 2 Rs
Per line over 10 ... 4 as.
Repetition Per ine ...3 as

# वऱ्हाडसमाचार.

THE BERAR SAMACHAR

VOLXXX AKOLA MONDAY 19 OCTOB R 1896 NO 41

वर्ष ३० आकोला सोमवार तारीख १९ माहे आक्टोबर सन १८९६ इ० अंक ४१

## जाहिरात

### मुंबई बँकची ठेव ठेवण्याचा बँक.

या सेव्हिंग बँक मध्यें खालील अटीवर ठेव ठेविली जाईल.

कोणत्याही एका वर्षात ह्मणजे जानेवारी-च्या १ ले तारखे पासून तो डिसेंबरच्या ३१ तारखे पर्यंत फक्त एक हजारा पर्यंत रुपये ठेविले जातील.

दोन अथवा अधिक मनुष्यांच्या नांवानें देखील एक ठेव ठेविता येईल. व त्यांच्या हयातीत, तसेंच त्यांचे पैकीं कोणी वारले तर त्यांचे मागें त्यांच्या पैकीं एकास अथवा अधिक जणांस ठेव काढतां येईल.

एका वर्षांत एक हजार रुपया पर्यंत ठेवलेल्या रकमेवर दरसाल दर शेंकडा ३ दोरुपये व्याज दिलें जाईल. मात्र ५००० पांच हजारा वरील रकमेस व्याज नाहीं.

मुंबई व्यांक आकोला १०।७।९६. } R. Aitken Agent

### नोटीस

रा० रा० गोविंदा वल्द बुलाजी राठोड राहणार वाडळ ता० अकोट यांस खालीं सही करणार इजकडून नोटीस देण्यांत येते कीं तूं माझा गंधरवाचा नवरा असून आज १२ बारा महिने झाले वागवीत नाहींस व फारकती मागितली ती देत नाहीं व खाण्यास देत नाहीं त्यास अन्नवस्त्राबद्दल मजला रुपये ५० कर्ज झाले आहेत तुह्मी ही नोटीस पावल्या पासून आठ दिवसाचे आंत अन्नवस्त्राबद्दल मजकडे झालेले कर्ज देऊन मजला वागवाव असें न केल्यास ही फारकती समजून मी दुसरा नवरा करीन मग तुमचा माझ्यावर कोणच्या ही प्रकारचा हक्क राहणार नाहीं. कळवें तारीख १३ माहे आक्टोबर सन १८९६ इ०

सही

मुली मर्द गोविंदा राठोड राहणार खवदळ हिलाबाद निशाणी हातची बांगडी.

जळगांव ता० १२।१०।९६

अलिकडे सर्वत्रच पावसाची हाकाहाक आहे. दिवसा चैत्र वैशाख महिन्यांतील उन्हाळ्या प्रमाणें ऊन पडतें व रात्रीं स्वच्छ चांदणे पडतें. सर्व लोकांचे डोळे पावसाकडे लागले आहेत. तथापि आजच ह्मणजे अगदीं धान्य नाहीं असें मुळींच नाहीं. शेतांतील पिकें हीं अगदीं बुडालीं असें ही नाहीं. पीकें ह्मणजे जवारी व कपाशी अगदीं हिरवीगार व चांगल्या स्थितींत आहेत. असें असून ही आमचे येथें फारच गरबड उडून गेली आहे. याचीं कारणें अशी दिसून येतात कीं एक तर अलीकडे आगगाडीच्या योगानें धान्य बाहेर जातें. दुसरें हें कीं बहुतेक वऱ्हाडांतील लोकस्थिती वाईट आहे. कुणबी ह्मणजे नुसते मेहनत करणारे झाले आहेत. जमिनीचे मालक सावकार लोक झालेले आहेत. बिचाऱ्या कुणबी लोकांसारखी शोचनीय स्थिती कोणाचीच नसेल. त्यांनीं नित्य कष्ट करावेत, आलेलें उत्पन्न सावकारास द्यावें, तेंही केवळ व्याजाच्या फेडींत जाऊन शिवाय त्यांचे उगवर कर्ज बहालच; सारांश त्यांस पोटभर अन्न मिळण्याची सुद्धां मारामार! त्यांत जर यंदा सारखें अवर्षणाचें साल आलें ह्मणजे तर प्रथम उपवासी तेच मरणार. पहा काय चमत्कार आहे? खरें उत्पन्न करणारे ते आणि खाणारे व मजा मारणारे निराळेच मनुष्य स्वभावास काय ह्मणावें? कितीहि पैसा अतला किंवा मिळाला तरी हाव आहेच. सावकार लोक त्यांची कशाला कींव करतील. प्रत्यक्ष जरी नाहीं तरी एकंदरीनें विचार केला असतां सावकार लोक केवळ त्यांच्या हाडा मासावर व रक्तावर चैन मारतात असें होत नाहीं काय?

जरा पाऊस उघडला असें पाहिल्या बरोबर वरील सावकार लोकांनीं जवारीचा भाव उगीच एकदम वाढविण्यास आरंभ केला. अर्थातच वर लिहिल्या वरून कळेलच कीं काय तो सर्व कांहीं माल धान्य वगैरे सावकारापाशींच असावयाचे आणि त्यांचा इरादा अर्थातच केव्हां दुष्काळ पडेल आणि साठविलेल्या जिनसांचे पैसे होतील केव्हा. पूर्वी निवळ असा प्रकार नव्हता धान्याचा सांठा बाहेर न गेल्यामुळें नित्य स्वस्ताई राहून शिवाय सांठाही मुबलग राहत असे व प्रसंगीं फार उपयोगी पडत असे. येथील पेठ आगोदरच कान्ही आहे त्यांतून ही दुकानदार केवळ केवटी व अगदीं भिकार आहेत तेव्हां त्यांस ही एक प्रकारची भाव वाढविण्यास संधीच सांपडली. आतां पूर्वी प्रमाणें जरी नाहीं तरी कांहीं दिवस पुरेल इतका सांठा आहेच. पण विकतो कोण? निदान १०० शेंभर रुपये खंडी भाव आल्या वांचून पेव काढावयाचें नाहीं. मग बाजारांत जवारीचा पुरवठा नसणें हें सहाजिक आहे. होता होता तारीख २९।३० रोजीं बाजारांत शेंकडो गरीब लोकांस जवारी मिळेनाशी झाली. एकच कल्होळ माजून गेला. शेवटीं सुदैवानें आमचे येथील दयाळू रा रा. माधवराव साहेब तहशिलदार यांस तें कळतांच ते स्वतः ता १ रोजीं बाजारांत गेले आणि कांहीं व्यापाऱ्या कडून चांगली जवारी ९ पैसे पायली या भावानें विकण्यास लावली. शेंकडो लोकांच्या झुंडी पडून सर्व गरीब लोकांस निदान चांगली जवारी तरी मिळाली. व हल्लीं बाजारांत दोन तीन व्यापारी सक्त हुकूमावरून जवारी विकीत आहेत. एकदम सर्व गडबड बंद झाली. सर्व कांहीं व्यापारी लोकांच्या तृष्ण पासून उद्भवलें होतें हें स्पष्ट आहे.

ही गडबड अगदीं बंद व्हावी याजकरितां राव साहेब तहशिलदार यांनीं एक फार उत्तम योजना केली. ती अशी कीं येथील सावकार मंडळी जमवून त्यांजकडून सुमारें १००० हजार रुपयांचा एक फंड जमा केला. व त्याची जवारी विकत घेऊन विकीस ठेविली. ही रक्कम सावकारास परत न देतां त्याची पुन्हा जवारी खरीदी करावयाची. येणें प्रमाणें नित्य जवारीचा पुरवठा राहून सर्वांस जवारी मिळावी अशी तजवीज केली आहे. ही योजना झाल्या पासून सर्व गडबड बंद झाली आहे. याच प्रमाणें इतर गावीं ही व्यवस्था करण्यासाठीं राव साहेब तालुक्यांत फिरणार आहेत. वडशिंगीस याप्रमाणें व्यवस्था केली आहे. सारांश राव साहेबांचे लक्ष उत्तम व्यवस्था लागण्याकडे लागलेलें आहे; आणि लवकरच सर्व तालुक्यांत चांगली व्यवस्था राहाल असें वाटतें.

तालुक्यांतील जवारीच्या सांठ्यांची चवकशी झाली. सरासरी एका मनुष्यास एक मण सव्वामण जवारी शिलक आहे असें कळतें. तेव्हां यावरून सहज दिसून येईल कीं फार तर दोन महिने दम धरवेल, परंतु पुढें कठीण. दुसरें असें कीं हल्लीं मजुरी अगदीं नाहींशी झाली आहे. तेव्हां सरकारनीं कामें काढणें अवश्य व जरूरीचें आहे. असें झाल्यावांचून मजूर लोकांस अन्न मिळणें कठीणच आहे.

पूर्वीच लोक सांगतात कीं सुमार सन १२६४।६५ सालीं काळ पडला होता त्यावेळीं हैद्राबादचे नवाब साहेब ह्मणजे निजाम सरकार यांनीं रयतेस एकदम २ वर्षाचा सारा माफ केला होता. आमचे दयाळू इंग्रज सरकार असें कांहीं उदारपण दाखवितील काय? निदान सवाई दिढी तरी माफ करतील काय? उदारत्व प्रगट करण्यास हाच काळ होय. नानाप्रकारची कामें काढून मजुरी वाढवावी. हल्लीं मजूरदार यास चरितार्थ चालविण्यास अगदीं काम नाहींसें झालें आहे. सरकार याजबद्दल विचार करतीलच.

लोकांवर कठीण प्रसंग आला ह्मणजे खरे दयानिधी कोण हें कळतें. अशाच प्रकारचाच एखादा हरीचा लाल असा आढळून येतो कीं त्याजविषयीं काय ह्मणावें हें सुद्धां कांहीं समजत नाहीं. या गांवांत निदान अशा प्रकारचा एक पुरुष आहे हें लिहिण्यास फारच आनंद व भूषण वाटतें. आज पंधरा दिवसांत त्यांस गरीबांच्या काळजीनें खरोखर चैन नाहीं, आता हें लिहिणें ज्यांस प्रत्यक्ष माहित नाहीं त्यास कदाचित् खोटे निदान अतिशयोक्तिचें तरी वाटेलच. परंतु आह्मी प्रतिज्ञेवर सांगतो कीं यांत अगदीं असत्याचा अगर अतिशयोक्तिचा लेश सुद्धां नाहीं. श्रीमंत रा. रा. दीनानाथ गोपाळ बाबासाहेब यांच्या थोरवीचें काय वर्णन करावें यावरून त्यांची योग्यता सहज कळून येईल हे प्रत्यक्ष अनुभवानें लिहिलें आहे तो पुरुष खरोखर तसाच आहे. आणि शेवटीं प्रसंग पडल्यास आपलें सर्वस्व खर्ची घालून तोच पुरुष गोर गरिबांस फुकट अन्नदान करील अशी खात्री आहे नाहीं तर आमचे व्यापारी श्री. शिवाजी फंडास एक णाणा देतां देतां रडकुंडीला आणीत मग पुढें इतर धर्म कितपत होतील हें सांगणेंच नको.

क्ष

वऱ्हाडसमाचार

मिती अश्विन शुद्ध १३ शके १८१८

हुंडणावळीच्या भावांतील चंचलपणामुळें युरोपियन अमलदाराचें बहुत नुकसान होऊं लागलें ह्मणून त्यांस 'काम्पेनसेशन अलावन्स' या संज्ञेखालीं त्यांच्या पगारांत बढती दिली. साधारण पणें या जाफा पगाराचा मतलब असा कीं गोरे लोक जेव्हां विलायत सोडून या देशांत अधिकारी व हुद्देदार बनून आले तेव्हां त्यांस जो पगार ठरवून दिला होता तो रुपयामध्यें मिळत असल्यामुळें व सोन्याचा भाव फार वाढल्यामुळें त्यांचा पगार त्यास कमी वाटूं लागला ह्मणजे पूर्वी जेवढ्या पगारांत विलायतेंतील गृहव्यवस्था त्यांच्या होत होत्या त्या सोन्याचें नाणें रुपयामध्यें बहुमोल झाल्यामुळें तेवढ्या पगारांत होईनाशा झाल्या. अशा अमलदारांस मदत व्हावी या हेतूनें सरकारनें काम्पेनसेशन अलावन्स नेमत करून दिला. सध्यांचा वेळ हा अलावन्स बंद करण्याचा आहे. त्याच्या ऐवजी दुष्काळ अलावन्स ह्मणून सरकारनें नवीन काढला पाहिजे. सरकारी नौकराचा पगार त्यांच्या दर्ज्या प्रमाणें ठराविक असतो. दुष्काळामुळें या ठरीव रकमेंत लोकांचा चरितार्थ चालत नाहींसा झाला आहे. हुंडणावळीचा अलावन्स देण्या इतकी ज्या सरकारची दयार्द्रता प्रकाशित झाली त्या सरकारनें दुष्काळ-पगार ह्मणून कांहीं निराळी व्यवस्था आपल्या नोकरा संबंधानें

करावी असें ह्मणणें ह्मणजे दयार्द्र सरकाराला न्यायाला धरून दया करा असें ह्मणण्या सारखें आहे.

दुष्काळ पडला असें लोक ह्मणोत अथवा न ह्मणोत, हल्लीं धान्याचे भाव फार वाढले आहेत आणि दुष्काळांत या पेक्षां काय अधीक होत असतें हें आह्मास समजत नाहीं. अशा प्रसंगीं सरकारनें आपल्या नोकरांस द्रव्यदारा मदत केली पाहिजे असें आह्मास वाटतें. इतर रयते बरोबर आपल्या चाकरांचा सरकार समाचार घेईलच पण त्यांच्या संसाराला सरकारानें पगाराच्या द्वारानें कांहीं हातभार लाविला पाहिजे. जर हुंडणावळीचा अलावन्स चालूं करणें सरकारचें कर्तव्य होतें आणि तें कर्तव्य सरकार देशाचा खजिना रिता होता. तेव्हां बजावण्यास विसरलें नाहीं तर. नेटीव नोकरांचा अशा दुष्काळाच्या प्रसंगीं सरकारावर हक्क आहे कीं त्यांस पगारा मध्यें कांहीं तरी अधीक रकम सरकारानें दिली पाहिजे.

मनुष्य श्रीमान असो किंवा गरीब असो, ज्याच्या त्याच्या मानानें दुष्काळ प्रत्येकास चांगलाच भोंवतो. त्यांतल्या त्यांत जे मध्यम वर्गातील लोक आहेत त्यांचे हाल फार होतात. साधारणपणें ज्यांचे पोट हातावर चालतें किंवा जे मिळवावें त्यांच्यावर सुखासमाधानानें ज्यास रहावें लागतें अशा लोकांस दुष्काळांत नानाविध अडचणी येतात. ज्यांस पगार मोठे आहेत ह्मणजे ज्यांस महिना किती रुपये ब्यांकेंत ठेवावयाचे असा प्रश्न असतो अशा लोका संबंधानें आमचें ह्मणणें नाहीं. पण शिपाया पासून तों शेपन्नास रुपये पगारवाल्या इसमापर्यंत सरकारास दुष्काळा निमित्त कांहीं तरी मदत पगाराच्या द्वारानें केली पाहिजे. दुष्काळ अलावन्स देण्याची वेळ येऊन बेतली आहे. तेव्हां स्थानिक सरकार या प्रश्नाचा चांगलासा निकाल करील अशी आह्मास उमेद आहे.

---

विचाराची उत्क्रांती होत जाते तसतसा वस्तुमात्रांचा बरे वाईटपणा देखील पालटतो असें अनुभवास आलें आहे. कोणत्या पदार्थाचें भोजन करणें चगलें या प्रश्ना विषयीं अलिकडे युरोप खंडांत विशेष वाटाघाट चालूं आहे. या वाटाघटींत मांसाहार वाईट आहे असा सार्वत्रिक समज झाला आहे. पाश्चिमात्य राष्ट्रांत मांसाहाराला प्राधान्य प्राचीन काळा पासून आहे पण सध्या विचार बदलले असून मांसाहाराला अगदीं क्षुद्र व अधम कोटींतलें भोजन मानतात. विचाराच्या अनुसंधानानें आचारांत फरक होण्यास पुष्कळ कालावधि लागेल. लोकांच्यां संवयींतला मांसाहार आहे तेव्हां तो बंद होण्यास तर फारच वर्षे लागतील. या मांसाहाराचें प्राबल्य तिकडे इतकें प्रचंड आहे कीं मांसाहार हा सुधारलेल्या भोजनाचा प्रकार आहे. मेजवानीला मांसमच्छरा शिवाय गोडीच नाहीं. इंडियांत ही मांसाहाराची अभिवृद्धी होऊं लागली. अहिंसात्मक धर्म आशिया खंडातील बहुत राष्ट्रांत आहे आणि बौद्ध धर्मानें जगावर जो मोठा उपकार केला आहे तो अहिंस विषयीं लोकप्रवृत्ती बनविली हा गोष्ट होय. मांसाहाराचें वर्चस्व इंडियांत स्थापित होणें असंभवनीय होतें पण अलिकडे मांसाहाराला निषेधक विचारसरणी युरोपांतच लोकमान्य झाली आहे तेव्हां मांसाहाराचें बंड इंडियांत निदान लयास जाईल हें स्वष्ट आहे.

---

## दुष्काळाचीं चिन्हें

सिमल्यास गेल्या गुरुवारीं व्हाइसराय साहेबांच्या कायदे कौंसिलाची सभा भरली होती तेव्हां सध्यां सुरू झालेल्या दुष्काळा संबधानें नामदार मि० वुडबर्न यांनीं विशेष खुलासेवार माहिती सांगितली. त्यांच्या ह्मणण्याचा आशय असा कीं येत्या पंधरवाड्यांत ह्मणजे दिवाळीच्या दिवसापर्यंत पाऊस पडला नाहीं तर रब्बीचे पेरे होणार नाहींत आणि निःसंशय मोठी कठीण वेळ येऊन बेतेल. आग्रा, औध, अल्हाबाद, बनारस, गोरखपूर, रोहिलखंड, पंजाबांतील, सिस-सतलज नदी कांठचा भाग, लाहोर, मध्य प्रांतांतील सागर, जबलपूर, नरसिंगपूर, हुशंगाबाद, रायपूर इत्यादि भागांत दुष्काळाचें उग्र स्वरूप दिसून येईल. सन १८७७-७८ सालीं जसा महाराष्ट्रांत भयंकर दुष्काळ पडला होता तसाच पाऊस न पडला तर यंदाही दुष्काळ पडेल असा रंग दिसतो.

दुष्काळाशी सामना देण्यास आह्मी सिद्ध आहों असें लार्ड एलजिन साहेबांनीं सर्व प्रजासमूहास कळविलें आहे. यंदाची तयारी गेल्या वीस वर्षां खालील तयारी पेक्षां पुष्कळ रितीनें चागली आहे. पूर्वी पेक्षां दळणवळण पुष्कळ वाढलें आहे आणि कालव्याच्या पाण्यानें पुष्कळ जमिनी सुपीक केल्या आहेत. इंडिया देशांतून लक्ष्यावधि खंडी धान्य परद्वीपान्तराला जात होतें तसेंच सध्यां या देशाच्या गरजेच्या वेळीं अमेरिकेंतील धान्य या देशांत येऊं लागलें आहे. कालिफोर्निआ मध्यें हल्लीं जो भाव आहे त्या भावानें तेथील गहूं कलकत्यास १ रुपयास १० शेर या भावानें पडता. कलकत्याहून पुढें रेलवेनें गहूं नेण्याचा रेलवेचा किराया आकारला ह्मणजे प्रत्येक ठिकाणीं कालिफोर्नियाचा गहूं कसा मिळेल याचा अंदाजा होईल. सुमारें २९ लक्ष लोकांस सरकारी मदत लागेल आणि ही मदत ह्मणजे १ कोट मण धान्याची लागेल. गल्या वीस वर्षांचा अनुभव सरकारास मोठा उपयोगी पडला आहे. अगोदरच दुष्काळाशीं लढाई करण्याची कडेकोट तयारी सरकारी चालविली आहे ही आनंदाची गोष्ट होय. व्हाईसराय साहेब ह्मणतात कीं सरकार आपली कामगिरी बजावण्यास तत्पर आहे पण अशा बिकट समयीं सुखवस्तु व श्रीमान लोकांनीं आपला उदार आश्रय दुष्काळानें पीडलेल्या देशबंधूस दिला पाहिजे आणि अशा आश्रया शिवाय गरीब लोकांचा तिभाव लागणार नाहीं व सरकारचें कार्य देखील नीटपणें सिद्धीस जाणार नाहीं. मोलमजुरीचीं कामें स्थानिक सरकारामार्फत सुरू करण्यांत येतील आणि जे अनाथ व पंगु आहेत त्यांच्या साठीं अन्नछत्रें घालण्यांत येतील अशी व्यवस्था ठेवण्याविषयीं खबरदारी घेतली जाईल. दुष्काळरूपीं शत्रू सामोरा पाहिल्याबरोबर सरकारनें लढाईचीं निशाणें उभारलीं हें पाहून प्रजाजनास दुःखांत समाधान वाटेल. लोकांस खऱ्या खऱ्या गोष्टी व दुश्चिन्हें सरकारानें कळविलीं याचा हेतु लार्ड एलनिन दर्शवितात कीं दुष्काळामुळें एकही प्राणहानी होऊं नये अशा विषयीं सर्वस्व खर्ची पडलें तरी हरकत नाहीं. तथापि लोकांच्या मनामध्यें विनाकारण किंवा अती मोठी भिती उत्पन्न न करण्याविषयीं धुरीण व पुढारी गृहस्थांनीं दक्षता ठेविली पाहिजे.

---

वऱ्हाड प्रांतांत दुष्काळास प्रारंभ झाला आहे. वेळ मोठि कठीण आहे. खेड्यापाड्यांतून ज्यांच्या पाशी धान्याचा सांठा आहे किंवा चार पैसे आहेत त्यांचा जीव देखील बिनधोक आहे असें त्यांस वाटत नाहीं. सर्व प्रांताला पुरेसा होईल इतका धान्याचा खजिना शिल्लक नाहीं तथापि धान्य बाहेर मुलखावर झपाट्यानें चाललें आहे आणि त्या कारणामुळें धारण अती महाग झाली आहे. ही धारण अशीच राहिली किंवा वाढत गेली तर या दुष्काळाचें स्वरूप फार भयंकर होण्याचा रंग दिसतो. हल्लींच कित्येक खेड्या पाड्यांतून धान्य विकत मिळण्याची देखील मारामार पडते इतकेंच नाहीं तर कधीं कधीं मिळत देखील नाहीं. शहरगांवच्या बाजारांत धान्य फार मुष्किलीनें अद्यापपर्यंत मिळतें ही गोष्ट खरी तथापि चालूं स्थिती कायम राहिल्यास मोठमोठ्या शहरांतही धान्याची टंचाई होईल व अनर्थ उसळतील. जें धान्य प्रांताला पुरण्या इतकें नाहीं तें प्रांता बाहेर जाऊं देणें फार धोक्याचें आहे आणि त्याचा अर्थ असा होईल कीं इकडे पुरवठा करण्यांसाठीं बाह्य प्रांतातून मिळेल त्या भावानें धान्य परत आणावें लागेल ह्मणजे विनाकारण आगगाडीच्या भाड्याची व व्यापाऱ्यांची नफ्याची चाव लोकांवर लादली जाणार आहे.

---

वऱ्हाडांतील धान्याच्या साठ्या संबंधानें पाहूं गेलें असतां या प्रांताची पूर्वस्थिती व सद्यस्थिती यामध्यें मोठें अंतर आहे. पूर्वी सांठा विपूल असे पण हल्लीं रेलचेल झाल्यामुळें धान्य इतर देशास जाऊं लागलें आहे. आकोला जिल्ह्यांत चौकशी करितांना असें आढळून आलें कीं सर्व धान्य फार तर चार किंवा पांच महिने पर्यंत लोकसंख्येच्या मानानें पुरेल असा अदमास आहे. ही स्थिती किंबहुना यापेक्षां निकृष्ठ स्थिती सर्व प्रांतभर आढळून येईल. शेतांतील उभ्या पीका संबंधानें विचार करितां गांवच्या आखर जमिनींतील व बरड्या जमिनींतील पीकें अजीबात गेलीं असें ह्मणण्यास हरकत नाहीं. हलक्या प्रतीच्या काळ्या जमिनींतील खरिपाचीं पीकें रुपयांत चार आणे आलीं तर मोठें नशीब समजावयाचें. आतां काय ती भिस्त असल काळ्या वावरांतील पीकावर आहे. आणि हीं पीकें पाऊस न आल्यास व दुसरीं विघ्नें न आल्यास पराकाष्टेनें रुपयांत आठ आणे येतील. ईश्वरकृपेनें येत्या पंधरवाड्यांत वृष्टी झाल्यास सदहू पीकें उत्तम प्रकारचीं येतील आणि रब्बीचें पीकही हातीं लागेल.

---

The Berar Samachar

MONDAY OCTOBER 19 1896

Berar is after all a prey to the scarcity of food—grains. It is a patent fact that the famine has set in or rather the rising prices are as high as the famine prices. The distress threatens us in no distant future provided it does not rain in the next fortnight. The magnitude and extent of the distress is really alarming and prudence and foresight dictate to us that the local Government ought to devise means to avert the danger. The ruling necessity of the time is the want of relief works and poor—houses It will be a fatal policy to put off these remedial measures to save life in these bad times.

As regards this district, we are obliged to Mr.. F- W. Prideaux and the ministers in his confidence who have apprehended the real nature of the distress and are proposing measures to alleviate the pain of the suffering masses. The non—official benevolence which is now eminently at work has helped the district—officers to a great measure and we are glad that relief works are under consideration as an immediate step to be taken in a short period. Mr. D. V. Bhagwat, Vice—Chairman of the District--Boards has certainly done a good piece of work. He proposes to allot a big sum of Rs 75,000 for relief works in this district.

---

Poona 15—10—96

To

The Editor of the Berar Samachar

Sir,

A RETROSPECT OF THE GANPATI FESTEVAL AT POONA

The great Ganpati festeval at Poona came and went away. The momentary enthusiasm in which the people were plunged has now become a matter of history and it is now time to think of the benefits or otherwise of the movements. You may perhaps ask what has this to do with people of Berar? I answer that since the originator of it aspires to make it national it is the duty of every Indivdual of the country of Mahrastra to see what future the movement has in store for it.

Mr. Tilak of Poona probably lays claim to having started this idea. If we allowed him credit for it, we must say that it was a very vulgar ideal. There used to be Ganpati festivals in the days of yore. In the ealry days of the present moribund generation, there used to be grand and glorious festivals in Gosawi—poora in honor of the deity. But the mode in which the festival began and ended was unlike the present. Never were the the Melas known to have danced before the deity. The various costumes in which the melas are clad and the spurious off—spring of modern poetry which the melewalas go about chanting was unknown to our ancestors. It is useless to deny that the whole thing is an imitation of the Memomedan Tajyas.

Three years ago there was a friction between the two communities. The Hindoos held aloof from the Mahomedans and the present mode of worship (if it be called worship) was a sort of substitute for people to beguile the tedium and waste their surplus energy in a new direction. This was only a tit for tat. This was only an effort at consolation, a sort of make—shift for an amusement which they could not share in. The man or men whose ambition it was to make a name went ahead claimed to be demagogues, men of lead and light, and blew their trumpet as social or national guardians. They succeeded in this temporary adventure and thought what was only a temporary wave of the freaks and fancies of the people would become a perpetually lasting outburst of devotion and piety, in fact, a national religious revival raising the tone of national morality and virtue. Nothing can be more foolish than to expect such a thing from the ignorant mass of the melavalas whose ambition is to look well and please the motley crow of men and women whose devoutness does not go beyond enjoying the fun for the night and whose piety consists in approving or condemning the il—luminations executed before the various Ganpatees. The use of cordials does not unfrequently form a part of the internal decorations. Such a movement even when it becomes national, will only be a case of national levity. I shall stop here to—day. I will write to you again.

A looker—on.

Sunday is the Sabbath day or the day of rest—because Lord God took rest on this day after his fatigue of the previous six days of creation. So also because the great warrior Arjun began his expedition on the 10th of Ashwina & it was crowned with complete success, we have invested this day with special sanctity and under—take any thing great on this day. The first post the Congress Pandal of Poona was planted on this day. And yet civil war raged furiously enough in Poona! Heaven only knows how it would have ended had it not been planted on that day.

× × ×

Thus Thursday last was a day of general rejoicing —throughout the length and breath of India—not un—mingled with feelings of sadness, however, since famine has been grimly staring us in the face and the Bubonic fever has been making fearful ravages in Bombay and casting its shadow over distant places too! Calcutta is busy in making mighty preparations for its reception.

× × ×

I cannot refrain from making a remark or two on the rejoicings (?) of Wednesday last. All schools and offices were closed on that day. I wonder why. That was the last day of Nava—ratra—the day too on which many buffaloes had to look their last! It was a hideous sight to see those bleeding beasts driven about the town from house to house. Simply to hear the manner of their slaughter makes one sick. These poor victims are first simply wounded before the Bhavani. There are some who will claim the privilege of striking the first blow (if they are denied it, they will go to law.). Then the bleeding victims are driven about the town from door to door, and at night they are *beaten* to death. I am no Don Quixote to fancy that those beasts should be fondled and caressed like your own children. What I object to is the manner of killing them. It is simply disgraceful. Even the butchers who slaughter your worshipped cow must be credited with some kindness, in as much as they despatch her in a trice. Will Berar boast of any civilization and yet allow such revolting sights!

× × ×

"But ah! you forget one thing" says my good Orthodox, "Our religion requires it! This is done every where." I simply tell him, that it is all nonsense Our religion *required* suttee—it *required* infanticide too and it requires (as you have it) a lot of other things. No! men *you* require it. Your shakti or your Bhavani requires nothing. Your appetite requires them. Shakti requires no liquor or flesh. She does not touch them. And even the practice is not general, as you say. On the Poona side no body hears of it. Certainly it is not allowed in the city of Poona. It is high time we should purge our so—called religion of all this nonsense and discontinue this shameful practice that appears to have long edjoyed religious sanction. The same may be said with regard to animal sarcifices too! If you want flesh, well despatch the beast at once and cook it for your meals But do not kill it by inches. It is for such crimes that your Goddess often visits you now with a famine and now with a plague!

× × ×

As to famine I hope our Berar soil will not quite give her sons up. She will give them something. Besides California has generously sent us some wheat of course to be paid for. The good people of Akola have opened a grain depot for the poor. I thank them sincerely May God bless them. But at any rate Akola will have a scarcity of water. How are they going to face that?

× × ×

Is there any Municipality at Akola? I would imagine not. The condition of the road to Washim where thousands of people had to go on Thursday to worship the Apta—tree was simply disgraceful Why was it not watered to lay the dust? People had literally to eat the dust.

× × ×

I read somewhere that an Educational Inspector has been made a Tahashildar. In the Bombay presidency a Graduate has to serve his app rentice—ship for some years before he is raised to the dignity Fancy an Educational Inspector examing the school—boys to—day looking to the wellbeing in every way of courses of the whole Tahsil entrusted to his care to—morrow. (But I am told the gentleman deserves the honour.)

× × ×

There is one reason why the vakil of Berar has his pockets always filled some—times overflowing! He is thus able to turn the confused executive round his little finger and squeeze much money out of his client as he can, for his skill.

× × ×

I hope the Akola public is too shrewd to be allowed to be gulled by more oily tougued flatterer. They can appreciate a well meant reproof. I have yet to tread on a dangerous ground, but I shall wait to see how these innocent remarks are taken.

An Exile

In the body of the Criminal Report for 1895, Mr. R. D. Hare figures very well. He is freely quoted in connection with his remarks on the different aspects of criminal justice. His remarks on the decrease of security—cases and the increase of Police—cases are worth mentioning. He observes:—

"As I said last year, I have for some time been inclined to the opinion that it is a mistake to bind over numbers of people to keep the peace at the time of the *Mohurrum* and *Ekadashi* processions and other occasions, when the relations between people of different creeds are apt to be strained. It appears to me that to do so is somewhat calculated to accentuate ill-feeling and to bring the administration more or less into contempt, and that it is better, while taking due precautions to regulate processions and the use of music, not to put the law in force until it has been broken. This year, I regret to say, there was still a little disposition on both sides to make trouble in some places; but routes were laid down for processions; those taking them out were made to apply for licenses beforehand; and police arrangements were made to keep the peace, but very few people were bound over under section 107, Criminal Procedure Code, and no breach of the peace took place. There was a little trouble at Balapur because two sets of Musalmans did not agree as to whether certain dances and performances ought to be allowed; but the District Superintendent went out, and the matter passed off quietly, though some of the processions did not take place.

The great increase in cases under section 34 of the Police Act took place at Khamgaon, where 727 nuisance cases were brought to trial out of a total of 1,008 for the district, there being thus only 281 to be distributed between the four other municipalities where the management is not in the hands of an European officer, and the two or three other towns to which the section of the Police Act applies."

## वऱ्हाड

हवामान– दोन तीन रात्रीं ढग आले पण अखेरीस निराशा झाली. हवेंत उष्मा भासतो म्हणून पावसाची आशा किंचित आहे. रोगराई म्हणण्या सारखी नाही. वळाऱ्या तापाची सांथ इकडे नाहीं पण मुंबईचा एक आजारी मनुष्य आकोटास येऊन मरण पावला.

रा. रा. शेषाचिलम मुदलियार तहशिलदार, वाशिम यांस मेडिकल बोर्डाकडून पेनशन घेण्याविषयीं शीफारस झाली. हे गृहस्थ स्वभावानें गरीब असून लोकप्रिय अधिकारी आहेत.

रा. रा. विष्णु हरी तहशीलदार, इलिचपूर यांजवर सरकारि कामांतील कांहीं बालंट आल्यामुळें त्यांस चाकरीवरून दूर करण्यांत आलें ही गोष्ट वाईट होय.

दोन तहशीलदारांच्या जागा रिकाम्या आहेत तेव्हां त्या जागीं कुलीन व विद्वान गृहस्थांची नेमणूक मि० बुलक साहेब करितील अशी आह्मास आशा आहे. रा० रा० गोपाळ वामन बापट बी० ए० एल० एल० बी० यांच्या नेमणुकीच्या वेळीं जो गुणग्राहीपणा दर्शविण्यांत आला तसाच या नेमणुकांच्या वेळीं दृष्टीस पडेल असें आह्मी इच्छितों.

मि. एदलजी संजाना एक्स्ट्रा असि० कमिशनर, इलिचपूर हे तीन महिन्यांच्या रजेवर जात असल्यामुळें त्यांच्या जागीं गेल्या सोमवारा पासून रा० रा० गोविंद राज अण्या हे काम पाहूं लागले. वाशिमच्या कोर्टाचें काम राजश्री अण्या साहेब यांनीं फार उत्कृष्ट रितीनें कलें असें कळतें.

मलकापूर व नांदुरा येथें सभा भरून दुष्काळ पीडीतासाठीं एक नवीन दुकान वर्गणीनें काढण्याचें ठरलें आहे.

उमरावतीच्या खजिन्यावरील एका पोलीस शिपायानें पाहरा करीत असतांना दुसऱ्या निजलेल्या शिपायावर गोळी घालून त्यास ठार मारलें; आणि पुढील अपेष्टा टाळण्या साठीं दुसऱ्या गोळीनें आत्महत्या केली. उभयतां इसम तरूण असून स्नेही होते पण कोणती गोष्ट बिनसली राम जाणे!

पातुरचा बाजार लुटल्याबद्दल ११ आरोपीवर खटला चालूं आहे.

अकोला जिल्हा बोर्डाचे व्हाइस चेअरमन रा० रा० दत्तात्रय विष्णु भागवत यांनीं पाऊण लाख रुपये दुष्काळ–कामा निमित्त बोर्डाच्या फंडातून देण्या विषयीं योजना चालविली आहे.

### बाजार भाव

| | दर खंडीस |
|---|---|
| आळशी | ९५॥ रुपये |
| जवारी | ७८ रु० |
| गहूं (कांठे) | ११६ रु० |
| ,,(बनशी) | १२६ रु० |
| चणे | ९६ रु० |
| तेल | ६॥ रु० मण |
| तूप | ७॥– मण |
| सोनें | २७ तोळा. |
| चांदी | ९३ भार |

नमुना नं १४३

कोणी स्थानापन्न होतो तेव्हां त्यांस कर्ज वसूल करितां येण्यासाठीं सरटीफिकीट मिळावें ह्मणून त्यानें जिल्हे कोर्टास अर्ज केल्या विषयीं जाहिरात.

सन १८८९ चा अक्ट ७ कलम ६ प्रमाणें.

दि० क्लास १९ मिसल नंबर ८

९६

वि० सिवील ज्यडज्य साहेब जिल्हा अकोला यांचे कोर्टात.

नांव---- हरप्यारी मर्द बलदेवदास तर्फे मुखत्यार नंदराम उदेराम

राहणार—घोडगांव तालुके अकोट

जिल्हा—अकोला यांस मयत

हरनंदराय बापाचे नांव नानकराम राहणार घाडेगांव तालुके अकोट जिल्हा अकोला यांचें कर्ज वसूल करितां येण्यासाठीं सरटीफिकीट मिळावें ह्मणून सदरहू अर्जदार यानें अर्ज केला आहे त्याजकरितां सदरहू मयत मनुष्याचे माल मिळकतीवर किंवा तिचे कांहीं भागावर आपला हक्क आहे ह्मणून ज्या मनुष्यांचा दावा असेल त्यास जाहिरातीचे द्वारें कळविण्यांत येत आहे कीं, त्यांनीं तारीख ३१ माहे १० सन १८९६ इसवी रोजीं सदरहू अर्जाची चौकशी होईल त्यावेळी या कोर्टांत हजर होऊन आपआपले हक्का विषयीं लेखी हकीकत दाखल करावी.

तारीख १६ माहे १० सन १८९६ इसवी.

Sheikh Ismail
सिव्हील जडज्य

## वर्तमानसार.

नारायणगंज जवळील रालीब्रदर्स कंपनीच्या तागाचे गिरणीस आग लागून ४।५ लाखांचें नुकसान झालें.

ऐका हो राजे रजवाड्यानो. " संस्थनिक, सरदार व जहागिरदार यांस आपले ठिकाण सोडून मुंबई, पुणे व महाबळेश्वर येथें जेव्हां जेव्हां जावयाचें असेल तेव्हां त्यांनीं जाण्यास निघण्यापूर्वी १९ दिवस परवानगी मागण्यासाठीं अर्ज करावा, आणि त्या परवानगींत जितके लोक बरोबर न्यावे असें सांगण्यांत येईल त्याहून जास्त लोक बरोबर नेऊं नये " असा एक वटहुकूम झाला आहे. हा वटहुकूम पहून कोणासहीं वाईट वाटेल व हा जुलूम आहे असें कित्येकांचें ह्मणणें आहे, पण त्या ह्मणण्यांत कांहीं अर्थ नाहीं. आमच्या परवानगी वाचून त्यांनीं कोणाशीं बोलूंही नये असे जे आरंभीं करार झाले त्यांचेंच हें पर्यवसन आहे. आणि आतां संस्थनिक झाला कीं माझी योग्यता कैद्या सारखी झाली असें त्यानें समजलेंच पाहिजे. आतां तक्रार करण्यांत काय अर्थ?

इंग्रजाच्या लढाऊ गलबतांस झांजीबार वर जाण्याचा हकूम झाला. यावरून तें प्रकरण बळावणार असें दिसतें. या झांजीबार प्रकरणाबद्दल जर्मनसरकारही निकरावर आल्याचें दिसतें

सरकारच्या मालकीच्या व सरकारच्या ताब्यांत असणाऱ्या इमारतीस मुनिसिपल कायद्रा लागूं नाहीं असें ठरविण्या बद्दल लवकरच एक कायदा होणार आहे म्युनिसिपल कायदा लागू नाहीं ह्मणजे घरपटी वगैरे पडावयाची नाहीं असेंच असेल तर सरकारी इमारतींच्या बचावाकरितां यत्न करण्याचें म्युनिसिपालिटीचें काम नाहीं असेंहि होईल.

रशिया व टर्कीचा सुलतान यांच्या दरम्यान अलिकडे एक करार झाला असून त्या आधारानें रशियाच्या एका लश्करी कामदारानें डार्डनल येथें टर्कीची जी लढाऊ तयारी तयारी आहे त्याची तपासणी केली व त्यावरून टर्कीच्या सुलतानानें नवीन लढाऊ दारू टार्पेडो तेथें रवाना केलें. तसेंच इंग्रजप्रधान लार्ड सालिसबरी यांनीं ता. २ रोजी प्रवासांतून लंडन येथें येऊन फ्रेंच व रशियन राजकीय वकिलांच्या भेटी घेतल्या.

रशिया जी सैबेरियन रेल्वे करीत आहे ती उत्तर मांचोरियांत नेण्याचें ठरलें.

गायकल शहर आगलाव्या लोकांनीं आग लाऊन बहुतेक जाळून टाकलें. सहा कोटीचें नुकसान झालें.

टर्की प्रकरणाबद्दलचें आपलें मत लिबरल प्रक्षाच्या लोकांस पसंत नाहीं. या सबबीनें त्या पक्षाचे पुढारी लार्ड रोजबरी यांनीं पुढारीपणाचा राजीनामा दिला.

अर्मेनियन प्रकरणांत लवकर सुधारणा करा अशा बद्दल इंग्रज, रशिया व फ्रान्स यांनीं एकत्रपणानें टर्कीस नोटिस देण्याचें ठरविलें. अ. द

धारवाड, विजापूर, सोलापूर व सातारा या जिल्ह्यांच्या बहुतेक भागांत चांगला पाऊस झाल्याच्या बातम्या तारमार्फत मुंबईस आल्या आहेत. परंतु पाऊसा बद्दल हाकाटी सर्वत्र आहे.

सिकंदराबाद येथील तुरंगांतुन गेल्या मंगळवारीं रात्रीं ३ कैदी तुरुंगाच्या भिंतीस भोक पाडून त्यांतून पसार झाले. त्यांस पकड याबद्दल जागोजाग तारा सुटल्या आहेत.

तारेमार्फत आलेल्या बातमी वरून समजतें कीं, सोलापुरास व बार्शीस व त्याचें आसपास चांगली पर्जन्यवृष्टि झाली. व आणखी पडण्याचें चिन्ह दिसत आहे. बातमीचा खरेपणा देव जाणे!

हल्लीं जिकडे तिकडे दुष्काळानें आपलें स्वरूप प्रगट केल्यामुळें लोकांस फार कठीण अवस्था येऊन पोचली आहे ह्मणून या प्रसंगीं सरकारनीं लोकांवरील इनकमपठ्याकत माफ करावा अशी सुरतच्या देशीमित्रानें सूचना केली आहे

नाशकास अर्धा तास मोठें तुफान होऊन चांगली पर्जन्यवृष्टि झाली ह्या तुफानामुळें कित्येक घराच्या छपरास पुष्कळ नुकसान पोचलं. व मल्हारगेटाजवळ एक झाड पडून त्या खालीं एक परदेशी चिरडून मेला.

थोडे दिवसांवर भावनगर येथील इमारती लांकडांच्या वखारी जळून खाक झाल्या मुळें लांकडाचे व्यापारी लोक हवालदील झाले होते, त्यांस व्यापाराकरितां भावनगरच्या महाराजांनीं ४०००० रुपयांची रक्कम बिनव्याजी देण्याचा ठराव केला आहे.

मुंबईतील विषारी तापः—या रोगा संबंधी कित्येक हकीकत व त्यावर उपाय सुरतचे हकीम महमद मसउद बीन मौलवी महमद व वैद्य धीरजराम काशीनाथ पाठक यांनीं बाहेर पाडली आहे. ते कळवितात कीं,—ब्युबानिकप्लेग—यास अरबी भाषेंत ताऊन व संस्कृतांत अग्निरोहिणी असें ह्मणतात. या रोगासंबंधी देशी व इंग्रजी वैद्यशास्त्रांत जी माहिती मिळते त्यावरून हा रोग, देवी व पटकी प्रमाणें सांसर्गिक आहे. ह्या रोगाची उत्पत्ती नेहमी पाऊस पडून गेल्या नंतर ज्वारी, मका, भात यांच्या कापणीच्या प्रसंगीं जास्त उष्णता पडू लागली असतां हवा बिघडून त्यापासून होते ह्या रोगाची चिन्हें अशीं असतात कीं, सुमारे वाटाण्या एवढें फोड, कानाच्या मागल्या बाजूस काखेंत, जांघेंत अथवा थानावर येतात व त्याच्या आजूबाजूच्या जागेस सूज येते. तिचा रंग लाल, काळा अथवा जांभळा असतो. हे फोड एक दोन अथवा अधिकही येतात व त्यापासून ताप भरून अतिशय कहाली होऊं लागते. पुष्कळ फोड येणें चांगलें, त्यांतून रोगी बहुतकरून वाचतोच, परंतु एकच फोड येणें फार जोखमेचें मानलें आहे. तसेंच सुजेचा रंग लाल असल्यास चांगला, पण काळा किंवा निळा असल्यास तसेंच कानाच्या मागें व डावे बाजूचें बगलांत फोड असल्यास ते असाध्य मानले आहेत व स्तनावरील फोड कष्टसाध्य मानले आहेत. हा रोग रुधिराभिसरण करणाऱ्या शिरांतून जाऊन हृदयात भिडला ह्मणजे मनुष्याचा नाश होतो ह्मणून हा रोग उत्पन्न होताच त्यावर उपचार करण्याची काळजी घेतली पाहिजे. ती अशी—ज्या ठिकाणीं हा रोग चालत असेल त्या भागात न राहतां स्वच्छ हवेंत जाऊन राहावें. रक्त शुद्धीचे उपाय चालू करावे. हाताच्या वगैरे नसा खोलाव्या, जुलाबाचे औषध घ्यावें, हृदयास व मस्तकास शक्ती येण्याकरितां ओला मेवा खावा. त्याशिवाय खालील औषधें ह्या रोगावर चांगली सांगितली आहेत. ( १ ) गुलाबपाणी २ तोळे, कासनीचा अर्क २ तोळे, घासलेलीं सुखड पावतोळा, खाखसी पावतोळा असे एकत्र करून त्यांत अर्धा तोळा साखर मिळवून तें मिश्रण पीत जावें. कोथमिरिचा रस, सरका व कापूर एकत्र वाटून त्याचा मलम फोडांस लावावा. ह्मणजे आराम पडत जातो. रोगी मनुष्यास उनाबेदाणा ७, आलुबुखार दाणे ७, काळींद्राक्ष तोळा १, गुलाबपुष्प तोळा १, अफतीमुन तोळा -॥- कुशसना बी तोळा ॥-; नुलबनफसा तोळा -॥- गुलेनिलोफर तोळा -॥-, सांतरा तोळा -॥-, चिंच तोळे २, काकडीचा मगज तोळा १, सोनामुखी तोळा -।॥- व गोखरूं तोळा -॥-, याप्रमाणें वस्तू घेऊन एक शेर पाण्यांत तें उकळून पाव शेर पाणी राहिलें ह्मणजे त्यांत अर्धा तोळा साखर टाकून तो काढा दिवसांतून दोन वेळ द्यावा. वरील प्रमाण २० वर्षा वरील उमरीच्या माणसाकरितां आहे. लहान वयाच्या माणसास यापेक्षां कमी प्रमाण द्यावें. कांदे, नारिंगें वगैरे पदार्थ अवश्य खावे आणि सुवासिक पुष्पांचा व अत्तराचा वास घेत जावा. मसुरीचे दाळीचे उकळलेले पाणी सरका, गुलअरमानी यांचें पाणी करून घरांतील कोणाखोचऱ्यांत शिंपडीत जावें. निरोगी मनुष्यानें अशा प्रसंगी आपणास रोग न जडेल अशा बद्दल फार सावधगिरी ठेवावी. श्री. म. वि.

आग्रा शहरापुरतीं रिलीफचीं कामें सुरू करण्यांत आलीं आहेत.

लखनौ येथें पंधरा ठिकाणीं दुष्काळामुळें ज्यांचे हाल होत आहेत अशा लोकांनीं अन्न मिळण्याची व्यवस्था केली आहे.

पतियाळा येथें दरबारांतून गरीब लोकांस वाटण्यासाठीं ६००० रुपयांचें धान्य देण्यांत आलें.

सिंधमध्यें यंदा नेहमींपेक्षां चांगलें पीक आलें आहे. यामुळें तिकडून या प्रांतास धान्याचा बराच पुरवठा होण्याची आशा आहे.

नवीनच एका चमत्कारिक पक्ष्याचा शोध लागला आहे. हा पक्षी फार विषारी ( कोकणांत ज्याला फुर्से किरडूं ह्मणतात त्या सारखा ) आहे. हा खबतराएवढा असून त्याला फारसें उंच उडतां येत नाहीं. हा पक्षी जर माणसास चावला तर त्या माणसाच्या सगळ्या शरीरांत अतिशय वेदना होऊं लागतात, त्याची नजर जाते, घशास गांठी येतात, चावलेल्या माणसाचें शरीर लालेंच सुजावयास लागून प्रचंड फुगतें व तें निळें दिसूं लागतें आणि थोड्याच वेळानें त्यास मरण येतें. क० त०

पोलिटिकल खात्याचें एक नवीन सरक्युलर निघालें असून त्यांत दक्षिणच्या सरदारांनीं पुणें मुंबई, महाबळेश्वर या ठिकाणीं यावयाचें असल्यास सरकारची आधी परवानगी घ्यावी व परवान्यांत दाखल केलेल्या संख्येपेक्षां अधिक लोक बरोबर आणूं नयेत. असें आहे. आतां या सरदारांना सरदार ह्मणण्यापेक्षां नजरकैदी ह्मणणें जास्त शोभत नाहीं काय?

साहेब पळाला—पहिली बायको जिवंत असतां ती मेल्याबदल खोटें सरटिफिकीट तयार करणारा पेरेट नांवाचा यूरोपियन सिकंदराबादच्या तुरुगांत होता; तो दुसऱ्या दोघां नेटीव कैद्यांस बरोबर घेऊन तारीख ७ रोजीं पळून गेला ! ते दोघे कैदी आपल्याला भेट्या येतात असें निमित्त सांगून पेरेटनें आपल्या कोठडींत सोबतीस ह्मणून मागून घेतले होते, आणि तिघांनीं मिळून भाजी चिरण्याच्या मारळीच्या साह्यानें भिंतीस भोंक पाडून पोबारा केले !! स० सो०

निजामहैद्राबादचे रेसिडेंट मि० स्पाउडन रजेवर जाणार. परत आल्यावर त्यांस पंज्याबची ले० गव्हरनरी मिळणार.

मुंबईत नवीन रोग आला त्याचें कारण बायकांत असें निघालें आहे कीं, कोण्या बाईनें विलायतेहून येणाऱ्या " केरवा " जातीच्या बांगड्या मुंबादेवीला वाहिल्या त्या रागामुळें हा अनर्थ उडाला आहे. पुष्कळ बायकांनीं बांगड्या फोडून टाकल्या व त्या भारी नाश झाल्यामुळें कासार रडत आहेत.

जपानांतील वरिष्ठ प्रतीचे शिक्षणांत संस्कृत भाषा धरली असून तें शिक्षण मोठ्या काळजीनें होऊं लागलें आहे.

मिश्रदेशच्या सैन्यानें डंगाला प्रांतात हल्ला करून ९०० लोक ६ तोफा बहुत द्रव्य हिराऊन नेले.

काबूलमध्यें ब्रिटिश सरकारमार्फत मौलवी गफुरखा यांची नेमनुक एजंटच्या जागीं झाली

मद्रास इलाख्यांत नोकरीच्या परिक्षा सुरू झाल्या. त्यांतील उमेदवारांची संख्या ४६००० होती. हा विद्येचा प्रसार नसून भिक्षेचा प्रसार दृष्टीपुढें आला आहे. म. मि.

## सूर्याची उष्णता किती आहे;

सूर्याचा गोल पृथ्वीगालापेक्षां १०,०३,००० पट मोठा आहे आणि पृथ्वीपासून त्याचें अंतर ९,३०,००,००० मैल आहे. इतक्या पट मोठ्या अशा या गोलावरून इतक्या अंतरावर जी उष्णता येते, तिचे परिणाम काय विलक्षण होतात ते आपणांस माहिती आहेतच, हे सर्व परिणाम सूर्यापासुन निघणाऱ्या उष्णतेच्या अत्यंत अल्प अंशाचे होत. यावरून एकंदर उष्णता किती असेल याची कल्पना वाचकांनीं करावी. रोसेटी नांवाच्या सूर्यज्ञानें असा अंदाज केला आहे कीं सूर्याची उष्णता उष्णतामापक यंत्रानें मापल्यास ती १८०० अंश भरेल. ही उष्णता इतकी आहे कीं, हिच्या पंचमांश इतकीमुद्धां उष्णता मनुष्यास कृतीनें उत्पन्न करतां येत नाहीं. सूर्याच्या उष्णतेचा जो अंश पृथ्वीवर येतो, तो एकंदर उष्णतेचा

$$\frac{१}{७६,२०,००,०००}$$ होय.

क० णू०

---

☞ हें पत्र आकोला येथें कै० वा० खंडेराव बाळाजी फडके यांचे " वऱ्हाडसमाचार " छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

साल अखेर „ ७ „ १ ८८
किरकोळ अंकास.................... ८४

नोटिशी बद्दल
१० ओळीचे आंत रु० १
दर ओळीस ........ ८। ८६
दुसरे खेपेस .............. ८

Annual in arrears 7 „ 1 Rs. 8 as
Six monthly......... 3 ........ „ 8 as
Single copy ................ 4 as

Advertisement.
Below 10 lines ... 2 Rs
Per line over 10 ... 4 as.
Repetition Per ine ...3 as

# वऱ्हाडसमाचार.

THE BERAR SAMACHAR

VOLXXX | AKOLA MONDAY 26 OCTOBER 1896 | NO 42

वर्ष ३० | आकोला सोमवार तारीख २६ माहे आक्टोबर सन १८९६ इ० | अंक ४२

## जाहिरात

### मुंबई बँकची ठेव ठेवण्याचो बँक.

या सेव्हिंग बँक मध्यें खालील अटीवर ठेव ठेविली जाईल.

कोणत्याही एका वर्षात ह्मणजे जानेवारीच्या १ ले तारखे पासून तो दिसेंबरच्या ३१ तारखे पर्यंत फक्त एक हजारा पर्यंत रुपये ठेविले जातील.

दोन अथवा अधिक मनुष्यांच्या नांवानें देखील एक ठेव ठेविता येईल. व त्यांच्या हयातींत, तसेंच त्यांचे पैकीं कोणी वारले तर त्यांचे मागें त्यांच्या पैकीं एकास अथवा अधिक जणांस ठेव काढतां येईल.

एका वर्षांत एक हजार रुपया पर्यंत ठेवलेल्या रकमेवर दरसाल दर शेंकडा ३ दोरुपये व्याज दिलें जाईल. मात्र ५००० पांच हजारा वरील रकमेस व्याज नाहीं.

मुंबई ब्यांक आकोला १०।७।९६. } R. Aitken Agent

## नोटीस

रा. रा. विठोबा वल्लद कृष्णापा वाणी राहणार पेठ बाळापूर यांस—

नोटीस देणार लुलाप्पा वल्लद लक्षमण आप्पा कुल वहिवाटदार निसबत मंजाबाई जवजे धवाजी मुंजाळ दुकान बाळापूर यांजकडून कळविण्यांत येते कीं तुमचा माझ्या मालकीणीच्या इस्टेटीशीं अर्था अर्थी कांहीं एक संबंध नाहीं. भागाबाई जवजे एडाप्पा ही थोड्या दिवसापूर्वी पर्यंत आपल्या सासूच्या आज्ञेंत कुलीनपणानें वागली आणि असेंच वागण्याविषयीं तिला तिच्या नवऱ्याची मरते समयींची आज्ञा होती. तुह्मी दूरचे विभक्त नातेवाईक आहा. तुमच्या मनांत हल्लीं गैर विश्वासाचीं कामें करण्याचा विचार दिसतो. तुह्मी भागाईला भलताच लटका व खोटानाटा सल्ला देऊन तिच्या चित्ताला भ्रंश पाडून आह्मास त्रास देत असता. हल्लीं भागाईच्या आंगावर जो दागदागिना आहे तो गेला आला किंवा गहाण वगैरे ठेवण्यांत आला तर त्याबद्दल तुह्मास जबाबदार धरलें जाईल. भागाईला दागदागिना वापरण्याशिवाय त्यांचा कांहींच अफरातफर करण्याचा अखत्यार नाहीं. तुह्मी आमच्या मालकीणीच्या इमल्यांत येऊन तिच्याच विरुद्ध बंडाळी उभी करिता इतकेंच नाहीं तर माझ्या वहिवाटदारीला देखील अडथळा आणिता आणि मजशीं मारामारी करण्याच्या हातघाईला येऊन वाटेल तशी देखील धमकी देतां. तुह्मी अलिकडे भागाई जवज एडाप्पा इजपासून कुलमुखत्यारपत्र देखील घेतलें आहे आणि तुमचा इरादा माझ्या मालकिणीच्या इस्टेटीला धक्का पोंचविण्याचा आहे. या गैरवर्तनाबदल तुह्मास दिवाणींत व फौजदारींत जबाबदार धरलें जाईल.

अतःपर ही नोटीस पोचल्या तारखेपासून तुह्मी माझ्या मालकीणीच्या इस्टेटींवर पाय टेकूं नये. तुह्मी तशी आगळीक केली तर तुह्मावर फौजदारी केली जाईल. आणि तुह्मास माझ्याशी जो काय व्यवहार वगैरे करणें असेल तो कोर्ट मार्फत करावा. कोणत्याही सबबीवर किंवा भागाईच्या बोलावण्याच्या अगर निरोपाच्या कारणावर देखील तुह्मास आमच्या घरीं किंवा शेतीवाडींत येण्याची या लेखानें मनाई केली आहे आणि या खेरीज तुमचे मुखत्यारपत्र देखील माझ्या मालकीणीच्या आज्ञेवरून तें मी रद्द करीत आहें. दुकानाच्या इस्टेटी संबंधानें तुह्मी कांहीं व्यवहार केला तर व्यवहार करणोर इसम व तुह्मी जातीनें जबाबदार रहाल आणि इस्टेटीवर कोणाचा कांहीं हक्क चालणार नाहीं. कळावे तारीख १८ आक्टोबर १८९६ इसवी.

( सही )

लुलापा लक्षमणअप्पा कुलवहीवाटदार

निशाणी मंजाबाई जवजे धवाजी

मुंजाळ दुकान पेठ बाळापूर

दस्तुर खुद्द.

---

**वऱ्हाडसमाचार**

मिती अश्विन वद्य ९ शके १८१८

---

सन १८९५ सालचा फौजदारी न्यायखात्याचा रिपोर्ट यंदा उशिरानें प्रसिद्ध झाला- त्याची प्रत मामूल वहिवाटी प्रमाणें आह्माकडे आली आहे तिचा आह्मी आभार पूर्वक स्वीकार करितों. या सालीं एकंदर गुन्ह्याची संख्या कमी आहे. सन १८९० पासून पांच वर्षांची सरासरी घेतली तर दर सालास १८३०७ गुन्हे पडतात त्या पेक्षां यंदा ८३९ गुन्हे कमी ह्मणजे १७९७८ गुन्हे घडल्याची वर्दी सरकारांत देण्यांत आली होती. बुलढाणा, उमरावती व वणी या तीन जिल्ह्यांतील गुन्ह्यांची संख्या सन १८९४ पेक्षां ११०४ गुन्ह्यांनीं कमी झाली आणि बाकीच्या तीन जिल्ह्यांत तीच ४९४ गुन्ह्यांनीं वाढली ह्मणजे एकंदरीनें ९१० गुन्हे गुदस्ता पेक्षां कमी झाले. जुडिशिअल कमिशनर मि० आर्बड साहेब या कमीजास्ती बद्दल लिहितात कीं साधारणपणें गुदस्ता सारखेंच फौजदारी काम झालें असें ह्मटलें असतां चालेल; फक्त सेशन कोर्टाचें काम व वरिष्ठ प्रतीच्या माजिस्त्रेटाचें काम हीं दोन्ही यंदा जबर होतीं. बुलडाण्याचे डिपुटी कमिशनर क्यापृन कोलंब यांचा अभिप्राय असा पडतो कीं ज्या सालीं पीकपाणी बरें असतें त्या सालीं गुन्हे थोडे घडतात आणि धान्य महाग झालें म्हणजे गुन्हे अधीक होऊं लागतात. १८९५ सालीं पीक चांगलीं आलीं म्हणून गुन्हे कमी झाले असें जरी क्याप्टन कोलंब ह्मणतात. तथापि मि. इलियट सेशन जज्ज यांस हा कार्य कारणभाव बरोबर सप्रमाण वाटत नाहीं. मि. आबर्ड साहेब ह्मणतात कीं गुन्हे वाढले किंवा कमी झाले तरी चोरी वगैरे अपराध वाढले किंवा कमी झाले असेंच नसतें. गुन्हा हा शब्द फार व्यापक आहे, त्या मध्यें पोलीस आक्टाच्या ३४ व्या कलमा खालील किंवा तशाच इतर कायद्या विरुद्ध गोष्टींचा देखील समावेश होतो. धान्याच्या महागाईनें असले गुन्हे वाढत नाहींत पण इस्टेटी संबंधाचे चोरी वगैरे गुन्हे मात्र वाढतात आणि हेच गुन्हे समाजाच्या सुस्थितीला किंवा कायमपणाला बाधक असतात व त्यांचाच लोकांस मुख्यत्वें करून गुन्ह्याच्या संज्ञें खालीं बोध होतो. किरकोळ मारामारीचे किंवा शहरसफाई संबंधानें घडणारे गुन्हे एखाद्या सालीं पुष्कळ नजरेस येतात आणि दुसऱ्या वर्षीं तेच गुन्हे कमी होतात याचा मथितार्थ मि. आबर्ड साहेब असा घेतात की कांहीं वर्षीं शहर सफाई संबंधानें विशेष काळजी घेतलेली असते व भडाभड कायद्या विरुद्ध वर्तन करणाऱ्यावर खटले केले जातात आणि त्याच्या उलट ही दक्षता कधीं कमी होते व अर्थात गुन्हे थोडे दाखविले जातात. वरील मि. आबर्ड साहेब यांचा अभिप्राय यंदा आमच्या जिल्ह्यांत दोन्ही रितींनें निदर्शनास आला आहे. दुष्काळाचीं चिन्हें दिसूं लागल्या बरोबर चोरी लुटालूट वगैरे गुन्हे अधिकाधिक होऊं लागले. तसेच यंदा आकोला मुनासिपालिटींत नवीन सभासद मंडळ स्थापित झाल्यामुळें ३४ व्या कलमा खालील शहर सफाई संबंधाची गुन्ह्यांची संख्या गेल्या दोन अडीच महिन्यांतच पुष्कळ वाढली आहे.

---

तेल्हारें येथें दिवाणी व फौजदारी कोर्ट स्थापित झाल्या पासून त्या गांवाला वर्षानुवर्ष मोठें महत्व येत चाललें आहे पण त्या गांवीं पुष्कळ वर्षापासून एक मोठी उणीव होती. गांवाची स्वच्छता व सफाई या संबंधानें नेहमी कुरकूर असे. आरोग्या विषयीं जितकी गांवाची व्यवस्था पाहिजे होती तितकी मात्र दिसून येत नसे. ही गोष्ट अधिकाऱ्यांच्या लक्ष्यांत येई तशीच गांवकऱ्यांच्याही लक्ष्यांत येऊन चुकली होती. पण पुढाकार घेऊन कोणीच तजवीज करीना किंवा अशा सार्वजनिक कार्यांत झटण्या सारखे गृहस्थ बहुत काल पुढें सरसावले नाहींत. अखेरीस हें गांवसफाईचें काम रा. रा. देवराव जयकृष्ण एक्ट्रा असि. कमिशनर यांनीं आपल्या जवळच्या वाकिलांच्या व प्रमुख लोकांच्या सख्यानें आपल्या अंगावर घेतलें. जें गांवचें कांम तें सर्वांचें आहे असें जरी खरें तथापि तें कोणाचें नाहीं असा नित्य प्रकार घडून येत असे. सार्वजनिक कार्यतत्परतेचें बीजारोपण त्यांनीं शहर गांवच्या मुनासिपालिटीच्या तत्वावर केलें. प्रथमारंभीं अशा योजनेला पैशाची नड पडली तेव्हां त्यांनीं आकोला जिल्हा-बोर्डास विचारणी केली. रा. रा. दत्तात्रय विष्णु भागवत हे व्हाईस चेअरमन आहेत. त्यांनीं या विचारणीचा मोठ्या खुबीनें उलगडा केला. मुनसिपल करा प्रमाणें कांहीं पैसा गांवकरी लोकाकडून जमविण्यास सांगितलें आणि तितकीच वर्गणी जिल्हा बोर्डाच्या फंडांतून देण्याचें आश्वासन दिलें.

या व्यवस्थेचा परिणाम मोठा नामी झाला. एक टूमदार छोटेखानी मुनसिपालिटीच तेल्हाऱ्यास स्थापित झाल्या सारखी आहे. या नवीन संस्थेच्या द्वारानें गांवकऱ्यांनीं ८०० पासून ८२९ रुपया पर्यंत वर्गणी जमविली आणि जिल्हा बोर्डानें गडी माणसें, नोकर, कारकून इत्यादि लोकांच्या पगारांच्या कायमच्या खर्चासाठीं ७९० रुपये वर्गणी सालिना देण्याचें कबूल केलें. गेल्या एप्रिल महिन्या पासून ही व्यवस्था चालू झाली असून ती उत्कृष्ट चालली आहे जिल्हा बोर्डानें ही नवीन तऱ्हा चांगली आरंभिली आहे आणि तिचें अनुकरण इतर ठिकाणीं करण्यांत येईल अशी आह्मास उमेद आहे. या पद्धतीनें लोकांस सार्वजनिक ह्मणजे आपआपल्या गांवच्या आरोग्य विषयक बाबदींत काम करण्याची अभिरुची लागते आणि एकंदरीनें सर्व परिणाम अत्यंत हितकर होतो.

---

एकत्र भांडवल जमवून कांहीं उपयुक्त गोष्ट करण्याची पद्धत अलिकडील आहे. जेथें व्यक्तिमात्राच्या संपत्तीनें कार्य होत नाहीं तेथें अनेक व्यक्ती आपापला पैसा एकत्र करितात आणि बहुत खर्चाचें कार्य सुरळीतपणें चालवितात. मंडळी किंवा कंपनी उभारतात ह्मणजे एक काल्पनिक पुरुष उभा करितात. जी गोष्ट एका मनुष्याच्या होत नाहीं ती गोष्ट पुष्कळ मनुष्यांच्या एकत्रपणामुळें आपोआप चांगली

घडून येते. या काल्पनिक पुरुषाला ह्मणजे कंपनीला एक चमत्कारिक प्रकारचें अस्तित्व असतें. कंपनीचे घटकावयव ह्मणून जे लोक असतात त्यांच्या मरणानें सुध्दां कंपनी कांहीं मरत नाहीं. घटकावयवांच्या अस्तित्वा पेक्षां कंपनीचें अस्तित्व चिरकालीन असून निराळ्याच प्रकारचें असतें. कायद्यानें कंपनीचे अधिकार, हक्क व जबाबदारी हीं व्यक्तिमात्रांच्या अधिकारादिकाहून वेगळींच ठरवून दिली आहेत. कंपनीच्या द्वारानें जगांतील घडामोडी उदीम, व्यापार, कारखानें, उद्योगधंदे वगैरे अधिक सुलभ झले आहेत आणि १९ व्या शतकामध्यें सृष्टीला मनुष्यकृतीनें जे वैचित्र आलें आहे त्याचें कर्तृत्व पुष्कळ अंशीं कंपनीरूपी या काल्पनिक पुरुषाकडेच आहे किंबहुना जीं राष्ट्रें अलिकडे वैभवशिखरास चढलीं आहेत तीं एकत्र केलेल्या भांडवलाच्या उपयुक्ततेची दर्शकें आहेत. युरोपांत हल्लीं मंडळ्या पुष्कळ निघाल्या असून त्यांचा विस्तार देशाचा आधिभौतिक उत्कर्ष दाखवितो.

## बाबू मनमोहन यांचा मृत्यु.

हिंदुस्थानचा हा मोहरा मृत्युंगत झाला ह्मणून सर्व देश हळहळत आहे! कोणत्याही देशांतील थोर थोर गृहस्थ मरण पावले ह्मणजे त्या देशाची जी हानी होते ती साधारणपणें भरून येण्या सारखी नसते. आमच्या या हतभाग्य इंडियांत मोठीं माणसें अलिकडे थोडीं निपजतात. सध्यांचा मनुच असा आहे कीं आमच्या लोकांचें बुध्दिवैभव, शौर्य, किंवा मुत्सद्दीपणा नजरेस कधींच येण्या सारखा नाहीं. देशाच्या उन्नतीलाच हा काल प्रातिकूळ आहे. इंग्रजी राज्याचा प्रभाव प्रारंभीं चांगला होता पण अलिकडील राजनीतीच्या धोरणाखालीं इंडियनांचा क्वचितच उदय होईल. अशा विपत्कालीं आह्मास जीं अलौकिक माणसें विरळ विरळ लाभलीं आहेत आणि ज्यांनीं आपल्या राष्ट्राचें पाऊल पुढें राखलें किंवा राष्ट्रीय प्रगतीला चांगली दिशा लावून ठेविली तीं माणसें ह्मणजे आमचा सर्व देश होय. अशा अमोल्य माणसा पैकींच बाबू मन मोहन घोस हे होते. यांच्या मरणानें बंगालचीच नव्हे तर सर्व देशाचीच हानि झाली आहे.

बाबू मन मोहन घोस सन १८४४ सालीं जन्मले. याचे वडील बंगल्यांत सबार्डिनेट जज्य होते. हे अल्पवयांतच मोठे विद्वान झाले. ३५ वर्षामागें हे विलायतेस सिव्हिल सरव्हीसच्या परीक्षेसाठी गेले. हे परीक्षेंत नापास झाल्यामुळें मोठे नाउमेद झाले. पण तिकडून परत येतांना बारिस्टर होऊन आले. सिव्हील सरव्हीसची परीक्षा यांची उतरली नाहीं तथापि यांच्या उद्योगाच्या अनुकरणानें दुसरे इंडियन विलायतेस जाऊं लागले आणि त्यांच्या परिश्रमानें सिव्हील सरव्हीसचे नियम ही पुष्कळ बदलले. बाबू मनमोहन यांचें कायदे पांडित्य अगदीं अप्रतिम होतें. फौजदारी कामामध्यें त्यांचा नांवलौकिक फार मोठा होता. पोलीस खात्यांतील लोकांना बाबू मनमोहन हे वाघा प्रमाणें भासत. कित्येक कामें फुकट चालवून त्यांनीं पोलीसच्या लबाड्या उघडकीस आणिल्या आणि कित्येकांचे प्राण त्यांनीं आपल्या अक्कलेनें वांचविले. ह्यांच्या तोडीचा बंगाल्यांत दुसरा वकीलच नव्हतां असें ह्मटलें तरी चालेल. सन १८६६ सालीं ते इंडियांत बारिस्टर होऊन आले तेव्हां पासून त्यांचा उत्तरोत्तर उत्कर्ष होत गेला.

राष्ट्रीय सभेचे हे कट्टे भक्त व पुरस्कर्ते होते यांच्या योगानें राष्ट्रीय सभेला पुष्कळ मदत मिळाली आहे मुलकी खातें व न्यायखातें हीं वेगवेगळी करण्या विषयींचा प्रश्न त्यांनीं अगदीं निकालाच्या पायरीस आणिला आहे. सहाव्या राष्ट्रीय सभेच्या स्वागत मंडळीचे हे अध्यक्ष होते. यांचे लेख किंवा व्याख्यानें हीं नेहमीं सुबोध असत भाषा गोड, विचारसरणी सोपी व प्रतिपादन साविस्तर व मुद्देसुत असें असे. राष्ट्रकार्यानिमित्त हे विलायतेलाही गेले होते.

बाबू मनमोहन यांची ख्याती सामाजिक सुधारणे संबंधानें देखील विशेष आहे- यांचीं मतें प्रगल्भ व लोकमान्य आहेत व्यक्तविषयक सुधारणा ज्याची त्यांनीं केली पाहिजे आणि ती करण्यास कोणी चुकूं नये अशा विषयीं त्यांचा नेहमीं आग्रह असे. समाजाला गती व्यक्तिमात्राच्या सुधारणेनें मिळत जाते असें ते ह्मणत असत. गेल्या १७ वे तारखेस बाबू मनमोहन घोस निवर्तले आणि तेव्हां पासून त्यांच्या गुणांची आठवण करून लोक आपल्या प्रालब्धास दोष देत आहत. ईश्वर त्यांच्या आत्म्यास शांती देवो आणि त्यांच्या सुकृतीचें बीज आमच्या लोकांमध्यें वृक्षपदास पावो !

## दुष्काळ

शेवटीं दुष्काळरूपी राक्षसानें आपलें उग्र स्वरूप दाखविण्यास आरंभ केला. ह्या काळस्वरुपी राक्षसाच्या भयंकर स्वरूपाची कल्पना आह्मास आगष्ट अखेर पर्यंत मुळींच नव्हती. गेल्या सेपटेंबर महिन्याचे पहिले आठवड्या पासून दुष्ट स्वप्नें मात्र पडण्यास सुरुवात झाली व तीच पूर्णपणें खरी होतात कीं काय याजबद्दल आतां फारशी भ्रांती नाहीं. काय ती दिपवाळी पर्यंत पर्जन्यवृष्टी होईल अशी लोकांस बळकट आशा आहे परंतु जर त्यांची निराशा झाली तर मात्र हा राक्षस आपला भयंकर जबडा खास उघडणार हें आतां बहुतेक टरल्या सारखेंच झालें आहे. ह्या राक्षसानें यंदा हिंदुस्थानांतील बहुतेक टिकाणीं प्रळय करण्याचे योजिल्या वरून एकंदरींत फारच हाः हाः कार उडण्याचीं उघड उघड चिन्हें दिसत आहेत. याची यंदाची दिशा उत्तर, पश्चिम व दक्षिण या प्रांतांत असल्यामुळें सर्व सुपीक प्रदेशांतच ही धाड येऊन पडली! वरुण महाराजांनीं ऐन आणीबाणीच्या प्रसंगीं निद्रास्थान पत्करल्यानें ह्या राक्षसास आपलें मायाजाळ पसरण्यास फारच फावलें. हिंदुस्थानांतील सर्व काळ्या लोकांनीं ह्या राक्षसाच्या विक्राळ जबड्यांतून सुटका होण्याकरितां आपआपल्या देवतांस अमृतमय वृष्टी करण्यास प्रार्थना केली परंतु या पापी जनांवर देवता प्रसन्न कोठून होणार. कारण फक्त संकटाचे वेळींच यांस आपल्या देवतेचें स्मरण होणार तेव्हां देवताही आतां फार निष्ठूर झाल्या आहेत असें ह्मटल्यास बाध येणार नाहीं. तरी आतां आमच्या दयाळू ह्मणविणाऱ्या राजकर्त्यांनीं वेळींच असल्या भयंकर शत्रूची कशी तरी बोळवणी करण्यास प्रयत्न करावयास लागलें पाहिजे. सरकार तर हलवायाच्या घरावर फात्या या प्रमाणें व्यवस्था करूं इच्छिते हें त्यांच्या नीतीस मुळींच शोभत नाहीं व हल्लींची आमच्या हिंदुस्थानची स्थिती ही तशी नाहीं. सन १८७६ सालांत दक्षिणेंत जो भयंकर दुष्काळ झाला त्यांत व १८९६ सालीं चालूं असलेल्या दुष्काळांत महदंतर आहे. तो दुष्काळ फक्त दक्षिण हिंदुस्थानांतच होता, बाकी ठिकाणीं पिकें अगदीं बुडालीं नव्हतीं व तेव्हां पासून आतां पर्यंत जो काळ गेला तितक्या अवधींत आमची स्थिती फार दीन झाली आहे असंख्य करांच्या बोजानें आह्मास मान ही वर करण्यास अवसान राहिलें नाहीं. हिंदुस्थान ह्मणजे केवळ सोन्याची खाण ही ह्मण फक्त आतां मनोराज्या सारखी आह्मास झाली. विपत्तीनें आह्मास पूर्ण ग्रासलें. आमच्यांत कांहीं त्राण राहिलें नाहीं. सर्व संपत्ती इंग्लंड वगैरे देशांत पार नाहींशी झाली. अशा कठीण प्रसंगीं केवळ राजकर्त्यांच्या परोपकारगुणावर आह्मांस अवलंबून राहण्याचा आमच्या कम नशीबामुळें आह्मास असा दुर्घट प्रसंग आला हें पाहून अतिशय वाईट वाटतें. अयोध्या, बनारस, रेवा, बंगाल्यांतील कांहीं भाग, पंजाब, मध्यप्रांत, वऱ्हाड, खानदेश पुणें धारवाड वगैरे ठिकाणीं ह्याच वेळीं धान्याचे भाव दुपटी पेक्षां अधिक होऊन गेले आहेत. मजूरदारास मजूरी मिळत नाहीं. गुराढोरांस जंगलच्या कायद्यानें चारा मिळण्याची मार मार पडत चालली आहे. जागजागीं धान्याचे लुटीबद्दलचीं वर्तमानें येऊन दाखल होत आहेत. खेड्यापाड्यांतून संभावित लोकांस राहणें फार धोक्याचें झालें आहे. निर्भयता नाहीं. सरकारानें वेळींच बंदोबस्त करणें इष्ट आहे परंतु त्याकडे जर सरकार जाणून बुजून काना डोळा करील तर त्यांस ही पुढें हें विघ्न जबरदस्त होईल. व एकदा प्रळय उसळल्यावर त्यांस बंदोबस्त करणें फारच मुष्किलीचें होईल.

आतां वऱ्हाड संबंधानेंच पाहू गेलें असतां इकडील कित्येक बडे सरकारी अधिकारी दुष्काळ नाहींच असें ह्मणत होते परंतु शैलशिखरावर बसून त्यांस खरी स्थिती काय कळणार! तरी कित्येक कनवाळू व ज्यांची पक्की खात्री झाली अशा अधिकाऱ्यांनीं कान उघाडणी केल्यावर ह्यांच्या नेत्रपटलावरील धूर जात चालला आहे व फारच प्रयासानें ते आपले डोळे उघड झांक करूं लागले आहेत. खुद्द व्हाईसराय साहेब लार्ड एलजिन ह्यांचीही खात्री होत चालली आहे. त्यावरून सरकार थोडें बहुत लक्ष देतील असा आशांकूर उत्पन्न झाला आहे; परंतु आमचे कित्येक विघ्नसंतोषी अधिकारी जागचे जागीं तो अंकूर कापून न टाकोत ह्मणजे आमचें महत् भाग्य समजावयाचे. अशा अधिकाऱ्यांस मोठमोठे पगार व हुंडणावळणीचे भावाबद्दल एक्सचेंज काम्पेनसेशन आलौवन्स असे दांडगे पगार मिळत आहेत तेव्हां त्यांस आमची काय फिकीर! वऱ्हाडांतील पीका संबंधाची स्थिती पाहूं गेलें असतां केवळ एका पावसाचे उणेवीनें आमची खरिपाचीं पिकें आमच्या डोळ्या समक्ष सुकत चाललीं आहेत खड्यां बरड्या जमिनींतील ज्वारी व कपाशी तर वाळून कोळ होऊन गेली. गांव आखर शेतांतील पिकें वाळत चाललीं आहेत व आतां काय ती मोठी भिस्त व आशा नांगलेल्या काळ्या शेतांतील पिकांवर आहे. त्यांतील पिकें अद्याप हिरवीगार दिसत आहेत परंतु हल्लीं पडतें असेंच कडक ऊन पडत राहिल्यास त्या पिकासही मोठा धोका आहे. पाऊस आणखी आठ चार दिवसांत न पडल्यास हीं पिकें निदान सहा आण्या पासून दहा आणे पर्यंत येण्याचा अंदाजा आहे व पाऊस आल्यास हीं पिकें उत्तम येतील. आमच्या दुर्दैवानें वऱ्हाडांत पाऊस फार उशीरानें सुरू झाल्यामुळें कपाशीची व ज्वारीची पेरणी पेरणीच्या मोहसमाच्या अखेर अखेर मोठ्या घाईनें झाली त्या वेळीं कित्येकांनीं तर खरिपाच्या पेरणीचा हंगाम गेला ह्मणून पुढील आशेवर आपलीं शेतें रब्बी करितां मुद्दाम राखून ठेविलीं! विनाशकाले विपरीत बुद्धि असें ह्मणतात तें अगदी खोटें नाहीं. वऱ्हाडांत केवळ नशीबावर हवाला ठेऊन रब्बीचे पेरे हल्लीं चालूं आहेत व कित्येक ठिकाणीं संपले. ज्या ठिकाणीं पेरे झाले त्यांतील बी जमिनींत मुद्दाम फार खोल पेरावें लागलें. अजून कोम वर आले नाहींत व कित्येक ठिकाणीं वर आले होते ते प्रखर उन्हाच्या सपाट्यानें वाळत चालले आहेत. वऱ्हाड व सोन्याची कराड ह्मणून जी ह्मण होती ती आतां फक्त नामशेष राहिली आहे. पैशांचें त्राण आतां अगदी राहिलें नाहीं. शेतकऱ्यांची स्थिती उत्तरोत्तर फारच शोचनीय होऊं लागली आहे. मजूरदारांस मजूरी नाहीं. त्यामुळें खेड्यापाड्यांत व कित्येक तालुक्याच्या व मोठमोठ्या गावांत ही धान्याची लुटालूट लहान मोठ्या प्रमाणानें चालू आहे. वऱ्हाडांतील लोक जात्या फार भित्रे व गरीब असल्यानें सरकारानें वेळींच बंदोबस्त केल्यास भावी अनर्थ या प्रांतांतील चुकतील असें वाटतें. बाजार भाव तेज झाल्यामुळें हल्लींच कित्येक गोर गरीबांस व मजूरदार लोकांस कडकडीत उपास काढावे लागत आहेत. पुष्कळांस आंबाडीच्या पाल्यांतून ज्वारीचे पीठ मिसळून त्या भाकरीवर उदरनिर्वाह करावा लागत आहे! दिवाणी कचेऱ्यांचीं कामें बहुतेक बंद झाल्या सारखींच आहेत. रस्त्यानें एकटे दुकटे जाणें भयप्रद झालें आहे.

पाऊस पडण्याचीं चिन्हें कांहीं नाहीं तरी रिते घन आकाशांत रोज रात्रौ येतात परंतु त्यापासून तुष्टीचा संभव मुळींच नाहीं. शेतकरी फार हवालदील झाले आहेत. धान्याचे व्यापाऱ्यांस गरीबांची दया येत नाहीं उत्तरोत्तर महर्गता जास्तच जोरावर आहे. खेड्यापाड्यांतील व कांहीं गांवांतील लोक लुटालू-

ट करण्याचे विचारांत आहेत. बाजारांत धान्य दुर्मिळ झालें आहे. चांगल्या लोकांनीं व सरकारानें अशा समयीं योग्य विचार करून बंदोबस्त करणें अवश्य झालें आहे. कांहीं कांहीं ठिकाणीं नावाकरितां कमेट्यांच्या दुकानांचा फार्स करण्यांत आला आहे. परंतु अंदरकी बात राम जाणे! अशानें कांहीं एक टिकाव लागणें नाहीं. योग्य समंजस व खात्रीचे लोकांस सरकारानें मदतीस घेऊन दुष्काळाचे कामा करितांच स्पेशल ड्युटीवर अनुभवशीर अशा चांगल्या सरकारी अधिकाऱ्यांच्या नेमणुका करून हें काम चालूं झालें पाहिजे. कारण हा दुष्काळ निदान आजपासून बारा महिन्यांचा आहे. श्रीमंत व्यक्तींनीं याचवेळीं आपली परोपकारबुद्धि व्यक्त केली पाहिजे. सरकारानेंही केवळ लोकांपासून वर्गणी वसूल करून काम न चालवितां स्वतःचे पदरांस निव्वळ इंपेरिअल फंडाला खार लावून घेतल्यास लोकांस ही वर्गणी देण्यास हुशारी वाटेल व अशा दुर्धर प्रसंगीं सरकारचें औदार्य दृष्टोत्पत्तीस आल्यास राजा व प्रजा यांतील प्रेम अधिक वाढून सरकारचें राज्य अधिक चिरस्थायी होईल. गुलामांचा व्यापार बंद करण्याचें कामीं ज्या कित्येक इंग्रज बहादरांनीं आपलें सर्वस्व खर्चिलें त्यांचेंच रक्त ज्यांचे अंगात खेळत आहे असे बहादर यावेळीं खास पुढें येण्यास मागें पुढें पहाणार नाहींत. रिलीफ वर्कचीं कामें मुनसिपाल कमेटी मार्फत त्यांच्या त्यांच्या शक्ती प्रमाणें चालू आहेत डिस्ट्रिक्ट बोर्डाचे फंडांतून ही कामें लवकरच सुरु होण्याचा संभव आहे. उमरावती डिस्ट्रिक्ट बोर्डानें दीडलाख व आकोला बोर्डानें पाऊण लाख खर्च करण्याकरितां मंजूरी मागितली आहे. तूर्त तर ह्या प्रमाणें हकीगत आहे.

मुंबई युनिव्हरसिटीच्या वार्षिक परीक्षा येत्या नोवेंबरच्या २ रे तारखे पासून सुरू होतील नोवेंबर महिना ह्मणजे मुंबई इलाख्यांतील वरिष्ठ परीक्षाचा मोसमच आहे. पी. इ.; इनटरमिजिअयट; बी. एस. सी. इत्यादि परीक्षा मुंबईस येत्या नोवेम्बरच्या २ तारखेस सुरूं होतील. ९ वे तारखेस सालाबाद प्रमाणं म्याट्रीक्युलेशन परीक्षा सुरूं होईल. एल. एल. बी; एम. ए.; वगैरे परीक्षा कांहीं १६ वे तारखेस व कांहीं २३ वे तारखेस सुरूं होतील.

यंदा मुंबईस जी वळाच्या तापाची सांथ आली आहे तिच्यामुळें परीक्षा एखादा महिना लांबतील किंवा परीक्षेचें स्थळ निदान बदललें जाईल असें वाटलें होतें. आणि यां फेरफारा संबंधानें पुष्कळ ठिकाणाहून सूचनाही झाल्या होत्या. पण युनिव्हर्सिटीनें सर्व गोष्टी बाजूस ठेविल्या आणि आपल्या नित्याचा क्रम चालूं राहील अशा विषयीं जाहिरात दिली. असा दुराग्रह कां दाखविण्यांत आला हें कळत नाहीं!

इराणच्या आखाता जवळ जो प्रदेश आहे तेथून धान्य हिंदुस्थानांत आणिलें तर तें स्वस्त पडल असा अंदाज दिसतो तेथें गहू रुपयास ३० शेर भाव.न मिळता. भाव बरा असून व्यापाऱ्यास बसारा प्रांताकडील धान्य किफायतीनें इकडे विकण्यास सवड सापडेल. बाह्य देशांतून धान्य आणिल्या शिवाय यंदा निभाव लागणार नाहीं असें वाटतें

हल्लींच्या दुष्काळाच्या प्रसंगीं सरकारानें गरीब प्रजेसाठीं धान्याचें दुकान घातलें पाहिजे लक्षावधि खंडी धान्य सरकारानें विकत घेऊन पैशाच्या ऐवजी धान्य माफक दरानें देण्याचा परिपाठ सुरूं करावा असें आह्मांस वाटतें. सरकारानें आपल्या तिजोरींतला पैसा बाहेर काढून गरीब रयतेचा बंचाव केला तरच हा दुष्काळ लोटला जाईल. सरकारानें मनावर घतलें तर धान्याचा पुरवठा ही विपूल होईल हल्लीं आयात मालावर जी जकात बसविली आहे ती धान्या पुरती उठविली पाहिजे. या वेळेस ही जकात बंद झाली तर धान्य थोडेबहुत स्वस्तच मिळेल आणि देशान्तरावरून धान्यही अधीक येईल

इस्ट इंडिया रेलवे कंपनीनें धान्याच्या पोत्यांचें भाडें फार कमी केलें आहे. ही गोष्ट खरोखर स्तुतीस पात्र असून त्या कंपनींच्या उदारपणाबद्दल भूषणास्पद होय. इतर रेलवे कंपन्यानीं या वेळीं अशी मदत देणें न्याय्य आहे व जर कोणी मदत देण्याचें नाकबूल करितील तर सरकार मार्फत कंपनीवर हुकूम चालवि यांत आला पाहिजे.

# The Berar Samachar

MONDAY OCTOBER 26 1896

It it rains within a few days hence, it is well and good. Otherwise no one can guess what evil is in store for India. The famine of 1896 is a terrible foe. We fail to see how we can meet the hard times that are coming upon us. The poorer classes have succumbed to the distress that assumes large proportions from day to day. The distress prevails in all localities. It is acute and intense The problem before the nation is one of life and death. This famine has just peeped in and yet its ravages are immense. The scarcity of food stuffs is felt almost all over India and the well—to—do classes of the Indian society get food—grains at high prices. The railways have a heavy traffic in food—grains and regulate their distribution in monied classes. The present laws of supply and demand in food-stuffs establish a bad luck for the poorer masses in India. They prove to a demonstration that the survival of the richest is secured at the cost of the lives of the poor. The heavy demands have for example depleted our province of the food—supplies which are necessary for the people themselves. The rich people in other provinces will live upon our food—supplies and the people of Berar will die of starvation be-cause their supplies are exported elsewhere. The free-trade principles are a godsend when we want a free flow to the abundence of our food—grains. But the present are not the days of plenty and abundence. Hence the poor people in all parts of India will have to starve and will let the rich men live at their cost. If the present distress continues for a few months more our apprehentions will be multiplied times out of number. It will assume large dimensions in point of extent and intensity and then we can hardly stop the loss of life that will follow in the sequel. Millions of people will be swept away before us; and poverty and starvation will foster other calamities in the long run.

Lord Elgin spoke very well at the Legislative Council and as is usual with high officers His Excellency promised liberally to strain every nerve to save life to the utmost. If life is to be saved at any cost and if it is really the highest ideal of our government we hope in dispair that it is not the lip-policy that dictated such an utopia. Philosophy of inaction is no doubt a great help to a sweet tongue. But the present crisis is a crucial test of the the governmental benevolence. We must however confess that the Government is found inert and sluggish in the extreme. In plain words, what has the Government done in a tangible manner to help the suffering people?

Private benevolence has gone a great way to afford relief to the starving neighbours. It doles out alms in the right direction; but it is doomed to run short in the face of the present distress. Single—handed individual benevolence works very little. The Government must be free, liberal and benevolent. The higher classes in the Indian nation will be the main prop upon which the Government should take a stand and should devote the public treasuries to save life in these times of scarcity and distress. Man and cattle stand in numbers on the brink of starvation and death. A free flow of food—stuffs and fodder will alone avert the calamity and we fail to see how the supply can reach the poor if relief—wages be not forth-coming for the un—skilled labour of the able—bodied people and poor-houses be not established to help those who cannot work for bread.

The last number of the Residency orders notifies the resignation of Rao Sahib Deorao Vinayak of his office as member of the Akola Municipal Committee. We are sorry to see him retire from the municipal arena where he has won his greatest battles of public life with great credit to himself and the local institution. He has no doubt made a name for himself and his services to the municipalty have been most numerous and valuable. He is a man of stupendous energies, and great prudence. We really feel a heavy loss in his retirement. It pains us the more when we reflect upon the incidents that led him to resign. The Commissioner is said to have condemned him right and left for letting some papers to appear in public print. It was indeed a piece of un-wisdom which the municipality should resent in one voice. It dealt a fatal blow to one of its distinguished officers. Rao Sahib ought to have fought manfully against the Commissioner. The honor of a public man should be of "a coarser web." We are sorry because a man of great usefulness has left a public body. We are pained as it were to a high degree. We anxiously long for his return to the Committee because if he retires at all, let him do so with all public honors.

The following particulars are summarized from the report on the Irrigation works in India for 1894—95:—

"The Irrigation works in India are divided into two main classes, *viz.*, Major Works and Minor Works.

Major Works are sub-divided into—

(*a*) Productive Works, the Capital of which has been provided from borrowed money; and

(*b*) Protective Works, the Capital of which has been provided out of the general revenues of India.

Minor Works are for the purpose of this note sub divided into—

(*a*) Works for which Capital and Revenue accounts are kept; and

(*b*) Works for which Capital accounts are not kept.

The net revenue derived from Major Works is Rx. 39,204 better than that of the previous year. The increase occurred principally in the Punjab and is due to the extension of irrigation from the Western Jumna, Bari Doab and the Chenab Canals. The interest charges during 1894—95 have, however also increased by Rx. 28,557 owing to additional Capital outlay, so that the increase in the net profit is Rx. 10 647.

The net profit should be considerably increased when the Fatehpur Branch of the Lower Ganges Canal, the Chenab Canal, the Periyer and Rushikulya Projects and the Jamrac Canal are completed, and the irrigation from them and other projects have been fully developed. So far the works in Bengal and Deccan have failed to pay the interest on the Capital invested in them.

That net revenue from Minor Works was less than that of the previous year by Rx 58,081. The largest items contributing towards this decrease are referred to in paragraph 32 below."

## वऱ्हाड

हवामान— पावसाकडे डोळे लागले आहेत. हवेंत उष्मा विशेष भासतो. ऊन अती तापतें. पीकें वाळून चाललीं आहेत. रोगराई ह्मणण्या सारखी विशेष नाहीं.

मि० वाल्श ए० असि० कमिशनर हे गेल्या शुक्रवारीं विलायतेस जाण्यासाठीं मुंबईस रवाना झाले. मि० बी. क्ले असि० कमिशनर वर्ग ३ यांची उमरावतिहून अकोल्यात बदली झाली आहे.

वऱ्हाडांत एकंदर कपाशीचा पेरा २२, ९९,६७२ एकर जमिनीवर आहे. गुदस्त पेक्षां २३हजार एकर जमिनीवर अधीक आहे.

राव साहेब देवराव विनायक व रा० रा० गणेश अनंत वैद्य यांनीं येथील मुनसिपल सभासदपणाचा राजिनामा दिला व तो राजिनामा मंजूर झाला. दोन सद्गृहस्थ सार्वजनिक कार्यमालेतून गळाले ही मोठीच विशोभा व तुटातुट होय.

रा० रा० पुरुषोत्तम विष्णु बी. ए. हेडमास्तर, शेगांव यांस तेथें मुनसिपल सभासद नेमिलें.

मेसर्स राईट व स्पान्सकी पोलीस इनस्पेक्टर यांच्या पोलीस खात्याच्या हायर--परीक्षा संपूर्ण उतरल्या.

गेल्या आगष्ट महिन्यांत या प्रांतीं ११७८४ माणसें जन्मलीं व ११७९६ मरण पावलीं.

बाह्य प्रांतीं इतरत्र जशा लुटी होत आहेत तशा प्रकारची एक लुट जळगांवास झाली. मुख्य अधिकारी तिकडे जात आहेत-

पातुरच्या बाजाराच्या लुटींत ११ आरोपी होते त्या पैकीं ७ इसम सुटले. व चौघावर आरोप ठेवण्यांत आला.

बाजार भाव

| | दर खंडीस |
|---|---|
| आळशी | ९९ रुपये |
| जवारी | ८८ रु० |
| गहूं ( कांठे ) | १२० रु० |
| ,,( बनशी ) | १३० रु० |
| चणे | १०९ रु० |
| तेल | ६॥। रु० मण |
| तूप | ७ मण |
| सोनें | २६ तोळा |
| चांदी | ८७ भार |

## वर्तमानसार.

बहार प्रांतांत सीतामारही येथें दंगा झाल्याबद्दल तारेनें खबर आली आहे. तेथील सब् डिव्हिजनल् हापिसर साहेब लोकांच्या सोईकरितां ह्मणून एक पाण्याचें धरण फोडूं लागले. तेथें गांवकऱ्यांनीं बांध फोडण्यास हर्कत केली; त्या वेळीं ती गैरकायदा मंडळी आहे असें समजून त्यांतील मुख्यांस डिव्हि० हपीसर साहेब पकडूं लागले तेव्हां तर लोक फारच खवळले आणि ते पोलीस चौकीदार व साहेब यांजवर तुटून पडले. त्यांत साहेबांस बरीच दुखापत झाली आहे. ह्या दंग्याचे ठिकाणीं मुझफरपूरचे कलेक्टर गेले आहेत, हातघाईवर प्रसंग येऊं लागले हें बरें लक्षण नव्हे.

स्पितांगी येथें दंगेखोरांनीं रेल्वेच्या कामावरलि कांहीं मजुरांचे खून केले व तारायंत्राची तार तोडली. ह्या दंगेखोरांचे बंदोबस्तासाठीं ता० १५ रोजीं रात्रीं मुंबईच्या पायदळ पलटणीचे १८० शिपाई आगगाडीतून पाठविले. त्या गाडीवरच दंगेखोरांनीं गोळ्या घातल्या. ता० १६ रोजीं आणखीं २०० लष्कर बंदोबस्तास पाठविलें आहे. क्व्याजवळील रल्वेस्टेशनांवर तूर्त लष्करी शिपायाचा पाहरा ठेविला आहे.

हिंदु कल्पक प्रोफे० भिसे यांनीं प्रवाशांची सुरक्षित पेंटी व बिछाना, ही एक वस्तु तयार केली असून तिचें पेटंट हिंदुस्थान सरकाराकडे मागितलें आहे. ह्यांत प्रवाशांची पेटी व बिछाना हीं एकत्र राहून एका हातानें उचलून नेतां येतात व त्या दोहोंपैकीं एकही वस्तु किंवा त्यातील कोणतीही वस्तु अट्टल चोराला कोणत्याही युक्तीनें मालक निजलेला असतां नेतां येऊं नये अशी योजना प्रोफे० भिसे यांनीं केली आहे. चोराच्या थोड्याशा हालचालीनें मालक सावध होऊन आपल्या वस्तुविषयीं जागत राहण्याची तजवीज ह्यांत केली आहे. अमुक वाजतां जागें व्हावयास पाहिजे असेल तर त्या प्रमाणें जागे होण्याचा उपायही ह्यांत केलेला आहे, ह्या ब्यागेची किंमत १० रुपया पेक्षां अधिक पडणार नाहीं. ह्या देशी वस्तूस आश्रय देण्याकडे लोकप्रवृत्ति होईलच.

अर्धे लाखाचा दरवडा —सौथमलबारांत मोपला लोकांनीं एक दरवडा घालून अर्धे लक्षाची जिनगी लांबविली !

काळोखांतील जाहिराती— रात्रीच्या वेळीं काळोखांत ३० फूट लांबीचीं १० मैल अंतरावरून दिसत अशी मोठमोठीं अक्षरें विजेच्या योगानें दाखवून जाहिरातीचें काम करण्याची सुरुवात मि० वेट नांवचे एक युरोपियन कल्पक करीत आहेत.

जळगांव ( जि० खानदेश ) येथें ६॥ शेर ज्वारी झाल्यामुळें ता० १४ रोजीं हजारों अन्नार्थी बाजार लुटण्यासाठीं जमले होते. परंतु व्यापाऱ्यांनीं तावडतोब ३ हजार रुपये गरीब-फंड जमवून गरिबांस ८ शेर ज्वारी मिळण्याची तजवीज केल्यामुळें प्रसंग निभावला.

स० शो०

बर्लीन येथील प्रसिद्ध शास्त्र शोधक डाक्टर सिमेना यांचें घर ह्मणजे सौदामिनीचें वास्तव्यस्थान बनलेलें आहे. त्यांच्या घरांत सर्वत्र विद्युच्छक्तीनें कामें होतात. झाडलोट, बिछाने पसरणें, भोजनाची सिद्धता, भोजन टेबलावर आणणें, दिवाबत्ती, धुणेपाणी, घासणें पुसणें वगैरे यचावत गृहकृत्यें विजेच्या यंत्रांनीं होतात; व याप्रमाणें त्यांचे घरांत चोहोंकडे वीजच संसार करीत असलेली बघण्यांत कोणालाही अतिशय कौतुक वाटल्यावांचून रहात नाहीं.

लंडन शहरांत उघडपणें शरीरविक्रय करणाऱ्या अशा ४०,००० स्त्रिया आहेत. अशा स्त्रियांस सुमार्गास लावण्याकरितां तिकडे बऱ्याच मंडळ्या स्थापन झाल्या आहेत परंतु ह्यांच्या प्रयत्नांस फारसें यश येत नाहीं.

आ. व.

यंदा कांग्रेस न भरवितां तिजप्रीत्यर्थ खर्च होणारे ४० हजार किंवा ५० हजार रुपये जर दुष्काळ पीडित गरीब लोकांचें प्राण वांचविण्याकडे खर्च करण्यांत आले तर चांगलें होणार आहे अशी एका कनवाळूनें ज्ञानप्रकाशांत सूचना केली आहे.

निजामहैद्राबादचे रेसिडेन्ट मि. प्लौडन रजेवर जाणार. परत आल्यावर त्यांस पंजाबची ले० गव्हरनरी मिळणार.

मुंबईंत नवीन रोग आला त्याचें कारण वायकांत असें निघालें आहे कीं, कोण्या बाइनें विलायतेहून येणाऱ्या "केरवा" जातीच्या बांगड्या मुंबादेवीला वाहिल्या त्या रोगामुळें हा अनर्थ उडाला आहे. पुष्कळ बायकांनीं बांगड्या फोडून टाकल्या व त्या भग्निनाशा झाल्यामुळें कासार रडत आहेत.

जपानांतील वरिष्ठ प्रतीचे शिक्षणांत संस्कृत भाषा धरली असून तें शिक्षण मोठ्या काळजीनें होऊं लागले आहे.

मिश्रदेशच्या सैनेनें डंगाला प्रांतांत हल्ला करून ९०० लोक ६ तोफा बहुत द्रव्य हिरावून नेलें.

काबूलमध्यें ब्रिटिश सरकारमार्फत मौलवी गफुरखा यांची नेमणूक एजंटच्या जागीं झालीं.

मद्रास इलाख्यांत नौकरीच्या परीक्षा सुरूं झाल्या. त्यांतील उमेदवारांची संख्या ४६००० होती हा विद्येचा प्रसार नसून भिक्षेचा प्रसार दृष्टीपुढें आला आहे. म. भि.

निद्राभ्रम—एक अमेरिकन तरुण स्त्री आपल्या पलंगावर निजली असतां रात्रीं एकाएकीं उठून आपल्या दुचाकी पायगाडीवर बसली आणि चालू लागली. ती सुमारें दोन मैल गेल्यावर एका दगडाची ठोकर तिच्या गाडीला लागून ती खालीं पडली तेव्हां ती जागी झाली. इतका वेळपर्यंत तीं अगदीं निद्रावश होती. आणि हा सर्व व्यापार तिच्या झोंपेंतच तिजकडून झाला ! तिला दगडाची ठोकर लागली नसती तर ती आणखी कितीपुढें गाडी फेंकीत गेली असती तें कांहीं सांगतां येत नाहीं ! हा विलक्षणच निद्राभ्रम होय !

अक्कलकोटच्या मत्रावरून कळतें कीं, तेथील श्रीरामचंद्र देवाचे पुजारी यांनीं १५ दिवसाचे आंत पर्जन्यवृष्टि होईल व ती झाल्यानंतर सरकारांनीं श्रीराम देवाचीं पूर्वीची नेमणूक कायम करून द्यावी ह्मणुन एक कागद लिहून देऊन अन्नपाणी वर्ज्य करून ईश्वरोपासना चालविली आहे. सदर मुदतींत पर्ज्यन्यवृष्टि न झाल्यास प्राणत्याग करीन अशीही त्यानें प्रतिज्ञा केली आहे ह्मणतात.

दी. बं.

कानस्टनाटिनोपलमध्यें आर्मिनियन लोकांच्या कत्तलीमुळें अत्यंत अवस्था पसरली आहे.

झांजिबारावर इंग्रज सरकारचीं गलबतें जाण्याच्या तयारींत आहेत. यावरून तें प्रकर्ण चिघळणार. वाईट असून काळ विपरीत आहे तेव्हां काय होईल तें आज सांगवत नाहीं.

काबूलमध्यें एक भयंकर तापाची साथ आली असून तिनें १०००० मनुष्याचा फडशा उडविला.

म० मि०

गुप्त हेररूपी विमानें— फ्रान्स, जर्मनी, आस्ट्रिया आणि रशिया या ठिकाणीं विमानें उडवून त्यांच्यावर बंदुकीच्या गोळ्या सोडून प्रयोग करून पाहिले, त्याचा परिणाम लष्करापासून १६२५० फूट दूर व २६०० फूट उंचीवर विमान असल्यास त्यावर अलीकडच्या बंदुकीच्या गोळ्यांचा उपयोग होते नाहीं असें ठरलें. हा एक लष्करी शिक्षणाला फायदाच ह्मणावयाचाच.

चंद्रावरचे पर्वत चंद्राच्या मानानें फारच मोठे आहेत चंद्राचा आकार पृथ्वीच्या ४० व्या भागा इतका आहे. पण त्यावरचा थोरला पर्वत हिमालयाच्या जवळ जवळ इतका उंच आहे.

लहिंगचंग चिनी प्रधान सर्व युरोप हिंडून स्वदेशी गेले. त्यांनीं युरोपांतल्या राजेलोकांच्या संबंधानें जी माहिती मिळविली तिचें सार एका वाक्यांत सांगतातः—

"सोर लांडग्या सारखें अधाशले आहेत. साऱ्यांचा डोळा नवीन मुलूख सांपडेल कधीं व आपण तो वांटून घेऊं कधीं इकडे आहे. चीनासंबंधानें तर सर्वजण संधी पहात टपत बसले आहेत."

झांजिबारचे पळालेले सुलतान जर्मनीच्या साह्यानें पुनः गादी मिळविण्याचे खटपटींत आहेत असें कळतें. जर्मन सरकारही त्यास पाठीशी घालून इंग्लंडास दटावयास पहात आहे.

स. म. रेलवेनें ड्रायव्हर व फायरमनच्या जाग्यावर नेटिवांस ठेवण्याची परवानगी सरकाराकडे मागितली होती ती मिळाली.

इंग्लंड मुळींच जगांतून नाहींसें होणार कीं काय? असा प्रश्न विचारला तर पुष्कळांना हसूंच येईल. परंतु खरोखरींच या बेटाची जमीन समुद्र आपल्या पोटांत घेत आहे. पूर्व किनाऱ्यावर समुद्र सारखा वाढत आहे. जीं शहरें समुद्रापासून कित्येक मैलांवर होतीं तीं आतां अगदीं किनाऱ्यावर येऊन धडकलीं आहेत. व पूर्वींची समुद्रकांठची वस्ती उठून दुसरीकडे गांव बसवीत आहे. गुडवुइन सांड ह्मणून एक उत्तम जमीन होती, ती सबंध नाहींशी झाली. नारफकच्या किनाऱ्यावर तीन गांव नामशेष झाले आहेत. दुसऱ्या एका बाजूनें समुद्र थोडासा हटतो आहेसा दिसतो, पण सरासरींत इंग्लंड समुद्रांत कधीं तरी गडप होईल असें वाटतें.

गायन सापाला आवडतें अशी समजूत आहे, परंतु उंदीर, कोळी सर्वच प्राणी नादब्रह्माला लुब्ध आहेत असें दिसतें. गायनशाळांत मुलांच्या गाण्याच्या वेळीं उंदीर हटकून बिळाबाहेर येतात असा अनुभव आहे. पारिसच्या तुरुंगांत एका लष्करी कैद्याला कर्मणुकीकरितां अलगुज वाजविण्याची परवानगी मिळाली होती. त्यानें अनुभव लिहिला आहे कीं अलगूज वाजूं लागलें कीं कोळी, उंदीर, झुरळ हे प्राणी त्याच्या आसपास जमत आणि वाजविणें संपलें कीं चालते होत.

इंग्लंडचे माजी मुख्य प्रधान मि० ग्लाडस्टन साहेब तुर्कस्थानच्या सुलतानास 'मांग' ह्मणतात. पण मुसलमानांच्या आदिगादीच्या मालकांस असल्या अपशब्दाचा उपयोग करण्याचें बंद करावें ह्मणून मद्रासच्या मुसलमानानीं सरकारास अर्जानें मागणें केलें आहे. अभिमान कसा आहे? नाहीं तर आह्मी ! आमच्या बायकांस परक्यांनीं स्वैरिणी ह्मणावें आणि आमच्या शहाण्या बांडगुळांनीं टाळ्या पिटाव्या. अहाहा ! ! !

एक अमेरिकन प्रोफेसर ह्मणतोः—एशू ख्रिस्त मानव जातीचें तारण करण्याकरितां जगांत अवतरला असें ह्मणतात. परंतु तें त्याच्या हातून मुळींच झालें नाहीं. कारण निरनिराळ्या प्रकारचे गुन्हे, दारूबाजी, लढाया, रंडीबाजी. कनिष्ठ प्रतीच्या लोकांची हालअपेष्टा व त्यांच्यामागें लागलेलें दारिद्र्य, अनेक प्रकारचे भयंकर रोग, आणि आत्महत्या हीं जगांतील बाकीच्या राष्ट्रांपेक्षां ख्रिस्ती राष्ट्रांत अधिक नाहींत काय ? या प्रश्नाचें उत्तर ज्यांचा त्याच्याशीं संबंध येत असेल त्यांनी निःपक्षपातपणें द्यावें.

न्या. स.

सरहद्दीवरील सराणी स्टेशनावर मरी लोकांनीं हल्ला करून स्टेशनच्या सगळ्या लोकांस ठार केलें. एक पाहुणा साहेबही मेला. स्टेशनमास्तर घायाळ होऊन जगला.

इंग्लंडानें टर्कीतल्या अर्मेनियनप्रकरणाबद्दल हत्यारबंद होऊन पुढें यावें हें मला पसंत नाहीं, कारण तसें केल्यानें युरोपांत एक फार मोठी लढाई सुरू होऊन मोठा घोटाळा होईल असें इंग्रज माजी प्रधान लार्ड रोजबरी सांगतात.

रशियन बादशहानें आपल्या प्रवासांत पारीस येथें मागच्या आठवड्यांत जे शब्द उच्चारले त्यांवरून फ्रान्स व रशिया यांचें पक्कें ऐक्य झालें आहे असें होतें असें सांगून फ्रेंच व रशियन वर्तमानपत्रें आनंद प्रदर्शित करीत आहेत.

रशियन बादशहा हा फ्रान्साचें हें मित्रत्व शांतता राखण्याकरतांच उपयोगांत आणील असें जर्मनपत्रें ह्मणतात.

ठा. अ.

---

☞ हें पत्र आकोला येथें कै० वा० खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.